सुभाषित.

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

निबंधमाला मासिक पुस्तकाच्या चवऱ्याऐंशी अंकांत

आलेले सर्व श्लोक एकत्र करून

त्याचें हें पुस्तक

शंकर नरहर जोशी

चित्रशाळेचे म्यानेजर

यांनीं

' चित्रशाळा ' छापखान्यांत ८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर

येथें छापून प्रसिद्ध केलें.

सन १९१५

किंमत १२ आणे.

॥ श्रीः ॥

सुभाषित.

सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया ॥
यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः ॥ १ ॥

" सुभाषित, गायन आणि तरुण स्त्रियांच्या लीला, या तिहींत ज्याचें मन तल्लीन होऊन जात नाही, तो एक जीवन्मुक्त योगी म्हणावा किंवा पशु म्हणावा ! "

गीर्वाणवाणीषु विशिष्टबुद्धिस्तथाऽपि भाषांतरलोलुपोऽहम् ॥
यथा सुधायां मरुतां च सत्यां स्वर्गांगनानामधरासवे रुचिः ॥२॥

" संस्कृत भाषेकडेच जरी माझा मोठा ओढा आहे, तरी इतर भाषांविषयींही पण मला उत्कंठा आहे; जसें स्वर्गींच्या देवांस प्राशन करण्यास चंद्राचें अमृत असतांही अप्सरांच्या अधरांचें मद्यही त्यांस आवडतें ! "

सायं नायमुदेति वासरमणिश्चंद्रो न चंडद्युति-
र्दावाग्निः कथमंबरे किमशनिः स्वच्छांतरिक्षे स्थितः ॥
हंतेदं निरणायि पांथरमणीप्राणानिलाशाशया
धावद्घोरविभावरीविषधरीभोगस्य भीमो मणिः ॥ ३ ॥

कालिदास—शृंगाररसाष्टक.

जिचा नवरा प्रवासास गेला आहे अशी कोणी विरहिणी नुकत्याच उगवलेल्या पूर्णिमेच्या चंद्रास बघून उन्मादावस्थेंत त्यावर उत्प्रेक्षा करते—

" आतां संध्याकाळ झाला आहे, तेव्हां हा खचीत सूर्य उगवलेला नव्हे;—बरें, जर चंद्र म्हणावा, तर यापासून संताप होतो हें कसें ?—रानांतील वणवा म्हणावा, तर तो आकाशांत कां ?—अशनि* म्हणावा, तर हा स्वच्छ निरभ्र आकाशांत आहे ! तेव्हां वरील कल्पना कोणतीच बसत नाहीं.—पण

* ' अशनि ' म्हणजे ' वज्र ' अथवा ' वीज ' हा दुसरा शब्द स्त्रीलिंगी असल्यामुळें तो वर घालतां आला नाहीं.

हां समजलें ! पांथांच्या स्त्रियांच्या प्राणरूप वायूचें भक्षण करण्याच्या आशेनें रात्रिरूप घोर सर्पिणी धांवत येत आहे !--तिच्या शिरावरचा हा भयंकर मणि दिसूं लागला आहे ! ! "

जटा नेयं वेणीकृतकचकलापो न गरलम्
गले कस्तूरीयं शिरसि शशिलेखा न कुसुमम् ॥
इयं भूतिर्नांगे प्रियविरहजन्मा धवलिमा
पुरारातिभ्रांत्या कुसुमशर किं मां प्रहरसि ॥ ४ ॥

कोणी विरहिणी मदनास उद्देशून म्हणते—

" हे मदना ! शिवाच्या भ्रांतीनें मजवर कां व्यर्थ प्रहार करतोस ? अरे, ही जटा नव्हे, तर केसांची बांधलेली वेणी होय; हें गळ्याभोंवतीं विष नव्हे, तर कस्तूरीचा लेप आहे; शिरीं चंद्राची कोर नव्हे, तर पांढरें फूल आहे; अंगास भस्म फांसलेलें नव्हे, तर पतीच्या विरहामुळें आलेला पांढरेपणा होय ! "

आघ्रातं प्रतिचुंबितं प्रतिमुहुर्लीढं च यच्चर्वितम्
क्षिप्तं वा यदि नीरसेन कुपितेनात्र व्यथां मा कृथाः ॥
हे माणिक्य तवैव तच्च कुशलं यद्वानरेणामुनाऽ-
प्यंतस्तत्त्वनिरूपणव्यसनिना चूर्णीकृतं नाश्मना ॥ ५ ॥

एका वानराच्या हातीं सहज माणिक लागलें असतां त्याशीं नाना तऱ्हेच्या चेष्टा करून त्याची त्यानें दुर्दशा केली. तें पाहून कोणी त्या माणिकास उद्देशून बोलतो—

" हे माणिका ! या वानरानें तुला हुंगून, तुझें पुनः पुनः चुंबन करून, तुला वारंवार चाटून, तुला चावून, तुझी योग्यता न जाणतां रागानें दूर फेंकून दिलें, याचा तूं खेद मानूं नकोस ! कां तर, हें तुझें भाग्यच समज कीं, आंत काय आहे तें पाहण्याकरितां दगड घेऊन त्यानें तुझा चुराडा करून टाकिला नाहीं ! "

ही अन्योक्ति आहे. कुपरीक्षकाशीं गांठ पडली असतां धडपणीं सुटून आलों म्हणजेच मोठी मिळविली म्हणून समजावें !

अद्यापि दुर्निवारं स्तुतिकन्या वहति कौमारम् ॥
सद्भ्यो न रोचते साऽसंतोऽप्यस्यै न रोचन्ते ॥ ६ ॥

गोवर्धनाचार्य—सप्तशती.

" स्तुति हीच कोणी कन्या ही अद्याप कुमारीच राहिली आहे; तिचें लग्नाचेंच कोठें जमत नाहीं !—जे तिला आवडतात ते तिला पत्करीत नाहींत; व ज्यांस ती आवडते ते तिला नकोत ! "

म्हणजे जे थोर पुरुष स्तुतीस वास्तविक पात्र असतात त्यांस आपली प्रशंसा कोणीं केलेली आवडत नाहीं; पण अंगीं कांहींच योग्यता नसूनही जे आपली शेखी चोहोंकडे मिरवूं पाहतात त्यांची कोणीच स्तुति करीत नाहींत. उलटा त्यांचा उपहास मात्र होत असतो.—थोडक्यांत खुबीदार अर्थ लिहिण्याची आचार्यांची शर्थ आहे.

जडास्तपोभिः शमयंति देहं बुधा मनः सर्वविकारहेतुम् ॥
श्वा मुक्तमस्त्रं दशतीह कोपान्मोक्तारमुद्दिश्य हिनस्ति सिंहः ॥७॥

" जे अज्ञान असतात ते तपश्चरण करून देहाचें शमन करतात; पण ज्ञाते पुरुष सर्व विकारांचें मूळ जें मन त्याचेंच दमन करतात. यास दृष्टांत. कुतऱ्यावर जर बाण टाकला तर तो त्या बाणासच रागानें चावूं लागेल; पण सिंह बाण सोडणारावर झेंप घालून त्यास ठार करून टाकील. " सारांश, कर्ममार्ग गौण; ज्ञानमार्ग श्रेष्ठ होय !

वाङ्माधुर्यान्नान्यदस्ति प्रियत्वं वाक्पारुष्याच्चोपकारोऽपि नष्टः ॥
किं तद्द्रव्यं कोकिलेनोपनीतं को वा लोके गर्दभस्यापराधः ॥८॥

" मधुर भाषणाप्रमाणें लोकांस वश करणारें कांहीं नाहीं व कर्कश भाषणानें केलेल्या उपकारासही कोणी विचारीत नाहीं. पहा बरें, कोकिल कोणास काय द्रव्य आणून देतो ? व गाढव कोणास काय उपद्रव करतें ? " पण पहिला केवळ गोड वाणीनें सर्वांस प्रिय होऊन राहिला आहे; व दुसरा साऱ्या जन्मभर लोकहितार्थ खपत असतांही एका द्वाड ओरडण्यानें सर्वांच्या तिरस्कारास पात्र झाला आहे !

खलसख्यं प्राङ्मधुरं वयोऽन्तराले निदाघदिनमंते ॥
एकाऽऽदिमध्यपरिणतिरमणीया साधुजनमैत्री ॥ ९ ॥

" दुष्टांची मैत्री पहिल्यानें गोड वाटते; मध्यें आयुष्याप्रमाणें चंचल असते आणि शेवटीं उन्हाळ्याच्या दिवसाप्रमाणें तापदायक होते. पण आरंभीं, मध्यें व शेवटीं अशा तिन्ही काळीं रमणीय अशी एक सज्जनांची मैत्री मात्र ! "

ऊर्णां नैष बिभर्ति नैष विषयो दोहस्य वाहस्य वा
तृप्तिर्नास्य महोदरस्य बहुभिर्घासैः पलालैरपि ॥
हा कष्टं कथमस्य पृष्ठशिखरे गोणी समारोप्यते
को गृह्णाति कपर्दकैरलमहो ग्राम्यैर्गजो हास्यते ॥ १० ॥

गांवढळ लोकांस हत्ती कोठून माहीत असावा ? त्यांनीं तो नव्यानेंच पाहिला असतां ते त्याचा उपहास करतात—

" अहो ! काय हो विलक्षण पशु हा ! याच्यापासून लोंकर सांपडायाची नाहीं; दूधही मिळावयाचें नाहीं; कीं बसायाच्याही हा उपयोगीं नाहीं ! याचें केवढें हो हें पोट ! गवत कोंडा यांचे ढीगचे ढीगही यास पुरेसे होणार नाहींत !—असो हेंही राहूं द्या; अं! ह्याला भक्कम म्हणून घेतला म्हटलें तरी या धुडाच्या पाठीवर गोणी हो कोणीं चढवावी !—छेः !—याला घेऊन काय करा ! कोणी दोन कवड्यांबारीही याला पुसणार नाहीं ! ! "

कस्त्वं लोहितलोचनास्यचरणो हंसः कुतो मानसात्
किं तत्रास्ति सुवर्णपंकजवनान्यंभः सुधासन्निभम् ॥
रत्नानां निचयाः प्रवाललतिका वैदूर्यरोहः क्वचित्
शंबूका न हि संति नेति च बकैराकर्ण्य हीहीकृतम् ॥ ११ ॥

एका डबक्याशीं बगळ्यांची मंडळी बसली असतां तेथें एक हंस आला; त्यास ते हालहवाल विचारतात—

" अरे ! तुझे डोळे, तोंड व पाय तिन्ही लाल आहेत असा तूं कोण पक्षी ? हंस उत्तर देतो—' मी हंस. ' ' कोठून आलास ? '—' मानस सरोवरापासून. ' ' तेथें काय काय असतें ? ' —' कोठें सोन्याचीं कमळें, कोठें अमृतासारखें गोड पाणी, कोठें रत्नांचे समुदाय, कोठें पोंवळ्याच्या वेली व कोठें पांचेचे अंकुर, असे जागोजाग आहेत ! ' ' बरें, पण किं-ड्यांच्या शिंपा आहेत काय ? '—' नाहीत. ' ' नाहींतना ! मग आहे काय तर तेथें ? ' असें म्हणून सर्वांनीं हा-हा-हा करून त्याचा उपहास केला ! "

धातस्तात समस्तयाचकविधौ वैरायसे सर्वथा
यस्माद्विक्रमशालिवाहनमहीभृन्मुंजभोजादयः ॥
अत्यंतं चिरजीविनो न विहिता ये विश्वजीवातवो
मार्कंडेध्रुवलोमशप्रभृतयः सृष्टाः प्रभूतायुषः ॥ १२ ॥

कोणी याचक ब्रह्मदेवास म्हणतो—

" बापा ब्रह्मदेवा ! आमच्या याचक मंडळीशीं तुझें मोठें वैर आहेसें दिसतें ! कां तर, विक्रम, शालिवाहन, मुंज, भोज इत्यादि जे जगाचा भार चालविणारे उदार राजे त्यांस चिरंजीव करायाचें टाकून मार्कंडेय, ध्रुव, लोमश, इत्यादिकांस—कीं ज्यांपासून कोणास कांहीं लभ्य नाहीं, अशांस मात्र आयुष्याची रगाडी करून ठेवली आहेस ! "

भद्रं कृतं कृतं मौनं कोकिलैर्जलदागमे ॥
दर्दुरा यत्र वक्तारस्तत्र मौनं हि शोभनम् ॥ १३ ॥

कवि म्हणतो—" पावसाळ्याच्या दिवसांत कोकिल मौन धरतात हें फार चांगलें करतात; कारण, जेथें बेडूक वक्ते झाले तेथें कोकिलांची काय शोभा राहिली ! " सारांश, मूर्ख लोकांच्या समाजांत पंडितांस मौनच उचित होय.

वयं काका वयं काका इति जल्पन्ति वायसाः ॥
तिमिरारेस्तमोहंतुः शंकातंकितमानसाः ॥ १४ ॥

चांदण्या रात्रीं कावळे ओरडतांना पाहून कवि त्या ओरडण्यावर उत्प्रेक्षा करतो—" कावळे का—का—का—असें ओरडताहेत ते चंद्राला असें सांगताहेत कीं, ' काकाः ! काकाः ! ' (आम्हीं कावळे ! आम्ही कावळे !) आम्ही अंधकार नाहीं ! नाहींतर अंधकाराबरोबर आमचेंही कांडात काढशील !"

सूकर—सिंह—संवाद.

सूकरः—**दश व्याघ्रा जिताः पूर्वं सप्त सिंहास्त्रयो गजाः**
पश्यंतु देवताः सर्वा अद्य युद्धं त्वया मम ॥
सिंहः—**गच्छ सूकर ! भद्रं ते ब्रूहि सिंहो मया जितः**
पंडिता एव जानंति सिंहसूकरयोर्बलम् ॥ १५ ॥

एका डुकराची आणि सिंहाची गांठ पडली. तेव्हां डुकर सिंहास म्हणतो– "अरे ! मीं पूर्वीं दहा वाघ, सात सिंह आणि तीन हत्ती जिंकले. आज तुझी बरी गांठ पडली ! होऊं दे युद्ध ! सर्व देवता तें आज पाहोत !"

सिंहानें उत्तर केलें—"अरे डुकरा ! तूं खुशाल जा आणि सर्वांस सांगत फीर कीं, 'मीं सिंहास जिंकिलें.' पंडितांस सिंहाचें व डुकराचें बळ किती असतें तें ठाऊक आहेच !"

विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषां परिपीडनाय ॥
खलस्य साधोर्विपरीतमेतज्ज्ञानाय दानाय च रक्षणाय ॥१६॥

मूर्ख व शाहणा यांमधील अंतर—"मूर्खास विद्या प्राप्त झाली, कीं तो ज्याशीं त्याशीं वादाला उभा राहतो; धन मिळालें, कीं गर्वानें ताठून जातो; अंगीं सामर्थ्य असलें, कीं दुसऱ्यास पीडा करूं लागतो. हा मूर्खाचा प्रकार झाला. आतां शहाण्याचा ऐका; तो वरच्याच्या अगदीं उलट–म्हणजे विद्येचा उपयोग तो ज्ञान समजतो; धनाचा दान व शक्तीचा दुर्बळाचें रक्षण."

अपूर्वः कोऽपि कोषोऽयं विद्यते तव भारति ॥
व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति संचयात् ॥ १७ ॥

"हे सरस्वति ! तुझें भांडार मोठें विचित्र आहे ! त्याचा जों जों खर्च करावा, तों तों तें वाढत जातें; व जों जों राखून ठेवूं लागावें, तों तों तें कमी होत जातें !"

यस्मादासीत्कुमारः कुवलयदलवल्लीलयोवाह गंगां
वामा यस्यांगसंगा पिहितजनचयो यो गवीशध्वजोऽपि ॥
लंकेशाद्येकनाथो हिमकररुचिभृद्भूविशेषाश्रयोऽसौ
वर्णस्याऽद्यस्य लोपादपहरतु हरिः पातकं वः स्मरारिः ॥१८॥*

या श्लोकांत विष्णूचें व शिवाचें वर्णन आहे. नुसता श्लोक घेतला तर शिवाचें, व पहिलें अक्षर काढून टाकलें असतां तेंच विष्णूचें वर्णन होतें:—

"ज्यापासून कुमार कार्तिकस्वामी; (मार मदन) झाला; ज्यानें कमलपत्राप्रमाणें भूषणार्थ सहज गंगा धारण केली आहे, (गां– पृथ्वीतें

* या श्लोकांतील कांहीं पदें क्लिष्ट कल्पनेनें बसवावीं लागतात, त्याचा विचार रसिकांनीं करावा.

[वराहावतारीं] धारण केली); ज्यानें वामा म्हणजे पार्वती अर्धांगीं धरिली आहे, (मा—लक्ष्मी ज्याच्या जवळ आहे); ज्यानें लोकसमुदाय आच्छादित आहे—म्ह० संहार केला आहे, (ज्यानें लोकांचें कल्याण केलें आहे.); ज्याचा ध्वज गवीश म्ह० नंदी, (वीश—गरुड) आहे; जो लंकेशादिकांचा म्ह० रावण, बाणासुर इत्यादिकांचा, (ब्रह्मदेव शंकरादिकांचा) एक नाथ होय; व जो चंद्रकांतीप्रमाणें शुभ्र असा भूविशेष म्हणजे कैलासाचा आश्रय करतो, (मकर म्हणजे मगर त्यांच्या प्रेमास आश्रय जो भूविशेष म्हणजे समुद्र त्याचा आश्रय करतो); तो शिव (आणि विष्णु) तुमच्या पातकाचें हरण करो. "

स्वर्धुनि तव महिमानं वक्तुमनीशः फणीशोऽपि ॥
वितरसि यत्पदमच्युतमच्युतपदविच्युताऽपि त्वम् ॥ १९ ॥

कवि गंगेस म्हणतो—" हे स्वर्गनदि ! तुझा महिमा सहस्रमुख जो शेष त्याच्यानेंही वर्णवणार नाहीं ! कां कीं, तूं स्वतः अच्युतपदापासून (विष्णूच्या पायापासून) पडली आहेस तरी अच्युतपद (अढळस्थान) देतेस ! "

गुरुरेकः कविरेकः सदसि मघोनः कलाधरोऽप्येकः ॥
अद्भुतमत्र सभायां गुरवः कवयः कलाधराः सर्वे ॥ २० ॥

कवि कोणा राजाची सभा वर्णितो—" इंद्राच्या सभेंत गुरु (बृहस्पति) एक, कवि (शुक्राचार्य) एक, आणि कलाधर (चंद्र) ही एकच; पण या सभेंत पहा ! सर्व पंडित गुरु, कवि आणि कलाधर (कलांत निपुण) आहेत ! "

भारतं चेक्षुदंडं च कलानाथं च वर्णय ॥
कालिदासः कविर्ब्रूते प्रतिपर्वरसावहम् ॥ २१ ॥

भोजराजानें कालिदासास म्हटलें, " कविराज ! भारत, इक्षुदंड (ऊंस), आणि चंद्र, या तिहींचें एकदम वर्णन करा. " कवीनें उत्तर केलें— " तिहींचा रस प्रतिवर्षी चढतो. "—' पर्व ' शब्द श्लिष्ट आहे; त्याचा पहिला अर्थ प्रसिद्ध आहेच, दुसरा ' पेर, ' आणि तिसरा ' पर्वणी. '

विद्यायां दुर्मदो यस्य कार्पण्यं विभवे सति ॥
तेषां दैवाभिशप्तानां सलिलादग्निरुत्थितः ॥ २२ ॥

“ ज्यांस विद्येपासून दुर्मद म्हणजे दुष्ट गर्व आणि संपत्तिपासून कृपणपणा जडतो, त्यांस दैवानें शापच दिला असें समजावें ! पाण्यापासून अग्नि निघून जसा मनुष्य भाजावा, त्याप्रमाणेंच वरील दोघां हतभाग्यांची स्थिति होय !”

असाधुः साधुर्वा भवति खलु जात्यैव पुरुषो
न संगाद्दौर्जन्यं न च सुजनता कस्यचिदपि ॥
प्ररूढे संसर्गे मणिभुजगयोर्जन्मजनिते
मणिर्नाहेर्दोषान्स्पृशति न च सर्पो मणिगुणान् ॥ २३ ॥

“ पुरुष जो सज्जन किंवा दुष्ट होतो तो जातीनेंच म्हणजे स्वभावेंकरूनच असतो; दुसऱ्याचें दौर्जन्य किंवा सौजन्य कोणास संगतीनें लागत नाहीं. पहा कीं, सर्प व त्याच्या शिरींचा मणि यांचा सहवास सऱ्या जन्मभर असतो; पण त्या रत्नास सर्पाचे दोष लागत नाहींत व सर्पासही रत्नाचे गुण लागत नाहींत. ”

हे दारिद्र्य नमस्तुभ्यं सिद्धोऽहं त्वत्प्रसादतः ॥
पश्याम्यहं जगत्सर्वं न मां पश्यति कश्चन ॥ २४ ॥

कोणी दरिद्र कवि दारिद्र्यास उद्देशून मौजेनें म्हणतोः—“ हे दारिद्र्या ! तुझा काय प्रभाव सांगावा ! तुझ्या कृपेनें मी सिद्ध झालों आहे ! कसा म्हणशील तर मी सर्व जगास पाहत असतां मला कोणी पाहत नाहीं ! ” तात्पर्य हें कीं, गरीब मनुष्यास कोणी पुसत नाहीं.

इतरपापफलानि यथेच्छया वितर तानि सहे चतुरानन ॥
अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख २५

“ हे ब्रह्मदेवा ! मीं जीं पातकें केलीं असतील त्यांचीं इतर फळें तूं मला खुशाल दे, तीं मी सोशीन. पण एक मात्र माझ्या कपाळीं नको—नकोच लिहूं. तें येवढें दुःसह काय ?—अरसिकापाशीं कवित्व निवेदन, म्हणजे कवितेचा रस समजून देणें ! ” आमच्या वाचकांपैकीं कोणासही वरील श्लोक न लागो म्हणजे झालें !

परिचरितव्याः संतो यद्यपि कथयंति नो सदुपदेशम् ॥
यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवंति शास्त्राणि ॥ २६ ॥

“ सत्पुरुषांनीं साक्षात् उपदेश जरी केला नाहीं, तरी त्यांच्या सहवासानें

नेहमीं असावें, कां कीं, त्यांचें जें सहज बोलणें तें सुद्धां मोठें अर्थ-युक्त असतें ! ”

तावन्मौनेन नीयंते कोकिलैश्चैव वासराः ॥
यावत्सर्वजनानंददायिनी वाक् प्रवर्तते ॥ २७ ॥

“ कोकिल तोंपर्यंत मौनच धरून दिवस घालवितात, कीं जोंपर्यंत सर्व जनांस आनंद देणारी वाणी त्यांस प्राप्त झालेली नसते ! ” ही अन्योक्ति आहे. जोंपर्यंत लोकांत मोठेपणा मिळविण्याची शक्ति आपले ठायीं आली नसते, तोंपर्यंत चतुर पुरुष अप्रसिद्धच राहतात.

परिपीय तदीयमोष्ठबिम्बं वचनानि स्खलयन्नुपागतोऽसि ॥
उचितं तदिदं मुकुंद मन्ये रसना बिंबफलेन जाड्यमेति ॥ २८ ॥

राधेच्या घरून आपणाकडे आलेल्या कृष्णास सत्यभामा म्हणते—“ हे मुकुंदा ! तिच्या अधराचें पान करून तूं मजकडे आला आहेस हें मी समजलें ! कशावरून म्हणशील, तर तुझ्या अडखळण्यावरून, भलतेंच बोलण्यावरून ! तोंडल्यानें जीभ जड होते हें सर्वांस माहीत आहे !

एकं वस्तु द्विधा कर्तुं बहवः संति धन्विनः ॥
जयत्येकः स्मरो धन्वी द्वैतमेकी करोति यः ॥ २९ ॥

कोणी कवी मदनाचा प्रभाव वर्णितो:—“ एका वस्तूच्या दोन करणारे पुष्कळ धनुर्धर आहेत. पण दुजेपण मोडून दोहोंस एक करणारा असा धनुर्धर एक कामच ! ”

संगमविरहविकल्पे वरमिह विरहो न संगमस्तस्याः ॥
संगे सैव यदैका त्रिभुवनमपि तन्मयं विरहे ॥ ३० ॥

“ तिच्याशीं (आवडत्या स्त्रीशी) संगम किंवा विरह यांतून तुला कोणतें हवें म्हणून जर मला कोणीं विचारलें, तर मी विरह बरा, संगम नको असें सांगेन ! कां कीं, समागम झाला असतां ती एकटीच मला मिळणार; पण जर विरह घडला, तर अवघ्या त्रिभुवनांत ती मला जिकडे तिकडे दिसेल ! ”

बंधनानि खलु संति बहूनि प्रेमरज्जुदृढबंधनमाहुः ॥
दारुभेदनिपुणोऽपि षडंघ्रिर्निष्क्रियो भवति पंकजकोशे ॥ ३१ ॥

" बंधनें अनेक आहेत खरीं; पण सर्वांत प्रेमरज्जूचें बंधन अत्यंत दृढ होय. पहा बरें ! भ्रमर हा लांकडांचीं लांकडें फोडून काढतो, पण कमळाच्या गाभ्यांत त्याचें कांहीं चालत नाहीं. "

जातः स्तन्यं न जग्राह कंठीरवकिशोरकः ॥
चक्षुर्व्यापारयामास कुंजे कुंजरशालिनि ॥ ३२ ॥

" सिंहाचा बच्च्या उपजतांच आईचें दूध प्याला नाहीं, अगोदर हत्तींच्या कुंजाकडे त्यानें दृष्टि फेंकली ! "

गृह्णात्येष रिपोः शिरः प्रजविनः कर्षत्यसौ वाजिनम्
धृत्वा चर्म धनुः प्रयाति पुरतः संग्रामभूमावपि ॥
द्यूतं चौर्यकथां तथा च शपथं कुर्यान्न वामः करो
दानानुद्यमतां विलोक्य विधिना शौचाधिकारीकृतः ॥३३॥

एके समयीं कोणा एका राजाचे दोन्ही हात धरून दोघे कवी फिरत होते. तेव्हां एकेकानें आपआपल्या हाताचें वर्णन आरंभलें. डावा हात धरून जो चालला होता तो म्हणाला—

" हा हात शत्रूचें शिर धरतो, तसेंच घोड्याचा लगाम धरून त्यास अटकावांत ठेवतो, आणि रणभूमीवर ढाल किंवा धनुष्य घेऊन हाच चालतो.—इतकेंच नव्हे; तर उजव्या हाताचे अवगुणही यांत नाहींत—हा डावा हात द्यूत खेळत नाहीं, चोरी करीत नाहीं, अथवा शपथही वाहात नाहीं. " दुसऱ्या कवीनें हें सर्व ऐकून घेतलें, आणि थोडेंच उत्तर केलें कीं, " हें सर्व खरें, पण दानकर्मास हा अयोग्य जाणून विधात्यानें त्याची योजना—कडे केली आहे. " हा श्लोक एरवीं फार उत्कृष्ट आहे; पण शेवटल्या पदाच्या अश्लीलत्वानें याची थोडीशी खराबी झाली.

तिर्यक्तां भजतु प्रतारयतु वा धर्मक्रियाकोविदम्
हंतु त्वां जननीं पिबत्वपि सुरां शुद्धां वधूमुज्झतु ॥

वेदान्निंदतु वा हिनस्तु जनतां किंवाऽनया चिंतया
लक्ष्मीर्यस्य गृहे स एव भजति प्रायो जगत्पूज्यताम् ॥ ३४ ॥

ह्या श्लोकांत विष्णूच्या दहा अवतारांस उद्देशून कवीनें असें मौजेनें दाखविलें आहे कीं, मनुष्यापाशीं संपत्ति असली म्हणजे तिच्या आड सारे अवगुण लपून जातात.—" मनुष्य पशूसारखीं कर्मे करो, धार्मिक मनुष्यास नाडून त्यास तोंडघशीं पाडो, आपल्या आईचा वध करो, सुरापान करो, निरपराध स्त्रीस टाकून देवो, वेदांची निंदा करो, लोकांस मारो,—कांहीं करो, त्यापाशीं लक्ष्मी (पक्षीं, संपत्ति) असली म्हणजे जगास तो पूज्य (पक्षीं, आदरास पात्र) व्हावयाचाच ! "

गुरवो बहवः संति शिष्यवित्तापहारकाः ॥
दुर्लभः स गुरुर्लोके शिष्यचित्तापहारकः ॥ ३५ ॥

" शिष्याच्या वित्तांचें अपहरण करणारे गुरु पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ आहेत; पण असा गुरु थोडा, कीं जो शिष्याच्या चित्ताचें अपहरण करतो !"

सुखार्थी च त्यजेद्विद्यां विद्यार्थी च त्यजेत्सुखम् ॥
सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥ ३६ ॥

" ज्याला सुख म्हणजे चैन हवी असेल त्यानें विद्या सोडून द्यावी; व ज्यास विद्या हवी असेल त्यानें सुख सोडून द्यावें. कारण ज्यास सुख हवें त्यास विद्या कोठची ? व ज्यास विद्या पाहिजे त्यास सुख कोठचें ? "

अर्थातुराणां न पिता न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा ॥
क्षुधातुराणां न बलं न तेजश्चिंतातुराणां न सुखं न निद्रा ॥ ३७ ॥

" पैशाकरितां जे लोकांच्या मुंड्या मुरगाळणार त्यांस बाप नाहीं व भाऊही नाहीं; जे कामांध झाले त्यांस भय नाहीं; व लज्जाही नाहीं; जे नेहमीं बुभुक्षित असणार त्यांस बल नाहीं व तेजही नाहीं; आणि जे चिंतेनें व्यापले त्यांस सुख नाहीं व निद्राही नाहीं. "

कृतांतो वा कांतः समजनि न भेदः प्रथमत-
स्ततो द्वित्रैर्मासैर्मनुज इति जग्राह हृदयम् ॥
ततोऽसौ मत्प्रेयानहमपि तदीया प्रियतमा
क्रमाद्वर्षे प्राप्ते प्रियतममयं जातमखिलम् ॥ ३८ ॥

कोणी तरुण स्त्री आपल्या मनाच्या निरनिराळ्या वृत्ति आपल्या सखीस निवेदन करिते—“ जेव्हां माझी पहिल्यानें गांठ पडली तेव्हां कांत (नवरा) कीं कृतांत (यम) यांत मला भेद वाटत नसे; पुढें दोन तीन महिन्यांनीं तो आपल्या सारखाच मनुष्य आहे असें मला वाटूं लागलें; त्यानंतर तो माझा प्रियकर आणि मी त्याची आवडती स्त्री असें माझ्या बुद्धीस वागूं लागलें; आणि हळू हळू वर्षे होत आलें तेव्हां तर सर्व त्रिभुवनांत तो मला दिसूं लागला ! ”

राममत्स्यसंवादः—

राम:—**पश्य लक्ष्मण पंपायां बकः परमधार्मिकः ॥**
शनैर्मुंचति पादाग्रं प्राणिनां वधशंकया ॥ ३९ ॥
मत्स्यः—**सहवासी विजानाति सहवासिविचेष्टितम् ॥**
बकः किं वर्ण्यते राम येनाहं निष्कुलीकृतः ॥ ४० ॥

राम व लक्ष्मण सीतेचा शोध करीत पंपासरोवराशीं आले. तेव्हां तेथील अपूर्व शोभा पहात असतां राम लक्ष्मणास म्हणतो:—“ हे लक्ष्मणा ! पहा, या पंपासरोवरांत बगळेही केवढे धार्मिक आहेत ते ! तो बगळा पहा, पाया-खालीं एखादा जीवजंतु चिरडेल या शंकेनें कसे हळू हळू पाय टाकतो आहे ते!”

हें भाषण ऐकून एक मासा रामास म्हणतो:—हे रामा ! कोणाची वागणूक कशी आहे हें त्याच्या शेजाऱ्यास पुसावें ! अरे, तूं या बगळ्यास मोठा धार्मिक, मोठा हिंसाभीरु म्हणून मानतोस ! यानेंच माझें कुळ चट खाऊन टाकून मला एकटें ठेवलेना ! ”

हा संवाद ‘ रामायणां ’ तलाच आहे किंवा दुसऱ्या कोणीं कवीनें केला आहे कोण जाणे ? पण कोठलाही असला, तरी हा फार बहारीचा आहे यांत संशय नाहीं. यांत एक तर त्या काव्यप्रसिद्ध रम्य सरोवराचें थोडक्यांत मजेदार वर्णन आहे; आणि शिवाय मनुष्य आपल्याच हृदयवृत्तींवरून दुसऱ्यांच्या वृत्तींचें मान नेहमीं कसें करीत असतो याचेंही हें खुबीदार उदाहरण होय. तसेंच या पद्याची रचनाही अगदीं साधी असून सुंदर असल्यामुळें मागें सांगितलेल्या अत्युत्तम काव्याचाच हाही आणखी एक मासला होय.

अनंतरत्नप्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम् ॥
एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः ॥४१॥

कुमारसंभव. १

कालिदास हिमालयाच्या वर्णनांत म्हणतोः—" या पर्वतांत अगणित रत्नें निपजतात, यास्तव यावर जरी चोहोंकडे बर्फ पडलें आहे तरी येवढ्यानेंच याच्या रम्यतेची हानि होत नाहीं; कां तर ज्याप्रमाणें चंद्राच्या प्रभेंत त्याचा डाग लपून जातो, त्याप्रमाणें गुणांच्या समुदायांत एक दोष लोपून जाऊन दिसेनासा होतो. "

याच्यावर दुसऱ्या एका कवीनें कोटी केली आहे.–

एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोरिति यो बभाषे ॥
नूनं न दृष्टं कविनाऽपि तेन दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी ४२

हा कवी दरिद्री असावा असें दिसतें. तो म्हणालाः—" गुणसमुदायांत एक दोष लपून जातो " इत्यादि ज्यानें लिहिलें त्याच्या नजरेंतून स्वतः कवि असतांही * येवढें चुकलें असावें कीं, " एक दारिद्र्यदोष असला म्हणजे तो सर्व गुण लोपवून टाकतो ! " तस्मात् वरील नियम सर्वथैव खरा म्हणतां येत नाहीं.

पृथ्वी तावदियं महत्सु महती तद्वेष्टनं वारिधिः
पीतोऽसौ कलशोद्भवेन मुनिना स व्योम्नि खद्योतवत् ॥
तद्विष्णोः परमं पदं कलयतः पूर्णं पदं नाभवत्
त्सोऽपि त्वद्धृदि वर्तते खलु भवंस्त्वत्तः परः को महान् ॥४३॥

कोणी कवी कोण्या भगवत्परायण साधूस म्हणतोः—" हे महापुरुषा ! तुझ्याहून थोर कोण आहे ?—कसें म्हणशील तर पहा. ही पृथ्वी अगोदर मोठ्यांत मोठी म्हणजे फार विस्तीर्ण आहे; तिचें वेष्टन समुद्र; त्या समुद्रास ज्यानें पिऊन टाकिलें तो अगस्त्य मुनि † आकाशांत केवळ काजव्याप्रमाणें आहे; तें येवढें अवाढव्य आकाश विष्णूच्या एका पावलास पुरलें नाहीं; पण

---

* ' जे न देखे रवि ते देखे कवी ॥ ' अशी मराठींत म्हण आहे.

† (अगस्तीचा) तारा दक्षिणगोलार्धांत आहे. तो मार्गशीर्षापासून सहा महिने संध्याकाळीं दक्षिणेकडे दिसत असतो.

येवढा व्यापक परमेश्वर असतां तो तुझ्या हृदयांत वास करतो ! तेव्हां तूं केवढा मोठा ! ! " या अलंकारास संस्कृतांत सार व इंग्रजींत Climax म्हणतात.

अर्थो गिरामपिहितः पिहितश्चकश्चित्
सौभाग्यमेति मरहट्टवधूस्तनाभः ॥
नो गुर्जरीस्तन इवातितरां निगूढो
नांध्रीपयोधर इवातितरां प्रकाशः ॥ ४४ ॥

जगन्नाथराय.

कवितेचा अर्थ कसा असावा याविषयीं पंडितराय लिहितातः—

" मरहट्ट (मारवाडी) स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें जेव्हां काव्याचा अर्थ धड उघडा नाहीं धड झांकलेलाही नाहीं असा असतो, त्या वेळेस फार शोभतो; पण जेव्हां गुर्जरीस्तनाप्रमाणें तो अत्यंत गूढ असतो, किंवा आंध्री*-स्तनाप्रमाणें अगदीं उघड असतो, तेव्हां तो तसा शोभत नाहीं. "

कल्पांतक्रूरकेलिः क्रतुकदनकरः कुंदकर्पूरकांतिः
क्रीडन्कैलासकूटे कलितकुमुदिनीकामुकः कांतकायः ॥
कंकालक्रीडनोत्कः कलितकलकलः कालकालीकलत्रः
कालिंदीकालकंठः कलयुत कुशलं कोऽपि कापालिको नः ४५

" तो योगिश्रेष्ठ आमचें कल्याण करो.—जो कल्पांतीं भयंकर क्रीडा करतो, ज्यानें यज्ञाचा (दक्षाच्या) विध्वंस केला, ज्याची कांति कुंदपुष्पाप्रमाणें व कापुराप्रमाणें आहे, जो कैलासाच्या शिखरावर क्रीडा करतो, ज्यानें चंद्र धारण केला आहे, ज्याचें शरीर सुंदर आहे, जो (स्मशानीं) प्रेतास्थीशीं रमतो, जो अट्टहास करतो, ज्याचें कलत्र काळी जी काली ती आणि ज्याचा गळा यमुनेप्रमाणें काळा आहे. " या शब्दालंकारास प्रास म्हणतात.

क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितम्
क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः ॥
क्वचिद्रम्या रामाः क्वचिदपि गलत्कुष्ठवपुषो
न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ॥ ४६ ॥

---

* आंध्रदेश दक्षिण हिंदुस्थानांत आहे. त्याचें आतांचें नांव तेलंगण आहे.

कवी संसाराची सुखदुःखविचित्रता वर्णितोः—“ अहो ! हा संसार विषमय आहे, कीं अमृतमय आहे याचा मला निश्चय होत नाहीं ! कोठें पहावें तों सतार झडते; कोठें विलापाचा स्वर कानीं येतो; कोठें विद्वज्जनांचा समुदाय विनोदांत रमलेला दिसतो; कोठें दारू पिऊन मस्त झालेल्यांचा कल्ला ऐकूं येतो; कोठें रम्य स्त्रिया असतात; आणि कोठें त्याच रोगग्रस्त दृष्टीस पडतात. तस्मात् संसार मोठा विचित्र आहे ! ”

यः पूतनामारणलब्धकीर्तिः काकोदरो येन विनीतदर्पः ॥
यशोदयालंकृतमूर्तिरव्यात्पतिर्यदूनामथवा रघूणाम् ॥ ४७ ॥

या एकाच श्लोकांत श्लेषद्वारा कृष्णाचें व रामाचें वर्णन केलें आहेः—

(रामपक्षीं) “ ज्याचें नांव पुण्यप्रद आहे, ज्यानें रणांत कीर्ति मिळविली, ज्यानें काकोदराचा (विशेषनाम आहे कीं, काय कोण जाणें !) गर्व शमविला, ज्याची मूर्ति यश व दया यांहीं अलंकृत आहे, तो रघुपति तुमचें रक्षण करो.

“ (कृष्णपक्षीं) जो पूतनेच्या वधानें प्रसिद्ध झाला आहे, ज्यानें सर्पाची (कालियाची) खोड मोडली, ज्यास यशोदेनें नटवला आहे, असा यदुपति—” अशा श्लेषास सभंगश्लेष म्हणतात.

करवालकरालवारिधारा यमुना दिव्यतरंगिणी च कीर्तिः ॥
तव कामद तीर्थराज दूरादनुबध्नाति सरस्वती कवीनाम् ॥४८॥

कोणी कवि राजास उद्देशून म्हणतोः—“ हे उदार राजा ! तुझ्या तरवारीची तीव्र धार हीच (काळेपणामुळें) यमुना होय; तुझी कीर्ति ही (शुभ्रत्वास्तव) भागीरथी होय, व यास्तवच कवींची सरस्वती (वाणी-पक्षीं, या नांवाची नदी) ही दुरून तुजकडे येऊं पाहते, कांतर, तूं तीर्थराज म्हणजे प्रयागक्षेत्र आहेस ! ”

खद्योतो द्योतते तावद्यावन्नोदयते शशी ॥
उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः ॥ ४९ ॥

“ जोंपर्यंत चंद्र उगवला नाहीं तोंपर्यंत काजव्याची चमक; आणि सहस्रकिरण जो सूर्य तो उगवला म्हणजे तर काजवाही एकीकडे राहतो व

चंद्रही एकीकडे राहतो. " ही अन्योक्ति आहे. एकाहून एक वरचढ गुणी आले असतां मागले निस्तेज होऊन जातात !

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः ॥
करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ॥ ५० ॥

सज्जन पुरुषांचें यांत पूर्ण वर्णन आहे:—" ज्यांचें मुख नेहेमीं प्रफुल्लित, हृदय कोमळ, वाणी अमृत स्रवणारी, शरीर परोपकारार्थ सतत झिजणारें, असे जे पुरुष असतील ते कोणास वंद्य नव्हेत ? " या आर्येंत सर्वत्र अनुप्रास आहे.

(५०) कोणी कवि विक्रम राजाच्या सभेस जाऊन त्यानें हीं सुभाषितें त्या राजापुढें म्हटलीं:—

सर्वदा सर्वदोऽसीति त्वं मिथ्या स्तूयसे बुधैः ॥
नारयो लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥ १ ॥

" हे राजा ! तूं सर्वकाळ सर्वांचें दान करीत असतोस ही तुझी मिथ्या स्तुति कवि गातात ! कां तर, आजपर्यंत शत्रूंस तूं कधीं पाठ दिली नाहींस, व परस्त्रियांस तुझें वक्षस्थळही कधीं लाधलें नाहीं. " हा व्याजनिंदा अलंकार होय.

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः ॥
मार्गणौघः समभ्येति गुणो याति दिगंतरम् ॥ २ ॥

" हे राजा ! तूं ही अपूर्व धनुर्विद्या कोणापाशीं शिकलास ? चमत्कार काय कीं, मार्गणांचा (बाणांचा, पक्षीं याचकांचा समुदाय तुजकडे येतो; आणि गुण (धनुष्याची दोरी, पक्षीं कीर्ति) दिगंतरास जातो ! " तेव्हां हा व्यापार धनुष्याच्या नेहेमींच्या व्यापाराहून अगदीं उलट झाला !—श्लेष काढला असतां अर्थात् सर्व ठीकच आहे.

सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहे ॥
राजेंद्र कुपिता कीर्तिस्तेन देशांतरं गता ॥ ३ ॥

" हे राजा ! सरस्वती तुझ्या कंठाशीं वास करते आहे, (पक्षीं कंठालिंगन करते आहे); आणि लक्ष्मी तुझ्या हस्तकमलाच्या ठायीं आहे—म्हणजे तूं मोठा दानशूर आहेस, (पक्षीं, लक्ष्मीचें करांनीं लालन करितो आहेस); यास्तव कीर्तीस (सवतीमत्सरास्तव) राग येऊन ती (झिटकाऱ्यानें तुला टाकून) देशांतरास रुसून गेली ! " काय चमत्कारिक अर्थ वर्णिला आहे !

हे तिन्ही श्लोक विक्रमबात्तिशींत आहेत. तींत असें लिहिलें आहे कीं, या श्लोकांनीं राजा प्रसन्न होऊन गेला कीं, प्रत्येक श्लोकाबरावर एकेक दिशेचें राज्य त्यानें त्या कवीस बक्षीस केलें.---वस्तुतः पहातां, त्यांची योग्यता खरोखरच तशी आहे ! !

न नीतमुपनासिकं परिमलव्ययाशंकया
न हंत विनिवेशितं विरहवन्हिकुंडे हृदि ॥
दृशोर्बहिरिति श्रुतौ न निहितं प्रियप्रेषितम्
करे कमलमर्पितं मृगदृशा दृशा पीयते ॥ ५१ ॥

एका स्त्रीस तिच्या प्रियकरानें एक कमल पाठवून दिलें. तेव्हां तिनें त्याची याप्रमाणें व्यवस्था केली:---" तें तिनें नाकाशीं नेऊन त्याचा वास घेतला नाहीं. कां तर तशानें त्याचा सुगंध कमी होईल या भयानें; तें तिनें आपल्या हृदयांत खोंवलें नाहीं, कां तर विरहाग्नीच्या धगीनें तें न जाणों कोमेजून जाईल म्हणून; तसेंच तें तिनें आपल्या कानावरही ठेविलें नाहीं,-- डोळ्याआड होतें म्हणून. तर केलें काय ?--तें त्या मृगनयनेनें आपल्या हातांत घेऊन त्याचें दृष्टीनें प्राशन करीत राहिली. " नाजुक शृंगाराचा हा एक उत्कृष्ट मासला होय !

गुणानामज्ञाता प्रचुरधनदाताऽपि न मुदे
मुदे विद्याज्ञाता भवति मितदाताऽपि गुणिनाम् ॥
दृशौ ग्राम्या दत्ते न पुनरवधत्ते च चतुरो
दृशः प्रांतं दत्त्वा वशयति नितांतं पुरवधूः ॥ ५२ ॥

" पुष्कळ धन देतो खरा, पण ज्यास गुण कळत नाहीं तो धनी गुणिजनांस आनंदप्रद होत नाहीं; आणि बक्षीस थोडेंच का देईना, पण ज्यास मनुष्याच्या आंगांतली करामत समजते त्याच धन्यास ते राजी होतात. कसें ?--तर जशी ग्राम्य स्त्री ही जाणाऱ्या पुरुषाकडे डोळे भरून पहाते, पण चतुर पुरुष तिजकडे लक्षसुद्धां देत नाहीं; पण नगरांतील स्त्री डोळ्याचा किंचित् कोपरा त्याकडे करते, पण मन वेधूनच टाकते ! " सारांश, खरा परीक्षक भेटला म्हणजे गुणांचें चीज होतें.

मम प्रेम तवौदास्यं स्पर्धया वर्धते द्वयम् ॥
जेतव्यमनयोः केन न जाने पंकजानने ॥ ५३ ॥

कोणी कामी आपल्या मनांत भरलेल्या स्त्रीस उद्देशून म्हणतो:—

"हे कमलानने ! माझें तुजवरचें प्रेम आणि तुझें मजविषयीं औदासीन्य हीं जणों काय चढाओढीनें वाढताहेत. आतां या दोहोंतून कोणाची सरशी होईल तें मला समजत नाहीं !"

श्रीवर्धनकरो राजा मंत्री तु पटवर्धनः ॥
तथाऽपि श्रीः पटो नास्ति वाग्वर्धनकरस्य मे ॥ ५४ ॥

कोणी कवी पेशव्यांच्या दरबारीं आला असतां गादीस उद्देशून म्हणतो:—

"राजा श्रीवर्धनकर, (लक्ष्मीचें वर्धन करणारा, पक्षीं, श्रीवर्धनचा मूळचा राहणारा,) आणि मंत्री पटवर्धन (वस्त्रांची वृद्धि करणारा, पक्षीं, आडनांव), तरी वाग्वर्धनकरास (बहुभाषण करणारास, पक्षीं बावधनकरास) मला श्री (संपत्ति) नाहीं व पट (वस्त्र) ही नाहीं !"

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतम् ॥
बांधवाः कुलमिच्छंति मिष्टान्नमितरे जनाः ॥ ५५ ॥

विवाहसमयीं निरनिराळ्या पक्षांचे कसकसे मनोरथ असतात ते यांत दाखविले आहेत:—"कन्येस नवरा रूपवान् असावा येवढीच इच्छा असते; तिच्या आईस तो घरचा संपन्न असला म्हणजे झालें; बापाचें पाहणें त्याच्या केवळ विद्येवर असतें; आप्तांच्या मनांत तो कुलीन असावा इतकेंच असतें; आणि बाकीच्या लोकांस चार दिवस चमचमीत भोजन असलें म्हणजे झालें."

मंडले गंडलाकारो रेखा वाजिमयी जवे ॥
सव्यापसव्ये द्विमुखो नकुलाधिष्ठितो हयः ॥ ५६ ॥

पांडवांतला चौथा नकुळ अश्वविद्येंत मोठा निपुण होता. तो विराटराजाच्या पदरीं ग्रंथिक नाम धारण करून राहिला होता, हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच. त्याच्या कौशल्याविषयीं कोणी कवि म्हणतो:—

"नकुळानें घोड्याकडून जेव्हां रंगण घेववावें तेव्हां तो घोडा वर्तुलच आहे काय असा भास होई; जेव्हां समोर सारखा काढावा, तेव्हां घोड्यांची,

एक लांबच लांब रेघ दिसे; डावी उजवीकडे फिरवी, तेव्हां घोड्यास दोन तोंडें आहेत काय असा भास व्हावा ! ”

असंमुखालोकनमाभिमुख्यं निषेध एवानुमतिप्रकारः ॥
प्रत्युत्तरं मुद्रणमेव वाचो नवांगनानां नव एव पंथाः ॥ ५७ ॥

कवि नूतन वधूंचा प्रकार वर्णितोः—“नुकताच ज्यांचा विवाह झाला अशा नूतन स्त्रियांची रीतही नवीन म्हणजे मोठी विचित्र असते ! ती अशी कीं, त्यांचें दुसरीकडे बघणें म्हणजेच नवऱ्याकडे बघणें, नको म्हणणें म्हणजेच रुकार देणें, आणि मुकस्तंभ राहणें म्हणजेच प्रत्युत्तर देणें ? ” अशाच अर्थाचे एक दोन श्लोक ‘ शाकुंतल ’ नाटकाच्या पहिल्या दुसऱ्या अंकांत आहेत ते आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस माहीत असतीलच.

कमलभूतनया वदनांबुजे वसतु ते कमला करपल्लवे ॥
वपुषि ते रमतां कमलांगजः प्रतिदिनं हृदये कमलापतिः ॥५८॥

कोणी कवि राजास आशीर्वाद करतोः—“ हे राजा, तुझ्या मुखाचे ठायीं कमलभूतनया (सरस्वती) वास करो; हस्ताचे ठायीं कमला (लक्ष्मी) वास करो; तुझ्या शरीराचे ठायीं कमलांगज (मदन) विहार करो, आणि हृदयाचे ठायीं नेहमीं कमलापति (विष्णु) वास करो. ” सारांश; वक्तृत्व, दातृत्व, सौंदर्य आणि भक्ति हीं तुझे ठायीं नांदोत.

त्यजंति शूर्पवद्दोषान्गुणान्गृह्णन्ति साधवः ॥
दोषग्राही गुणत्यागी चालनीरिव दुर्जनः ॥ ५९ ॥

“ सज्जन रसिक जे असतात ते सुपाप्रमाणें ग्रंथांतील दोष टाकून गुण तेवढे ग्रहण करतात; आणि दुर्जन असतात ते चाळणीप्रमाणें गुण गाळून टाकून दोष तेवढे घेतात. ”

मीनः स्नानरतः फणी पवनभुङ् मेषस्तु पर्णाशनो
नीराशः खलु चातकः प्रतिदिनं शेते बिले मूषकः ॥
भस्मोद्धूलनतत्परः खलु खरो ध्यानाधिरूढो बकः
सर्वे किं ननु यांति मोक्षपदवीं ज्ञानप्रधानं तपः ॥ ६० ॥

“ मासा नेहमीं पाण्यांत डुंबतो, साप वारा पितो, मेंढा पानें खाऊन

राहतो, चातक नुसतें पाणी पितो, उंदीर नेहमीं बिळांत एकांतवासी असतो, गाढव राखेनें भरलेला असतो, आणि बगळा ध्यान लावून बसतो,——मग हे सर्व मोक्षास जातात काय ? तेव्हां तपश्चरण ज्ञानाशिवाय व्यर्थ होतें. ”

यद्यपि बहु नाधीषे तथाऽपि पठ पुत्र व्याकरणम् ॥
स्वजनः श्वजनो मा भूत्सकलं शकलं सकृच्छकृत् ॥ ६१ ॥

बाप आपल्या मुलास व्याकरणाचा उपयोग सांगतोः——“ हे पुत्रा ! तूं दुसरें कांहीं पढला नाहींस तरी निदान व्याकरण तरी म्हण. म्हणजे ‘ स्वजनाच्या ’ ठिकाणीं ‘ श्वजन ’ (कुत्र्यांचा समुदाय) ‘ सकला ’ बद्दल ‘ शकल ’ (तुकडा) ‘ सकृत् ’ (एकदा) त्याच्या जागीं ‘ शकृत् ’ (विष्ठा) असे हास्यास्पद दोष तुझ्या भाषणांत येणार नाहींत. ”

सकृज्जल्पंति राजानः सकृज्जल्पंति पंडिताः ॥
सकृत्कन्याः प्रदीयंते त्रीण्येतानि सकृत्सकृत् ॥ ६२ ॥

“ राजे (म्हणजे जे खरे थोर असतात ते) एक वार भाषण करतात, तसे पंडित, त्याप्रमाणेंच कन्यादान एकदांच होतें;——ह्या तीन गोष्टी एकदां झाल्या म्हणजे झाल्या मग माघारी येत नाहींत. ”

सज्जनस्य हृदयं नवनीतं यद्वदंति कवयस्तदलीकम् ॥
अन्यदेहविलसत्परितापात्सज्जनो द्रवति नो नवनीतम् ॥ ६३ ॥

“ सज्जनांचें हृदय लोण्यासारखें असतें असें जें कवि म्हणतात तें खोटें आहे. कां तर, सज्जन दुसऱ्यास झालेल्या तापानें द्रवतात, आणि लोणी केवळ आपल्याच तापानें बिरघळतें, ” या स्थली व्यतिरेकालंकार आहे.

अपूर्वेयं धनुर्विद्या मदनस्य महात्मनः ॥
शरीरमक्षतं कृत्वा भिनत्त्यंतर्गतं मनः ॥ ६४ ॥

“ पराक्रमी जो मदन त्याचें हस्तकौशल्य कांहीं विलक्षण आहे ! कसें तर शरीरास क्षत न पडतां तो आपल्या हृदयास विंधतो. ” येथेंही वरचाच अलंकार आहे.

परीक्ष्य सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं स्वरूपताम् ।*।।
विधिर्ददाति निपुणः कन्यामिव दरिद्रताम् ।। ६५ ।।

सर्वगुणसंपन्न पुरुषही कधीं कधीं दरिद्री असतात, या गोष्टीवर कोणी चतुर कवि उत्प्रेक्षा करतो.—" उत्तम कुल, शील, विद्या, शौर्य, रूप, इत्यादि सर्व गुण पाहून नवऱ्यामुलास शाहणा बाप जशी आपली मुलगी देतो, त्याप्रमाणें वरील सर्व उत्कृष्ट गुणांची परीक्षा करून ब्रह्मदेव तेथें दरिद्रतेची योजना करतो ! "

यद्यपि बहुगुणगम्यं जीवनमेतस्य कूपमुख्यस्य ।।
जयति तथाऽपि विवेको दानं पात्रानुमानेन ।। ६६ ।।

" या मोठ्या कूपाचें (विहिरीचें) पाणी काढण्यास जरी मोठी दोरी लागते, तरी याचा विवेक म्हणजे तारतम्यविचार मोठा प्रशंसनीय होयः कीं पात्राच्या मानानेंच दान. " ही अन्योक्ति आहे. एकादा मोठा धनिक, कीं ज्यापाशीं प्रवेश होण्यास मोठाच गुण अंगी लागतो, आणि जो पात्रत्वाचा विचार करून त्या मानानेंच दान करतो, त्याकडे हिचें अनुसंधान आहे. कूपपक्षीं, तो खोल असल्यामुळें बहुगुण (श्लिष्टशब्द आहे) लागतो, आणि जेवढें भांडें असेल तेवढेंच अर्थात पाणी निघेल.

दृढतरनिबद्धमुष्टेः कोशनिषण्णस्य सहजमलिनस्य ।।
कृपणस्य कृपाणस्य च केवलमाकारतो भेदः ।। ६७ ।।

---

* या खेपेस ' सुभाषितरत्नाकर ' नांवाच्या अलीकडे प्रसिद्ध आलेल्या पुस्तकांतून कांहीं श्लोक वर घेतले आहेत, व तसे पुढेंही मधून मधून घेतले जातील. हा उल्लेख येथें दोन कारणांवरून केला आहे. एक तर तसें करणें रास्त आहे म्हणून; आणि दुसरें कारण हा उत्कृष्ट ग्रंथ आमच्या वाचकांपैकीं कोणास ठाऊक नसेल तर तो माहीत व्हावा. हा ग्रंथ सर्व संस्कृतज्ञांच्या आश्रयास पात्र असतां त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याचा प्रसार झाला असेलसें वाटत नाहीं. याचें कारण उघडच आहे. जर एकाद्या शर्मण्यदेशीय पांचतंत्रिक महा पंडितानें तो रचला असता, तर तो पांडित्याचें शिखर होऊन सगळें जग त्याच्या प्रसारास थोडें होतें ! एकीकडे यूरोप व दुसरीकडे अमेरिका खंड त्यानें पाहिले असतें. पण कर्ता पडला एतद्देशीय संस्कृतज्ञ, तेव्हां सगळी मसलत अंगावर न येतां छापण्याचा सर्व खर्च भागला म्हणजे परमभाग्य !

कवि कृपण व कृपाण (खड्ग) यांचें सादृश्य वर्णितो.—" दोहोंची मूठ बळकट घातलेली असते (म्ह० कृपणाच्या हातून कवडी सुटायाची नाहीं, आणि तरवारीची मूठ बळकट अर्थातच केलेली असते), दोघे कोशांत (पैसा ठेवण्याच्या खोलींत; म्यानांत) पडून राहिलेले असतात; आणि दोघे स्वभावतःच मलीन (मळकट वस्त्रें वापरल्यामुळें; निळ्या रंगामुळें) असतात. भेद म्हणून काय तो एका आकारांत (दिसण्यांत, कारण एक मनुष्य आणि दुसरें शस्त्र; पक्षीं, ' आ ' या अक्षरांत) मात्र आहे ! "

निद्राप्रियो यः खलु कुंभकर्णो हतः समीके स रघूत्तमेन ॥
वैधव्यमापद्यत तस्य कांता श्रोतुं समायाति कथां पुराणम् ॥ ६८ ॥

कथेच्या पुराणाच्या वेळीं हटकून झोंप येते, यावर कोणी विनोदी कवि कल्पना बांधतोः—" कुंभकर्ण जो निद्राप्रिय होता त्याला रामचंद्रांनीं रणांत खपविला, तेव्हां ती निद्रा विधवा होऊन ती कथा पुराणें वगैरे ऐकण्यास येते ! "

अल्पिष्टोऽपि खलीनं दत्त्वाऽऽस्येऽपुच्छ ? बाजिराजस्य ॥
आरूढस्तत्पृष्ठे भूमौ बभ्राम मंडलाकारम् ॥ ६९ ॥

शेवटला पेशवा इंग्रजासमोर पळत होता त्यावर कोणीं* लिहिलें आहेः—" स्वत. अल्पिष्ट † (अत्यंत लहान) असतांही ‡ बाजिराजाच्या (बाजिरावाच्या; मोठ्या घोड्याच्या) पाठीवर चढून त्याच्या तोंडांत खलिन (वायु; लगाम) देऊन त्यानें त्यास भूमीवर मंडळाकार फिरविलें. " या आर्येंत बाजिरावाचा थोड्या फौजेनें पराभव व पळतां पळतां जे त्याचे हाल झाले (खावयास खलीन म्ह० वायु) ते ही दोन्हीं सुचविलीं आहेत.

उपकर्तुं प्रियं वक्तुं कर्तुं स्नेहमकृत्रिमम् ॥
सज्जनानां स्वभावोऽयं केनेंदुः शिशिरीकृतः ॥ ७० ॥

" दुसऱ्यावर उपकार करावा, गोड बोलावें, निष्कपट स्नेहानें वागावें, हा सज्जनांचा स्वभावच होय ! चंद्रास कोणीं थंड केला ? "

---

* पेशव्यांच्या पदरीं त्रिविक्रमशास्त्री म्हणून कोणी होते, त्यांनीं केलेल्यांपैकीं ही आर्या होय असें ऐकण्यांत आहे. † एलफिन्स्टन् पुण्यास रेसिडेंट असतां त्यास येथलि लोक अल्पिष्टन् किंवा अलिप्ट असें म्हणत असत. या दुसऱ्या नांवावर वरील आर्येंत श्लेष केला आहे. ‡ बवयोरभेदः—यावरून ' बाजिराज ' म्हणजे ' उत्तम घोडा '— ' अपुच्छ ' याचा अर्थ बाजिराज पुच्छशून्य व घोडा पुच्छयुक्त असा कवीनें येथे व्यतिरेक सूचित केला आहे, अथवा युरोपियन लोक घोड्याच्या शेपटाचे लांब केस कापून ती तोकडी करतात त्यांस उद्देशून हें वर्णन असावें.

भक्ते द्वेषो जडे प्रीतिररुचिर्गुरुलंघनम् ॥
मुखे कटुकता नित्यं धनिनां ज्वरिणामिव ॥ ७१ ॥

" धनवान् आणि ज्वरी म्हणजे तापकरी यांची स्थिति एक असते. कशी कीं, भक्त निष्ठेनें चाकरी करणारे लोक, (पक्षीं) भात, यांविषयीं दोघांसही द्वेष असतो; जड म्हणजे मूर्खलोक, (पक्षीं) पाणी यांवर दोघांची प्रीति; दोघांसही अरुचि प्राप्त होते; दोघांसही गुरुलंघन म्हणजे वडील माणसांची अमर्यादा करणें (पक्षीं) अन्नाशिवाय राहणें, हें आवडतें; दोघांचींही तोंडें कडू (दोन्ही अर्थ उघडच आहेत) होतात. "

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पंडितः ॥
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥ ७२ ॥

" शंभरांत एक शूर सांपडेल; हजारांत पंडित सांपडेल, दहा हजारांत वक्ता सांपडेल; पण दाता असा होईल किंवा न होईल ! " यावरून दातृत्व किती कठीण आहे व याचें कारण जो पैशाचा लोभ तो मनुष्यांत किती प्रबळ आहे याची कवीची खात्री होती असें दिसून येतें.

इंदीवरेण नयनं मुखमंबुजेन कुंदेन दंतमधरं नवपल्लवेन ॥
अंगानि चंपकदलैः स विधाय धाता कांते कथं घटितवानुपलेन चेतः ७३

कालिदास—शृंगारतिलक.

" हे कांते ! तुझे डोळे इंदीवरांचे, तोंड कमळाचें, दांत कुंदाच्या कळ्यांचे, अधरोष्ठ नव्या पल्लवाचा, याप्रमाणें कोमळ कोमळ पदार्थांनीं तुझें बाकीचें सर्व शरीर घडून तुझें हृदय मात्र विधात्यानें कसें दगडाचें घडलें ?"

शब्दशक्त्यैव कुर्वाणा सर्वदानवनिर्वृतिम् ॥
काव्यविद्या श्रुतिगता स्यान्मृतस्यापि जीवनी ॥ ७४ ॥

कवि कवितेचें आणि संजीवनी विद्येचें साम्य वर्णितोः—" (कविता-पक्षीं) कविता ही केवळ शब्दांच्याच सामर्थ्यानें नेहमीं नवा नवा आनंद मनास देते, आणि कानीं पडतांच मेलेल्यासही उठवून बसवील ! (येथें शेवटीं अंमळ अत्युक्तीचा दोष येतो.)

(संजीवनी पक्षीं) शुक्राचार्याची श्रुति-(वेद)-प्रसिद्ध विद्या केवळ उच्चारमात्रेंकरून मेलेल्यांस उठवून सर्व दानवांस आनंददायक झाली. ”

दयिताबाहुपाशस्य कुतोऽयमपरो विधिः ॥
जीवयत्यर्पितः कंठे मारयत्यपवार्जितः ॥ ७५ ॥

“ स्त्रियांच्या बाहुपाशाचा काय विपरीत प्रकार आहे हा ! तो कंठीं पडला असतां जीव येतो (आनंद होतो), आणि निघाला म्हणजे मरण येतें (त्यासारखें दुःख होतें) ! ”

मुग्धे मुंच विषादमत्र बलभित्कंपो गुरुस्त्यज्यताम्
सद्भावं भज पुंडरीकनयने मान्यानिमान्मानय ॥
इत्थं शिक्षयतः स्वयंवरविधौ धन्वंतरेर्वाक्छला-
दन्यत्र प्रतिषिद्धमात्मविहितं जानन् हरिः पातु वः ॥७६॥

(प्राचीन काळची स्वयंवराची चाल सर्वांस माहीतच आहे कीं, कन्येनें आपणास मागणी घालण्यास आलेल्या वरांतून आपला नवरा आपल्या खुषीनें निवडावा. अशा प्रसंगीं आलेल्या वरांचें कुलशीलादि वर्णन करण्यास कन्येबरोबर दासी किंवा तिचा भाऊ असें कोणी तरी असे. पुढील श्लोकांत स्वयंवरकाळीं तिचा भाऊ धन्वंतरि हा स्वयंवरास आलेल्या देवांचें वर्णन करतो आहे. या श्लोकांत कवीनें खुबी काय केली आहे, कीं बाहेरून त्याचें बोलणें आलेल्या देवांस व लक्ष्मीस उद्देशून आहे असें दाखवून खरा अर्थ सगळा विष्णूकडेस लागेसा केला आहे.)

“ हे वेडे ! गोंधळूं नको, धैर्य नाहींसें करणारें हें कांपणें सोडून दे, चांगली स्वस्थ हो; आणि हे कमलनयने ! या मान्य देवांचा चांगला सत्कार कर ”—हा वरवरचा सकृद्दर्शनीं दिसणारा अर्थ झाला; पण विवक्षित अर्थ श्लेषानें असा होतो—

“ हे वेडे ! या विषादास (शंकरास) सोड, हा येथें इंद्र बसला आहे यास टाकून दे, तसेच वरुण व बृहस्पति हेही राहूं दे; विष्णूच्या ठायीं प्रेम धरून या बाकीच्या कोणासही मानूं नको. याप्रमाणें स्वयंवराचे वेळीं धन्वंतरीनें लक्ष्मीस वक्रोक्तीनें आपल्या पक्षाचा अभिप्राय सांगितला असतां तो जाणणारा विष्णु तुमचें रक्षण करो. ”

प्राक्पादयोः पतति खादति पृष्ठमांसम्
कर्णे कलं किमपि रौति शनैर्विचित्रम् ॥
छिद्रं निरूप्य सहसा प्रविशत्यशंकः
सर्वं खलस्य चरितं मशकः करोति ॥ ७७ ॥

कोणी चतुर व विनोदी कवि खलाचें आणि डांसाचें साम्य वर्णितोः—
" मशक हा खलाची सर्व कृति करून दाखवितो. कशी ? तर पहिल्यानें पायां पडतो (पायांशीं घुटमळतो; आर्जव करतो); मग पाठीचें मांस खातो (पाठीला चावतो, न कळत कांहीं उपद्रव करतो); नंतर कांहीं वेळ कानांशीं विचित्र गायन करतो (कानांशीं गुणगुणतो; लांगोडीची गोड गोड बोलणीं बोलतो); आणि शेवटीं छिद्र रेखून ठेवून बेधडक आंत शिरतो (नाकाकानांत वगैरे भसकन् जातो; व्यंग पाहून ठेवून निःशंकपणें पीडा देऊं लागतो); " हा बहारीचा श्लोक ' हितोपदेशां ' त आरंभीं आहे; पण कोठला काय तें कांहीं माहीत नाहीं !

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ॥
देहश्चितायां परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥ ७८ ॥

" मरणसमयीं पैसा भुईंत, गाईम्हशी गोठ्यांतल्या गोठ्यांत, स्त्री घराच्या दारापर्यंत, इष्टमित्र स्मशानापर्यंत, आणि शरीर चितेवर राहतें; परलोकास जीव एकटाच जाणारा असून त्याबरोबर त्याचें एक कर्म मात्र येतें ! " सर्व वैराग्याचें तत्त्व या एका पद्यांत आहे !

अकृत्वा परसंतापमगत्वा खलनम्रताम् ॥
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु ॥ ७९ ॥

" दुसऱ्यास ताप न करतां, दुष्टांशीं नमून न वागतां, आणि सज्जनांच्या मार्गास अनुसरून, जें मिळेल तें थोडें असलें तरी लाखाच्या जागीं होय ! "

सकृत्कंदुकपातेनोत्पतत्यार्यः पतन्नपि ॥
तथा पतति मूर्खस्तु मृत्पिंडपतनं यथा ॥ ८० ॥

थोरांत व हलक्यांत अंतरः—" थोर आहे तो पडला तरी चेंडूसारखा पडून वर उडतो; आणि मूर्ख आहे तो मातीच्या गोळ्यासारखा पडतो. " म्हणजे पहिल्याच्या अंगीं स्थितिस्थापकत्वाचा गुण असल्यामुळें तो जसा पुनः वर

उसळतो तसा बुद्धिमान् पुरुष पुनः माग्यास चढतो; आणि दुसऱ्याच्या अंगीं तो गुण मुळींच नसल्यामुळें तो जसा फतकन् खालीं पडला कीं पडला, तसा मंदबुद्धि मनुष्य एकदां घसरला कीं घसरला !

तवैष विद्रुमच्छायो मरुमार्ग इवाधरः ॥
करोति कस्य नो बाले पिपासाकुलितं मनः ॥ ८१ ॥

" हे कुमारिके ! तुझा अधरोष्ठ मारवाड देशांतील मार्गाप्रमाणें विद्रुमच्छाय (ज्यावर झाडांची सावली नाहीं असा) आहे, यास्तव त्याच्या योगानें कोणास पान करण्याची इच्छा होत नाहीं ? पक्षीं, विद्रुमच्छाय म्हणजे पोंवळ्याची लाली ज्यावर मारते आहे असा तुझा अधरोष्ठ आहे, तेव्हां तो कोणास पानाविषयीं उत्कंठित करीत नाहीं ? अर्थात् सर्व सहृदय जनांस उत्सुक करतो ! "

निर्वाणदीपे किमु तैलदानं चौरे गते वा किमु सावधानम् ॥
वयो गते किं वनिताविलासः पयो गते किं खलु सेतुबंधः॥ ८२॥

वेतालभट्ट.

" दिवा विझाल्यावर आंत तेल घालून काय उपयोग ? चोर गेल्यावर ' सावधरे सावध ! ' म्हणून हाकाटी करून काय फळ ? वय गेल्यावर विषयोपभोगांत काय मौज ? पाणी ओसरून गेल्यावर मग पूल तो कशाला ? "

कंधरां समपहाय कं धरां प्राप्य संयति जहास कस्यचित् ॥
मां किलानमयतः स्वपूर्तये दुर्भरात्किमुदराद्वियोगतः ॥ ८३ ॥

युद्धांत एकाचें शिर वर उडालें असतां हंसलें; त्यावर कोणी कवि उत्प्रेक्षा करतो—" एका पुरुषाचें शिर मानेपासून उडून भुईवर पडलें असतां हंसलें. कां ! तर त्यास असें वाटलें कीं, आपली भर करण्याकरतां जें मला नेहमीं वाकवीत होतें, त्या या दुर्भर उदरापासून माझा आज वियोग झाला, यांत काय वाईट झालें ? "

गवीशपत्रो नगजार्तिहारी कुमारतातः शशिखंडमौलिः ॥
लंकेशसंपूजितपादपद्मः पायादनादिः परमेश्वरो नः ॥ ८४ ॥

" या श्लोकांत शिवाचें व विष्णूचेंही वर्णन आहे—" (शिवपक्षीं) बैल ज्याचें वाहन आहे, ज्यानें पार्वतीचें दुःख हरण केलें, जो कार्तिकेयाचा बाप,

ज्यानें चंद्राची कोर मस्तकावर धारण केली आहे, रावणानें ज्याच्या पद-कमलाची पूजा केली, असा अनादि शिव आमचें रक्षण करो. "

(दुसरा अर्थ करतांना वरील प्रत्येक पदाचें पहिलें पहिलें अक्षर काढा-याचें हें शेवटल्या चरणांतील ' अनादि ' पदानें सुचविलें आहे.)

"(विष्णुपक्षी) गरुड ज्याचें वाहन आहे. ज्यानें गजेंद्राला (नक्राच्या तोंडांतून) सोडविला अथवा कंसाच्या कुवलयापीड हत्तीला मारला, जो मद-नाचा पिता, ज्याच्या मुकुटावर मोराचें पीस खोंवलें आहे, ब्रह्मदेव आणि शिव ज्याच्या पदकमलाची पूजा करतात, असा रमेचा पति——"

चत्वारो धनदायादा धर्माग्निनृपतस्कराः ॥
तत्र ज्येष्ठावमानेन त्रयः कुप्यंति बांधवाः ॥ ८५॥

" धर्म (दान करणें), अग्नि, राजा आणि चोर हे धनाचे चार वांटे-करी आहेत. यास्तव यांच्या वडील भावाचा (धर्माचा) जेव्हां अवमान करावा, तेव्हां धाकटे तिन्ही बंधु कोपतात ! "

दूरेऽपि श्रुत्वा भवदीयकीर्तिं कर्णौ हि तृप्तौ न च चक्षुषी मे ॥
तयोर्विवादं परिहर्तुकामः समागतोऽहं तव दर्शनाय ॥ ८६ ॥

" आपली कीर्ति दूरपासून ऐकली असतां माझे कान तृप्त झाले, पण डोळे झाले नाहींत. यास्तव त्यांचा तंटा मिटविण्याकरतां आपल्या दर्शनार्थ आलों आहे. "

मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिनिहतो
मदक्षीणो नागः शरदि सरितः श्यानपुलिनाः ॥
कलाशेषश्चंद्रः सुरतमृदिता बालवनिता
तनिम्ना शोभंते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः ॥ ८७ ॥

भर्तृहरि.

" साहाणेवर घांसलेलें रत्न, रणांत जय पावून आलेला असा घायाळ शूर पुरुष, गंडस्थळापासून होणाऱ्या मदस्रावानें क्षीण झालेला हत्ती, शरदृतूंत ज्यांचीं वाळवंटें सुकलेलीं आहेत अशा नद्या, ज्याची नुसती कोर मात्र उरली आहे असा चंद्र, संभोगानें श्रांत झालेली तरुण स्त्री, आणि अर्थि-

वनांस दान करून निःस्व झालेले राजे, हीं सर्व आपल्या क्षीणत्वानें अत्यंत रमणीय दिसतात ! *

परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु ॥
परान्नं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि ॥ ८८ ॥

कोणी भटजी आपल्या पुत्रास उपदेश करतातः—" मुला ! परान्न प्राप्त झालें असतां प्राणावर अगदीं लोभ ठेवीत जाऊं नको; सडकून जेवीत जा ! कां तर हे प्राण बेट्या फुकाचे आहेत, जन्मोजन्मीं ठेवलेच आहेत; पण परान्न बरीक परम दुर्लभ आहे ! "

बालत्वे च मृता माता वृद्धत्वे च मृताः सुताः ॥
यौवने च मृता भार्या पातकं किमतः परम् ॥ ८९ ॥

" जन्म झाला तों आई मेली; तरुणपण आलें तों बायको मेली; आणि म्हातारपण झालें तों मुलगे अटपले;—यापरतें पातक कोणतें ? "

काकः कृष्णः पिकः कृष्णस्त्वभेदः पिककाकयोः ॥
वसंते समुपायाते काकः काकः पिकः पिकः ॥ ९० ॥

" कावळा काळा आणि कोकिळही काळा , तेव्हां दोघे सारखेच; पण वसंत ऋतु आला कीं, कावळा तो कावळा, आणि कोकिळ तो कोकिळ ! " ही अन्योक्ति आहे. समयास मनुष्या मनुष्याची पारख होते !

अंगुल्या कः कपाटं प्रहरति कुटिले माधवः किं वसंतो
नो चक्री किं कुलालो न हि धरणिधरः किं द्विजिह्वः फणींद्रः ॥
नाहं घोराहिमर्दी त्वमसि खगपतिर्नो हरिः किं कपींद्र
इत्येवं गोपकन्याप्रतिवचनजितः पातु वश्चक्रपाणिः ॥ ९१ ॥

इतर नायिकांच्या घरून मध्यरात्रीं कृष्ण आला असतां राधेचा व त्याचा संवादः—

---

* वरील श्लोकाचें वामनानें भाषांतर केलें आहे तें येणेप्रमाणेः—

शाणोल्लेख जया असा मणि रणीं जो वीर घायाळला ।
संभोगें शिणली अशी नववधू हस्ती न मस्तावला ॥
ज्यांचीं स्वच्छ शरदतूंत पुलिनें त्या निम्नगा चंद्रही—।
बीजेचा प्रभु पात्रदत्तधन जो हे शोभती सर्वही ॥

" दार कोण बोटांनीं वाजवतें ?—हे कुटिले (करकरे !), मी माधव आहें—कोण, बसंत ?—नाहीं, मी चक्री आहें—कोण, कुंभार ?—नाहीं, मी धरणीधर आहें—कोण, द्विजिह्व (दुसऱ्या अर्थीं, चहाड) सर्प ?—नव्हे, मी घोर सर्पाचें मर्दन करणारा आहें—कोण, तूं गरुड आहेस काय ?—नाहीं नाहीं, मी हरि आहें—कोण, वानर ?—याप्रमाणें त्या गोपकन्येच्या उत्तरांनीं ज्यास हार खावी लागली, तो चक्रपाणि तुमचें रक्षण करो ! "

व्याघ्रे च महदालास्यं सर्पे चैव महद्भयम् ॥
पिशुने चैव दारिद्र्यं तेन तिष्ठंति जंतवः ॥ ९२ ॥

" वाघाचे ठायीं मोठा आळस, सापाचे ठायीं भय, आणि चहाडास दारिद्र्य, ह्या तीन गोष्टी सुदैवेंकरून एकेकाचे ठिकाणीं आहेत म्हणूनच सगळ्या जगाचा बचाव आहे ! "

दृष्ट्वैकासनसंस्थिते प्रियतमे पश्चादुपेत्यादरा-
देकस्या नयने पिधाय विहितक्रीडानुबंधच्छलः ॥
ईषद्वक्रिमकंधरः सपुलकः प्रेमोल्लसन्मानसा-
मंतर्हासलसत्कपोलफलकां धूर्तोऽपरां चुंबति ॥ ९३ ॥

अमरुशतक.

कोणा पुरुषास दोन बायका होत्या. त्या दोघीही त्याच्या आवडत्या होत्या. एके समयीं असें झालें, त्या दोघी महालांत एकेच जागीं बसल्या असतां हा न कळत आंत गेला. तेव्हां आपणावरच विशेष प्रीति आहे असें दोघींस वाटण्याकरतां त्या चतुर पुरुषानें ही युक्ति केली:—

" दोघीही अत्यंत प्रिय अशा आपल्या स्त्रिया एकेच ठिकाणीं बसल्या आहेत असें पाहून तो मागें गुपचुप् गेला, आणि विनोदाच्या मिषानें त्यानें एकीचे डोळे आपल्या हातांनीं गपकन् झांकले; आणि अंमळ वांकडी मान करून हर्षरोमांचित होत्साता त्या धूर्तानें, प्रेमानें जिचें हृदय उचंबळतें आहे, आणि आंतल्या आंत हंसल्यानें जिचे गाल प्रफुल्लित झाले आहेत अशा दुसऱ्या स्त्रीचें वळून चुंबन केलें ! "—याप्रमाणें दोघींसही आपापल्या मनांत वाटलें कीं, मीच नवऱ्याची ज्यास्त आवडती आहे !

नौर्दुर्जनजिह्वा च प्रतिकूलं विसर्पिणी ॥
परप्रतारणायैव दारुणा केन निर्मिता ॥ ९४ ॥

कवि नावेचें आणि चाहडाच्या जिभेचें श्लेषानें वर्णन करतोः—

" (नौकापक्षीं) प्रत्येक तीराला लागणारी आणि दुसऱ्यास तारून नेण्याकरतां लांकडाची केलेली. "

" (जिव्हापक्षीं) ज्याच्या त्याच्या मर्माचा उच्चार केल्यानें नेहमीं विरुद्ध वागणारी, आणि दुसऱ्यास फसवण्याकरतां दारुण म्ह० भयंकर होत्साती विधात्यानें निर्माण केलेली. "

रे रे कोकिल मा भज मौनं किंचिदुदंचय पंचमरागम् ॥
नो चेत्त्वामिह को जानीते काककदंबकपिहिते चूते ॥ ९५ ॥

" रे कोकिळा ? असें मौन धरून बसूं नको, पंचमस्वर किंचित् तरी काढ. नाहीं तर कावळ्याच्या मंडळींत या आंब्याच्या झाडावर तुला कोण ओळखतो ! "

कराविव शरीरस्य नेत्रयोरिव पक्ष्मणी ॥
अप्रोक्तमपि कुर्वंति तन्मित्रं मित्रलक्षणम् ॥ ९६ ॥

" तोच खरा मित्र कीं जो, हात जसे शरीरास, किंवा पापण्या डोळ्यास त्याप्रमाणें केवळ स्वतःच्या प्रेरणेनेंच जो सर्व कामीं उपयोगी पडतो ! "

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्
भास्वानुदेष्यति हसिष्यति पद्मजालम् ॥
इत्थं विचिंतयति कोशगते द्विरेफे
हा हंत हंत नलिनीं गज उज्जहार ॥ ९७ ॥

" रात्र जाईल, चांगली पहाट होईल, सूर्य उगवेल, आणि सर्व कमळें विकसतील,—याप्रमाणें कमळांत गुंतलेला भ्रमर जों मनाचे संकल्प करतो आहे तोंच हत्तीनें देंठासकट तें पार उपटून टाकलें ! "

गर्जसि मेघ न यच्छसि तोयं चातकपक्षी व्याकुलितोऽहम् ॥
दैवादिह यदि दक्षिणवातः क्व त्वं क्वाहं क्व च जलपातः ॥९८॥

चातकपक्षी मेघास उद्देशून बोलतो—" हे मेघा ! तूं नुसता गर्जतोस

मात्र, पण वृष्टि करीत नाहींस; हा मी चातकपक्षी पहा कसा तान्हेनें व्याकुळ होऊन गेलों आहें ! अरे, विचार कर कीं जर दैवेंकरून इतक्यांत दक्षिणेचा वारा सुटला, तर तूं कोठें, मी कोठें, आणि जलवृष्टि कोठें अशी गत होऊन जाईल ! ही अन्योक्ति आहे. जोंवर हातांत आहे तोंवर सत्पात्रीं दान केल्याचें श्रेय पदरांत घेऊन ठेवावें; कां कीं, वैभव केव्हां जाईल याचा काय नेम सांगावा !

वार्ता च कौतुकवती विमला च विद्या
लोकोत्तरः परिमलश्च कुरंगनाभेः ॥
तैलस्य बिंदुरिव वारिणि दुर्निवार-
मेतत्त्रयं प्रसरति स्वयमेव लोके ॥ ९९ ॥

" अद्भुतवार्ता, उत्कृष्ट विद्वत्ता, आणि मृगनाभीचा (कस्तूरीचा) लोकोत्तर परिमळ, हीं तीन तेलाचा बिंदु जसा पाण्यांत त्याप्रमाणें आपोआप चोहोंकडे पसरतात ! "

मारस्य मित्रमसि किंच सुधामयूख
शंभावपि प्रणयितां प्रकटीकरोषि ॥
विश्वासपात्रमसि यद्द्विषतोस्तयोर-
प्येतत्तव प्रकृतिशुद्धतनोश्चरित्रम् ॥ १०० ॥

" हे चंद्रा ! तूं मदनाचा मित्र आहेस, व तसाच शिवाचाही आवडता आहेस. ते परस्पर शत्रु असतांही तूं दोघांचें स्नेहपात्र झाला आहेस हा तुझ्या स्वभावसिद्ध शुद्धपणाचा (शुभ्रपणाचा पक्षीं, मनाच्या सरळपणाचा) महिमा होय ! "

को न याति वशं लोके मुखे पिंडेन पूरितः ॥
मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनिम् ॥ १०१ ॥

" तोंड भरलें असतां कोण या जगांत वश होत नाहीं; पहा, मृदंगसुद्धां तसें केल्यानें मधुर ध्वनि करायाला लागतो ! "

काचं मणिं कांचनमेकसूत्रे मुग्धा निबध्नंति किमत्र चित्रम् ॥
विचारवान्पाणिनिरेकसूत्रे श्वानं युवानं मघवानमाह ॥ १०२ ॥

" स्वभावतःच मुग्ध अशा ज्या स्त्रिया त्या कांच व सोन्याचे मणी,

एकाच सूत्रांत (गळेसरींत) ओंवतात त्यांत काय आश्चर्य आहे ? पहा कीं, येवढा बुद्धिमान् पाणिनि, पण त्यानें सुद्धां एकाच सूत्रांत श्वा (कुत्रा), युवा (तरुण), आणि मघवा (इंद्र) या तिघांस ओंवून दिलें ! " 'श्वयुवमघोनामतद्धिते ' असें पाणिनीचें सूत्र आहे.

जनस्थाने भ्रांतं कनकमृगतृष्णाकुलधिया
वचो वैदेहीति प्रतिपदमुदश्रु प्रलपितम् ॥
कृता लंकाभर्तुर्वदनपरिपाटीषु रचना
मयाऽऽप्तं रामत्वं कुशलवसुता न त्वधिगता ॥ १०३ ॥

धनतृष्णेमुळें आपली झालेली विटंबना कोणी याचक वर्णितोः—

" अहो ! माझ्यांत व रामचंद्रांत काय उणें आहे ? मी त्याची सर्व कृति केली ! कशी ?—(रामपक्षीं) तो सुवर्णमृगानें लोभावला जाऊन जनस्थानांत* त्याच्या मागें फिरला; पुढें सीता नाहींशी झालेसें पाहून खिन्नांतःकरण होऊन सीता पावलोंपावलीं ' हे जानकी ' असा डोळ्यांत अश्रु आणून तिचा ध्यासच त्यानें घेतला; शेवटीं रावणाची बातमी लागल्यावर त्या लंकापतीशीं घोरसंग्राम करून त्याची मस्तकपंक्ति बाणांनीं उडविली;—

(कविपक्षीं) मीही धनाशारूप जें मृगजळ त्याच्या पाठीस लागून धनिकांच्या दारोदार हिंडलों; पावलोंपावलीं ' मला द्या ' असें दैन्यपूर्वक सद्गद स्वरानें ज्या त्यापाशीं म्हटलें; आणि दुष्ट व अदत्त अशा धनिकांच्या कपाळावर आपल्या त्रासरूप दर्शनानें आठ्या पाडविल्या;——पण रामास सरते शेवटीं कुशलवांची माता सीता प्राप्त झाली त्याप्रमाणें मला कुशल-वसुता-(धनसंपन्नता) मात्र प्राप्त झाली नाहीं ! "

राजा कदाचित्संध्यामालोक्य प्राह—

परिपतति पयोनिधौ पतंगः
ततो बाणः प्राह——सरसिरुहामुदरेषु मत्तभृंगः ॥
ततो महेश्वरः कविः प्राह—उपवनतरुकोटरे विहंगा
ततः कालिदासः प्राह—युवतिजनेषु शनैः शनैरनंगः ॥ १०४ ॥

—भोजप्रबंध.

---

* सांप्रत ज्यास नाशिक म्हणतात तेथल्या प्रदेशाचें नांव ' जनस्थान. ' येथेंच सुवर्णमृगाचा वृत्तांत घडला हे लोकविश्रुत आहे—या शब्दाचा श्लेषार्थ ' जन-स्थान ' (लोकांची वस्ती) हा उपलक्ष्य आहे.

" एके समयीं भोजराजा संध्याकाळची शोभा पहात होता तो म्हणाला—पहा ! पतंग (सूर्य) समुद्रांत बुडतो आहे—

तेव्हां बाण म्हणाला—कमलांच्या गाभ्यांत मधास लोभावलेला भृंग (भुंगा) गुंतून पडतो आहे—

नंतर महेश्वर म्हणतो—बागांतील झाडांच्या कोट्यांत विहंग (पक्षी) जाऊन दडतो आहे—

शेवटीं कालिदास—तरुण स्त्रियांच्या ठायीं अनंग (मदन) हळुहळू संचार करतो आहे—"

धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी चंचलदृशाम्
दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः ॥
स्वयं चैकोऽनंगः सकलभुवनं व्याकुलयति
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥ १०५ ॥

" पहा ! मदनाचें धनुष्य काय तर पुष्प;—धनुष्याची दोरी तरी कशाची ? तर भ्रमरांची;—बाण कोणता ? तर चंचलनेत्री ज्या तरुण स्त्रिया त्यांच्या डोळ्याचा कोपरा (कटाक्ष);—साह्यकारी तरी कोणी मोठा समर्थ ?—तो तर जडात्मा (मंदबुद्धि; पक्षीं, जलमय) असा चंद्र;—आणि स्वतः काय तो एकटा;—पण इतकें असतांही हा अनंग (ज्याला शरीरही नाहीं !) सगळ्या विश्वास व्याकुळ करून सोडतो. तेव्हां थोर जे आहेत त्यांची क्रिया-सिद्धि त्यांच्या अंगच्या सामर्थ्यावरच केवळ घडते, उपकरणांत म्हणजे त्यांच्या जवळ असणाऱ्या साहित्यांत-(सैन्यांत, शस्त्रांत वगैरे) काय जीव आहे ! "

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगा
निरालंबो मार्गश्चरणविकलः सारथिरपि ॥
रविर्यात्येवांतं प्रतिदिनमपारस्य नभसः
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥ १०६ ॥

हाही श्लोक वरच्याच तात्पर्यावर आहे:—" सूर्याची सामग्री पहा ! रथाला चाक एक; घोडे आडनीडे सात; त्यांचे दोर सुळसुळीत असे साप; मार्ग निराधार; आणि सारथि पाहिला तर व्यंग (ज्याला मांड्या नाहींत असा—थोटा); पण येवढ्या अडचणी असतांही अपरंपार जें आकाश तें

प्रतिदिवशीं लंघून सूर्य जातो ! तेव्हां क्रियासिद्धि साधनांवर नाहीं, तर मनुष्याच्या अंगच्या हिमतीवर होत असते ! "

नपुंसकमिति ज्ञात्वा प्रियायै प्रेषितं मनः ॥
तत्तु तत्रैव रमते हताः पाणिनिना वयम् ॥ १०७ ॥

" मन हें नपुंसक जाणून प्रियेकडे पाठविलें; पण तें कसलें लबाड ! तें तिचे ठायीं रममाण झालें !—तेव्हां पाणिनीनें आम्हांस फसविलें ! "

दोषाकरोऽपि कुटिलोऽपि कलंकितोऽपि
मित्रावसानसमये विहितोदयोऽपि ॥
चंद्रस्तथाऽपि हरवल्लभतामुपैति
नैवाऽऽश्रितेषु गुणदोषविचारणा स्यात् ॥ १०८ ॥

" चंद्र हा दोषाकर (दोषांची खाण; पदोषसमयीं ह्म० संध्याकाळीं प्रकाश करणारा), कुटिल (दुष्ट; वांकडा), कलंकित (दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत), आणि मित्राच्या (पक्षीं, सूर्याच्या) अंतकाळीं उदय पावणारा, असा आहे: तरी शिवास तो अत्यंत प्रिय आहे. तस्मात् प्रभु जे आहेत ते आपल्या आश्रिताचे गुणदोष पहात नसतात ! "

आश्वास्य पर्वतकुलं तपनोष्णतप्त—
मुद्दामदावविधुराणि च काननानि ॥
नानानदीनदशतानि च पूरयित्वा
रिक्तोऽसि यज्जलद सैव तवोत्तमश्रीः ॥ १०९ ॥

" हे मेघा ! सूर्याच्या उन्हानें तापलेले पर्वत व वणव्यानें पेटलेलीं रानें यांची पीडा हरण करून आणि शेंकडों नद्या व नदही भरून टाकून तूं रिक्त झालास, हेंच तुझ्या वैभवास अत्यंत भूषण झालें ! " ही अन्योक्ति आहे; व हिचा गर्भित अर्थही उघड आहे.

स्तनयुगमश्रुस्नातं समीपतरवर्तिहृदयशोकाग्नेः ॥
चरति विमुक्ताहारं व्रतमिव भवतो रिपुस्त्रीणाम् ॥ ११० ॥

कादंबरी.

पोपट राजाची स्तुति करतोः—" हे राजा ! तुझ्या शत्रूंच्या स्त्रियांचें स्तनयुग अश्रूंनीं स्नात होत्साते व विमुक्ताहार (त्यक्त भोजन; पक्षीं

मुक्ताहाररहित) होऊन शोकाग्नीच्या जवळ व्रताचरणच करतें आहे काय असें वाटतें ! ”

साधारणतरुबुद्धया न मया रचितस्तवाऽऽलवालोऽपि ॥
लज्जयसि मामिदानीं चंपक भवनाधिवासितैः कुसुमैः ॥ १११ ॥

“ हे चांफ्या ! तूं कोणी यःकश्चित् वृक्ष असशील अशा समजुतीनें मीं तुला नुसतें आळेंही रचलें नाहीं. पण तोच तूं आतां घरभर वास भरणाऱ्या फुलांनीं मला लाजवतो आहेस ! ” ही अन्योक्ति आहे. मंद दिसल्यावरून वगैरे ज्याची आपण अवगणना केली असतां जो पुढें नांवालौकिकास आला अशा चाकरास, शिष्यास वगैरेही लागते.

कस्येयं तरुणि प्रपा पथिक नः किं पेयमस्यां पयो
धेनोर्वा उत माहिषं बधिर रे वारः कथं मंगलः ॥
सोमो वाऽथ शनैश्चरोऽमृतमिदं तत्तेऽधरं दृश्यते
श्रीमत्पांथ विलाससुंदर सखे यद्रोचते तत्पिब ॥ ११२ ॥

कोणी पांथ एका पाणपोईवर पाणी प्यावयास आला असतां तेथें एका तरुणीस पाहून म्हणतोः—“ हे तरुणी ! ही पोई कोणाची आहे ?—हे पांथा, आमची.—हींत पिण्यास काय आहे ?—पय.—गाईचें कीं म्हशीचें ?—रे बहिऱ्या, वारः (उदक).—मंगळवार का सोमवार कीं शनवार ?—नाहीं नाहीं, हें अमृत आहे.—कोणतें ? तुझ्या अधराचे ठायीं दिसत आहे तें काय ?—हे चतुर व सुंदर पांथा, तुला जें हवें तें पी ! ”

अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ॥
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्रदुर्लभः ॥ ११३ ॥

“ कोणतेंही अक्षर मंत्राखेरीज नाहीं, मुळी औषधाखेरीज नाहीं, किंवा पुरुष योग्यतेखेरीज नाहीं ! योजक मात्र पाहिजे ! ”

कमलासन-कमलेक्षण कमलारिकिरीट-कमलभृद्भिः ॥
नुतपदकमला कमला करधृतकमला करोतु मे कमलम् ॥ ११४ ॥

“ ब्रह्मदेव, विष्णु, शिव, आणि वरुण (?) हे जिच्या पदकमलाची स्तुति करतात, आणि जिच्या हातांत कमल आहे, अशी लक्ष्मी माझें पुष्कळ कल्याण करो. ” या आर्येंत सर्वत्र अनुप्रास आहे. ”

उपशमितमेघनादं प्रज्वालितदशाननं रमितरामम् ॥
रामायणमिव सुभगं दीपदिनं हरतु वो दुरितम् ॥ ११५ ॥

कवि रामायणाचें आणि दीपदिनाचें (दिवाळीचें) साम्य वर्णन करतोः—

" (रामायणपक्षीं) ज्या काव्यांत मेघनादाचा (इंद्रजिताचा) उपशम (अंत) आहे, रावण क्रोधायमान झाला आहे, आणि राम आनंदित झाला आहे:—

(दीपदिनपक्षीं) पावसाळा नुकताच गेल्यामुळें मेघांचा गडगडाट ज्यांत नाहींसा झाला आहे, वातींच्या दशा (टोंकें) ज्यांत प्रज्वलित झाल्या आहेत, स्त्रियांस ज्यांत मोठा उत्सव प्राप्त होतो,—असा हा सण तुमच्या पातकाचें हरण करो ! "

आहारे विरतिः समस्तविषयग्रासे निवृत्तिः परा
नासाग्रे नयनं तदेतदपरं यच्चैकतानं मनः ॥
मौनं चेदमिदं च शून्यमधुना यद्विश्वमाभाति ते
तद् ब्रूयाः सखि योगिनी किमसि भोः किंवा वियोगिन्यसि ॥ ११६ ॥

पतीच्या विरहामुळें उदास झालेल्या एका स्त्रीस तिची सखी विचारतेः—

" हे सखी ! तूं जेवण टाकलेंस, सर्व विषयांपासून अत्यंत पराङ्मुख झालीस, नाकावर दृष्टि लावून बसली आहेस, तसेंच तुझें मन केवळ एकाग्र झालेंसें दिसत आहे, मौन धारण केलें आहेस, सर्व विश्व तुला शून्य भासतें आहे,—तेव्हां सांग तूं योगिनी (योगधारण केलेली) आहेस कीं वियोगिनी (विरहिणी) आहेस ! "

किमिंदुः किं पद्मं किमु मुकुरबिंबं किमु मुखम्
किमब्जे किं मीनौ किमु मदनबाणौ किमु दृशौ ॥
खगौ वा गुच्छौ वा कनककलशौ वा किमु कुचौ
तडिद्वा तारा वा कनकलतिका वा किमबला ॥ ११७ ॥

कवि कोण्या रूपवतीचें वर्णन करतोः—" हा चंद्र आहे, कीं कमल आहे, कीं आरसा आहे, कीं तोंड आहे ?—हीं कमलें आहेत, कीं मासे आहेत, कां मदनाचे बाण आहेत, कां डोळे आहेत ?—तसेंच हे कोण ?

चक्रवाक, फुलांचे झेंडे, सुवर्णाचे कलश, कीं कुच ?—तशीच ही वीज आहे काय ! कीं चांदणी, कीं सोन्याची वेली, कां स्त्री ? ”

श्रुतिलंघकृतप्रयासयोर्मलिनाभ्यंतरयोरधीरयोः ॥
स्मृतिलोपपरत्वमेतयोरुचितं लोचनयोर्मृगीदृशः ॥ ११८ ॥

“ जे डोळे श्रुतिलंघनाविषयीं (कर्णप्रदेशापर्यंत पोंचण्याविषयीं; वेदोल्लंघनाविषयीं) उद्युक्त आहेत, ज्याचें अभ्यंतर मलीन आहे (एके अर्थीं-काजळानें; दुसऱ्या अर्थीं जे मलिनांतःकरण आहेत), जे अधीर आहेत (चंचल; विवेकशून्य), ते स्मृतीचा (स्मरणाचा; शास्त्रादिकांचा) लोप करतात हें ठीकच आहे ! ”

विद्वज्जनसभामध्ये नारीप्रथमसंगमे ॥
रणे रिपुसमाकीर्णे को न कातरतां व्रजेत् ॥ ११९ ॥

“ पंडितांच्या समाजांत, स्त्रीच्या प्राथमिक समागमाचे वेळीं, आणि रणांगणांत शत्रूंशीं पहिल्यानें गांठ पडली असतां कोणाचा ऊर धडधडत नाहीं ! ”

अकस्मादागारे रहसि मिलिताऽपि प्रियतमा
समाश्लिष्टा नागंतुकपिशुनभीतेन मनसा ॥
अथैषा मामज्ञं निपुणमथ सावज्ञमथवा
न जाने किं मेने प्रतिपलमतस्ताम्यति मनः ॥ १२० ॥

कोणी कवि स्वानुभूत एक चमत्कारिक वृत्तांत वर्णितोः—“ माझ्या प्रियेची आणि माझी अकस्मात् एकीकडे गांठ पडली असतांही मीं तीस आलिंगिली नाहीं; कां कीं न जाणों इतक्यांत कोणी आलें तर तें सर्वांस कळेल असा मला धाक वाटला ! पण आतां माझ्या मनाला सारखी चुरचुर लागून गेली आहे कीं, त्या माझ्या कृतीवरून ती मला अज्ञान समजली, पक्का समजली, कीं तिची मीं अवज्ञा केली असें तीस वाटलें, कोण जाणें ! ”

पातु वो निकषग्रावा मतिहेम्नः सरस्वती ॥
प्राज्ञेतरपरिच्छेदं वचसैव करोति या ॥ १२१ ॥

“ मति हेंच कोणी सोनें हें जिच्यावर तेव्हांच कसलें जाऊन एक्या वचनांतच जी शाहाणा व मूर्ख यांचा भेद कळवते, त्या सरस्वतीस नमन असो ! ”

वेणी श्यामा भुजंगीयं नितंबान्मस्तकं गता ॥
वक्त्रचंद्रसुधां लेढुं सांद्रसिंदूरजिह्वया ॥ १२२ ॥

कोणी कवि वेणीवर उत्प्रेक्षा करतो:—“ मला वाटतें, ही वेणी काळी सर्पीण आहे ! आणि ही मुखचंद्राच्या ठायीं असणारें जें अमृत तें आपल्या सिंदूररूप लाल जिभेनें चाटण्याकरतांच नितंबस्थलापासून वर गेली आहे काय ! ” वेणीचा शेवटाशीं निमुळता होत गेलेला आकार, पेडांची वीण, आणि दुसऱ्या शेवटाशीं होत जाणारा पसरटपणा, तसाच काळा रंग, हे सर्व वरील उत्प्रेक्षेचे अवयव होत; आणि बायका भांगांत शेंदूर घालतात यावरही वरील श्लोकांत लक्ष्य आहे.

भूमौ स्खलितपादानां भूमिरेवावलंबनम् ॥
त्वयि जातापराधानां त्वमेव शरणं मम ॥ १२३ ॥

कोणी भक्त परमेश्वरास म्हणतो:—“ हे देवा ! भूमीवर पदस्खलन झालें असतां म्हणजे पाय अडखळला असतां त्या मनुष्यास सांवरणारी पुनः भूमीच; त्याचप्रमाणें आम्हां मनुष्यांच्या हातून अपराध झाले तरी तुझ्याकडेच पुनः आम्हांस येणें आहे; कारण तुजशिवाय दुसरा कोण त्राता आहे ? ”

दंतावलिर्विगलिता गलितं शरीरम्
केशाश्च फेनधवला नहि मे विषादः ॥
एणीदृशो युवतयः पथि मां विलोक्य
तातेतिभाषणपरा शतकुंतघातः ॥ १२४ ॥

कोणी विषयलंपट पुरुष वृद्धत्वावस्था आली असतां खेद प्रदर्शित करतो:—

“ माझे दांत पडले, शरीर थकलें, केस फेंसाप्रमाणें पांढरे झाले; इत्यादि गोष्टींचा मला खेद वाटत नाहीं.—परंतु हरिणनयना ज्या तरुण स्त्रिया त्या मला वाटेंत आड आल्या असतां ‘ बाबा ’ शब्दानें मला दूर होण्यास वगैरे सांगतात, तो शब्द मला शंभर भाल्यांप्रमाणें टोंचतो ! ”

ज्वलति चलितेंधनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते ॥
प्रायः स्वं महिमानं क्षोभात्प्रतिपद्यते हि जनः ॥ १२५ ॥

शाकुंतलम्.

" सर्पण चाळवलें असतां अग्नि पेट घेतो, साप डंवचल्याबरोबर फडा काढतो. सारांश; तेजस्वी जे असतात त्यांस राग आणला असतां ते आपला प्रभाव तत्क्षणीं प्रगट करतात. "

असद्वृत्तो नायं न च वरगुणैरेष रहितः
प्रियो मुक्ताहारस्तव चरणमूले निपतितः ॥
गृहाणैनं भद्रे व्रजतु तव कंठप्रणयिता-
मुपायो नास्त्यन्यस्तव हृदयतापोपशमने ॥ १२६ ॥

कोणी नायिका नायकावर रुसून तिनें गळ्यांतील हारबीर पार तोडून फेंकून दिले. तेव्हां तिची एक सखी तिच्या पायांशीं पडलेल्या हारास बाह्यात्कारीं उद्देशून बोलून श्लेषोक्तीनें तिच्या वल्लभाविषयीं तीस सांगते:—

" अगे सखि ! हा सद्वृत्त (वाटोळा; पक्षीं, सुशील) नाहींसा नाहीं; तसाच वरगुणांनीं (चांगल्या दोऱ्यांनीं; पक्षीं, वरास जे गुण असावे त्यांनीं) ही हा कमी नाहीं; हा तुझा मुक्ताहार तुझ्या पायाशीं पडला आहे (पक्षीं, तुझा प्रिय त्यक्तभोजन होत्साता तुझ्या पायां पडतो आहे); तर हे गडे, याला जवळ घे; आणि हा तुझ्या गळां पडो: कारण तुझ्या हृदयाचा ताप शमण्यास दुसरा उपाय नाहीं ! "

यास्यति जलधरसमयस्तव च समृद्धिर्लघीयसी भविता ॥
तटिनि तटद्रुमपातनपातकमेकं चिरस्थायि ॥ १२७ ॥

कोणी कवि वर्षाकाळीं फुगलेल्या नदीस उद्देशून म्हणतो:—" हे नदि ! हा वर्षाकाळ निघून जाईल, व तसेंच तुझें हें वैभवही फार टिकेलसें नाहीं; पण तीरावरील झाडांस तूं उपटून टाकिलेंस हें पातक मात्र तुला चिरकाळ जडलें ! " ही अर्थातच अन्योक्ति आहे.

केशाः संयमिनः श्रुतेरपि परं पारं गते लोचने
अंतर्वक्त्रमपि स्वभावशुचिभिः कीर्णं द्विजानां गणैः ॥
मुक्तानां सतताधिवासरुचिरं वक्षोजकुंभद्वय-
मित्थं तन्वि वपुः प्रशांतमपि ते क्षोभं करोत्येव नः ॥१२८॥

भर्तृहरिः

" हे तन्वि तुझे केस संयमी (बांधलेले; पक्षीं, जितेंद्रिय) आहेत; तुझे डोळे श्रुतीच्या (कर्णाच्या; वेदाच्या) ही पार गेले आहेत; तुझ्या मुखाचे ठायीं स्वभावतःच स्वच्छ (शुभ्र; निष्पाप) अशी द्विजपंक्ति (दोन्ही अर्थ प्रसिद्धच आहेत) आहे; आणि तुझे स्तनद्वय मुक्तांच्या (मोत्यांच्या पक्षीं, जीवन्मुक्त योग्यांच्या) निरंतर सहवासानें पवित्र झालेली आहे;—— मग येवढी शांतीची सामग्री जवळ असतांही तुझें शरीर आमच्या मनास क्षुब्ध कां बरें करतें ? " *

श्रीरामे मृगयां गतेऽपि धनुषा बाणे समारोपितेऽ-
प्याकर्णांतगतेऽपि मुष्टिगलितेऽप्येनांगलग्नेऽपि च ॥
न त्रस्तं न पलायितं न चकितं नोत्कंपितं नोद्धतम्
मृग्या मद्वशगं करोति दयितं कामोऽयमित्याशया ॥ १२९ ॥

" राम मृगयेस गेला असतां त्यानें धनुष्यावर बाण ठेवला, कर्णप्रदेशापर्यंत ओढला, आणि एका मृगावर लक्ष्य धरून तो त्याच्या अंगावर सोडून दिला;—पण इतकें केलें तरी ही त्याची स्त्री हरिणी भ्याली नाहीं, पळाली नाहीं, चकित झाली नाहीं, आणि कंपही पावली नाहीं. कां ? तर तीस अशी भ्रांति झाली कीं, हा मदनच आहे; व माझ्या स्वाधीन यास करण्याकरतां हा यावर बाण टाकतो आहे ! "

चांचल्यमुच्चैःश्रवसस्तुरंगा-
त्कौटिल्यमिंदोर्विषतो विमोहः ॥
इति श्रियाऽशिक्षि सहोदरेभ्यो
न वेद्मि कस्माद् गुणवद्विरोधः ॥ १३० ॥

कोणी कवि लक्ष्मीच्या दोषास अनुलक्षून म्हणतोः—

---

* वरील श्लोकाचें प्राकृत भाषांतर पंडितांनीं असें केलें आहेः—

मोठे संयमशील केश नयन श्रुत्यंतही पावले ।
अंतर्वक्त्र सुनिर्मल द्विजगणीं जें सर्वदा सेविलें ॥
मुक्तांचा सतताधिवास हृदयीं सद्वृत्तताही स्तनीं ।
ऐसें शांत शरीर ताप करिते कां सांग वो कामिनी ॥

तिसऱ्या चरणाच्या शेवटीं भाषांतरकारानें नवाच श्लेष आपण जोडून चातुर्यानें घालून दिला आहे हें मार्मिक वाचणारांच्या लक्षांत येईलच ?

" लक्ष्मीनें आपल्या भावंडांपासून एक एक गुण घेतला—उच्चैःश्रवा नामक अश्वापासून चापल्य, चंद्रापासून कुटिलपणा, आणि विषापासून उन्मादपणा पण गुणिजनांशीं विरोध करण्याचा गुण ती कोणापासून शिकली हें कळत नाहीं ! "

विलासिनीं कांचनपट्टिकायां पाटीरपंकैर्विरही विलिख्य ॥
तस्याः कपोले व्यलिखत् पवर्गं ओष्ठे तवर्गं चरणे टवर्गम् ॥ १३१ ॥

" कोणा विरही पुरुषानें सोन्याच्या चित्रफलावर चंदनाच्या रसानें आपल्या प्रियेची तजवीर काढून तिच्या गालांवर पवर्ग, अधरोष्ठावर तवर्ग, आणि पायांवर टवर्ग याप्रमाणें वर्ण लिहिले. "

" अभिप्राय स्पष्टच आहे कीं तिन्ही स्थानें अनुक्रमें करून ओष्ठय, दंत्य, आणि मूर्धन्य होत ! " अर्थात् ते ते अवयव त्या त्या ठिकाणीं अर्पण केल्याचें सुचवितो.

हारो नारोपितः कंठे मया विश्लेषभीरुणा ॥
इदानीमंतरे जाताः सरित्सागरदुर्गमाः ॥ १३२ ॥

हनुमन्नाटक.

राम विरहातुर होत्साता पूर्वस्थिति आठवून म्हणतोः—" ज्या मला पूर्वी विरह इतका सहन होत नसे कीं गळ्यांतला हार देखील मला शत्रू-सारखा वाटे त्याच माझ्यामध्यें आणि सीतेमध्यें आतां नद्या, सागर, पर्वत इत्यादि झाले आहेत ! "

मनस्वी म्रियते कामं कार्पण्यं न तु गच्छति ॥
अपि निर्वाणमायाति नानलो याति शीतताम् ॥ १३३ ॥

" मनस्वी म्हणजे थोर मनाचे जे असतात ते मरून जातात, पण दैन्य कधींही पत्करीत नाहींत. पहा ! अग्नि विझून जातो; पण कधीं थंड झाला आहे काय ? "

न संध्यां संधत्ते नियमितनिमाजां न कुरुते
न वा मौंजीबंधं कलयति न वा सुन्नतविधिम् ॥
न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते
न काशी मक्का वा शिव शिव न हिंदुर्न यवनः ॥ १३४ ॥

" संध्या करीत नाहीं व निमाजही पढत नाहीं; ज्याला मुंजही नको व सुंतेचीही गरज नाहीं; रोजा माहीत नाहीं व एकादशीही करीत नाहीं; जो काशीलाही मानीत नाहीं आणि मक्केलाही विचारीत नाहीं;—एकूण हर हर ! जो धड हिंदूही नाहीं आणि मुसलमानही नाहीं ! " *

कन्याप्रसूतस्य धनुष्प्रसंगादंगाधिकासादितविक्रमस्य ॥
धनंजयाधीनपराभवस्य शीतस्य कर्णस्य च को विशेषः ॥१३५॥

दुर्योधनमित्र कर्ण आणि शीत यांवर श्लेषः—" कर्णांत आणि शीतांत काय भेद आहे ? दोघांचाही जन्म कन्येपासून (कुंतीपासून—कन्याराशीपासून); दोघे धनुःप्रसंगानें (धनुष्याच्या योगानें—धनुराशीमुळें) अंगाधिकासादितविक्रम (अंगाच्या ठिकाणीं म्ह० शरीराच्या ठिकाणी मिळविला आहे पराक्रम ज्यांनीं व अंगदेशांत मिळविला आहे पराक्रम ज्यांनीं) असे आहेत. आणि दोघांचाही पराजय धनंजयाच्या (अर्जुनाच्या—अग्नीच्या) अधीन ! "

परवादे दशवदनः पररंध्रनिरीक्षणे सहस्राक्षः ॥
सद्वृत्तवृत्तिहरणे बाहुसहस्रार्जुनः पिशुनः ॥ १३६ ॥

" खल हा दुसऱ्याची निंदा करतांना दहा मुखांचा रावण बनतो, दुसऱ्याचें उणें पाहण्यांत सहस्रनेत्र इंद्र होतो, आणि सज्जनांचें द्रव्यहरण करतांना कार्तवीर्याप्रमाणें हजार बाहु धारण करतो ! "

सदा वक्रः सदा क्रूरः सदा पूजामपेक्षते ॥
कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥ १३७ ॥

कोणी विनोदी कवि जांवयाचें आणि ग्रहाचें साम्य वर्णितोः—" जामात

* वरील पद्यावरून हल्लीं प्रमाणेच गेल्या शतकांत धर्माच्या संबंधाने वरील चलबिचल झाली असावी असें दिसतें. म्हणजे अलीकडे तीस चाळीस वर्षे ख्रिस्तप्रभूचा प्रभाव जसा गाजत आहे, तसाच या पूर्वी मक्केच्या पैगंबराचाही चोहोंकडे गाजत असावा असें अनुमान होते. वरील श्लोकांतील वर्णन सध्याच्या काळीं शेकडों मनुष्यांस थोडासा फरक केला असतां पुरतेपणी लागेल. कित्येकांची तर आत्म्याच्या तारणाविषयी अशी जबरदस्त आतुरता दृष्टीस पडते कीं, सकाळीं विकच्छ होऊन मुल्लासाहेबांबरोबर निमाजाचें पठण, दुपारीं पंढरीच्या पताकेसमोर तुकाराम महाराजांचा गाथा, तिसरे प्रहरीं योगाभ्यास, सायंकाळीं पाळ्द्यांची सुरस पदे. आणि रात्रीं वेळेनुसार ईश्वरपुत्रशरीरभोजन ! तेव्हां एकंदर मतलब काय का, सरतेशेवटीं ईश्वर ज्या द्वाराने हाक मारील तिकडून आंत घुसायाला तयारी !

हा दहावा ग्रहच होय. कसा ? नेहमीं वक्र म्हणजे आपल्या कुण्डींत असणारा, नेहमीं रुसलेला, नेहमीं समजाविला पाहिजे ! आतां दोहोंत एक मात्र मोठा भेद आहे:—ग्रह नेहमीं राशीवरून चळतो, पण हे बोवा कन्या-राशीस धरून जे एकदां बसतात ते मग हालत नाहींत ! ”

जले तैलं खले गुह्यं पात्रे दानं मनागपि ॥
प्राज्ञे शास्त्रं स्वयं याति विस्तारं वस्तुशक्तितः ॥ १३८ ॥

“ पाण्याचे ठायीं तेल, खलाचे ठायीं एकादी गुप्त गोष्ट, सत्पात्राचे ठायीं केलेलें अल्पही दान, विचक्षण शिष्यास शिकविलेलें शास्त्र, हीं सर्व केवळ स्वभावतःच वस्तुमाहात्म्यास्तव विस्तार पावतात ! ”

वरं दरिद्रः श्रुतिशास्त्रपारगो
न चापि मूर्खो बहुरत्नसंयुतः ॥
सुलोचना जीर्णपटाऽपि शोभते
न नेत्रहीना कनकैरलंकृता ॥ १३९ ॥

“ वेदशास्त्रांत पारंगत झालेला असा दरिद्री असला तरी बरा, पण जडावाचे दागिने घातलेलाही मूर्ख नको; पहा कीं, जिचे डोळे सुरेख आहेत अशी सुंदर स्त्री जीर्ण वस्त्र नेसली असतांही शोभते, पण जिला डोळे नाहींत ती सोन्यानें मढवून टाकली असतांही शोभत नाहीं. ”

आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला ॥
यया बद्धाः प्रधावंति मुक्तास्तिष्ठंति पंगुवत् ॥ १४० ॥

“ आशा ही कोणी आश्चर्यकारक शृंखला होय ! कशी ? तर तिनें जे बद्ध होतात ते धांवूं लागतात; आणि तिजपासून मुक्त जे झाले ते पांगळ्यासारखे जागच्या जागीं बसतात ! ” म्हणजे जे द्रव्याच्या आशेला गुंतलेले असतात त्यांस नेहमीं यातायात करावी लागते; आणि जे निरिच्छ असतात ते खुशाल स्वातन्त्र्यानें वागतात.

आलस्यं स्थिरतामुपैति भजते चापल्यमुद्योगिताम्
मूकत्वं मितभाषितां वितनुते मौढ्यं भवेदार्जवम् ॥
पात्रापात्रविचारणाविरहिता यच्छत्युदारात्मताम्
मातर्लक्ष्मि तव प्रसादवशतो दोषा अपि स्युर्गुणाः ॥ १४१ ॥

कवि लक्ष्मीचा प्रभाव वर्णन करतोः—" श्रीमंताचे ठायीं आळस असला तर तो स्थैर्य म्ह० गंभीरपणा हें नांव पावतो; चापल्य म्हणजे रिकाम्या उलाढाली करण्याचा असला, तर त्यास उद्योग हें नांव प्राप्त होतें; मुखदुर्बळपणा मितभाषीपणा होतो; मूर्खत्व सरळवृत्ति जाणून गणलें जातें; आणि पात्रापात्रविचारशून्यता या दोषास मनाचें औदार्य असें रूप लोक देतात. सारांश, हे माते लक्ष्मि ! तुझ्या प्रसादेंकरून दोषांचेही गुण होताहेत ! "

युक्तोऽसि भुवनभारे मा वक्रां वितनु कंधरां शेष ॥
त्वय्येकस्मिन्कष्टे सुखितानि भवंति भुवनानि ॥ १४२ ॥

" हे शेषा ! तुझ्यावर अवघ्या भुवनांचा भार आहे, तर तूं आपली मान भारावल्याचें दुःख मानून ती वांकडी करूं नको, कां तर, तुला एकट्याला कष्ट होऊन त्यावर सगळ्या जगतास सुख होत आहे ! " ही अन्योक्ति होय.

रविरपि न दहति तादृग्यादृक्संतपति वालुकानिकरः ॥
अन्यस्माल्लब्धपदः प्रायो नीचोऽपि दुःसहो भवति ॥ १४३ ॥

" पहा काय चमत्कार आहे ! प्रत्यक्ष सूर्यापासूनही इतका ताप होत नाहीं; पण या वाळूंत पायाला चटके बसताहेत ! तस्मात् नीच (द्व्यर्थी) जो आहे त्यास दुसऱ्यापासून अधिकार मिळाला असतां मूळच्या धन्याहूनही तो दुःसह होतो ! "

वाग्वादश्चार्थसंबंधः परोक्षे दारभाषणम् ॥
यदिच्छेद्विपुलां मैत्रीं त्रीणि तत्र न कारयेत् ॥ १४४ ॥

ज्यास कोणाशीं निरंतर स्नेह ठेवावयाचा असेल त्यानें त्याशीं पुढील तीन गोष्टी करूं नयेत—एक वाग्वाद म्हणजे वाद घेऊन भांडत बसणें; दुसरी,—अर्थसंबंध म्हणजे पैशाचें देणेंघेणें करणें; आणि तिसरी त्याच्या अपरोक्ष त्याच्या बायकोशीं बोलणें ! "

त्वत्कीर्तिमौक्तिकफलानि गुणैस्त्वदीयैः
संदर्भितुं विबुधवामदृशः प्रवृत्ताः ॥
नांतो गुणेषु न च कीर्तिषु रंध्रलेशो
हारो न जात इति ताश्च मिथो हसंति ॥ १४५ ॥

कोणी भाट राजाचा स्तव करतोः—" हे राजा ! तुझी कीर्ति हींच

कोणी मुक्ताफळें तीं तुझ्या गुणांशीं (दोन्ही अर्थ प्रसिद्ध आहेत) ओंवण्यास देवांगना लागल्या. पण गुण हातीं घेऊन पहातात तों त्यास अंतच नाहीं, आणि कीर्तीस लहानही रंध्र नाहीं, हें पाहून हार करावा तरी कसा असें म्हणून आपल्या आपल्यांतच त्या हंसूं लागल्या ! "

मंदरेण मथितोऽसि न पापिन्ग्रासितोऽसि तमसा न दुरात्मन् ।।
त्वां शरेण शतधा परिनिन्ये जानकीमुखसमो यदि न स्याः ।।१४६।।

हनुमन्नाटकम्

विरही राम चंद्राची निर्भर्त्सना करतोः—" हे दुष्टा ! तुला मंदरपर्वतानें घुसळून कसा टाकला नाहीं व राहूनें कसा गिळला नाहीं ! अरे, जर तूं जानकीच्या मुखासारखा नसतास तर तुला या क्षणीं शरानें शतधा विदीर्ण करून टाकला असता ! "

कांतं वक्ति कपोतिकाऽऽकुलतया नाथांतकालोऽद्य वाम्
व्याधोऽधो धृतचापसज्जितशरः श्येनः परिभ्राम्यति ।।
इत्थं सत्यहिना स दष्ट इषुणा श्येनोऽपि तेनाऽऽहत
स्तूर्णं तौ तु यमालयं प्रति गतौ दैवी विचित्रा गतिः ।।१४७।।

" कपोतिका आपल्या नवऱ्यास म्हणते, ' हे प्रिया ! आतां या संकटांतून आपण वांचत नाहीं. पहा, तो पारधी धनुष्यास बाण लावून खालीं उभा आहे; आणि उडून जावें तर ससाणा भोंवतालीं भराऱ्या मारतो आहे ! ' असें ती बोलते आहे तों व्याधास सर्पदंश झाला, आणि त्यामुळें त्याचा नेम चुकून ससाण्यासच बाण लागला. याप्रमाणें ते दोघे तत्क्षणीं यमसदनास जाऊन तो पक्षांचा बिचारा जोडा भयमुक्त होत्साता आनंदानें उडून गेला ! तस्मात् दैवगति विचित्र ! "

हृदयानि सतामेव कठिनानीति मे मतिः ।।
खलवाग्विशिखैस्तीक्ष्णैर्भिद्यंते न मनाग्यतः ।। १४८ ।।

" सज्जनांचींच अंतःकरणें अत्यंत कठोर असें मला वाटतें; कां तर दुष्टांच्या तीक्ष्ण वाग्बाणांनींही जीं यत्किंचितही हीं भंग पावत नाहींत ! "

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।।
पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमात् ।। १४९ ।।

सज्जनांच्या समागमाचें माहात्म्य:—" गंगा पातकाचें हरण करते, चंद्र ताप घालवितो, आणि कल्पवृक्ष दारिद्र्य नाहींसें करतो पण साधूचा समागम होतांच पाप, ताप, आणि दैन्य हीं तिन्हीं दूर होतात !"

कांतोऽसि नित्यमधुरोऽसि रसाकुलोऽसि
किंचासि पंचशरकार्मुकमद्वितीयम् ॥
इक्षो तवास्ति सकलं परमेकमूनम्
यत्सेवितो भजसि नीरसतां क्रमेण ॥ १५० ॥

कोणी कवि बाह्यात्कारी उंसास बोलून अन्योक्तीनें राजास म्हणतो:—
" हे उंसा ! तूं देखणा, नेहमीं मधुर व रसानें परिपूर्ण असा असतोस; फार काय सांगावें, तूंच कामदेवाचें एक धनुष्य होस. पण तुझे ठायीं एक मात्र उणें आहे कीं, उत्तरोत्तर नीरस (रसहीन—आदरशून्य) होत जातोस !"

अनधिगतमनोरथस्य पूर्वं शतगुणितेव गता मम त्रियामा ॥
यदि तु तव समागमे तथैव प्रसरति सुभ्रु ततः कृती भवेयम् ॥१५१॥

विक्रमोर्वशीय.

नायक नायिकेस म्हणतो:—" हे सुभ्रु ! अप्राप्त मनोरथ असतां माझी रात्र जशी शतगुणित झाल्याप्रमाणें जात असे, त्याचप्रमाणें तुझ्या समागमांतही ती जाईल, तर मग माझ्यासारखा धन्य कोण ! "

रे रे घरट्ट मा रोदीः कं कं न भ्रामयंत्यमूः ॥
कटाक्षवीक्षणादेव कराकृष्टस्य का कथा ॥ १५२ ॥

" हे रहाटा ! या स्त्रिया केवळ कटाक्षप्रेक्षणानेंही कोणास भ्रमण करायास लावीत नाहींत ? मग तुला तर ही करांनीं ओढते आहे; तेव्हां तुझी दुर्दशा तर काय पुसावी ! तूं उगीच कशाला दीनवाणा आक्रोश करतोस !"

मूर्खस्य पंच चिह्नानि गर्वी दुर्वचनी तथा ॥
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते ॥ १५३ ॥

मूर्खाचीं हीं पांच चिन्हें होत:—" गर्वानें फुगून जाणें, दुसऱ्यास टाकून बोलणें, आपलाच हेका धरून बसणें, अप्रिय भाषण करणें, आणि दुसऱ्याचें बोलणें न ऐकणें ! "

इंदीवराक्ष्याः स्फुटविद्रुमौष्ठ्याः संकेतमुद्दिश्य वने चरंत्याः ॥
चौराः समस्ताभरणानि हृत्वा नासामणिं नापहरंति चित्रम् ॥१५४॥

"कोणी स्त्री वनांत भेटण्याविषयीं आपल्या वल्लभाशीं संकेत करून तिकडे जात होती. या स्त्रीचे डोळे नीलकमलासारखे काळे भोर होते व ओठांवर पोंवळ्याची लाली होती. फिरतां फिरतां एकदम तिला चोरांनीं गांठलें, आणि तिचे सर्व दागिने बुचाडून नेले; पण एक नथ मात्र नेली नाहीं ! काय चमत्कार आहे !" वरील दागिनाच तेवढा चोरांनीं कां ठेवला याचा हेतु कवीनें पहिल्या चरणांत गर्भित केला आहे. तो हा कीं, नथेच्या मोत्यांवर वरून डोळ्यांची नीळसर प्रभा व खालून ओठांचा रक्तवर्ण पडून ते त्यांच्यांत प्रतिबिंबित झाल्यामुळें गुंजाफलांचा भ्रम होऊन चोरांनीं त्यांस हात घातला नाहीं ! कल्पना मोठ्या मौजेची आहे खरी; पण वरील श्लोकावर अंमळ अतिशयोक्तीचा दोष राहतो.

वाणी ममैव सरसा यदि रंजयित्री न प्रार्थये रसविदामवधानदानम् ॥
सायंतनीषु मकरंदवतीषु भृंगाः किं मल्लिकासु परमंत्रणमारभंते ॥१५५॥

"माझी वाणीच जर सरस व रंजन करणारी आहे, तर रसिकांस अवधान देण्याविषयीं मला प्रार्थना करणें नलगे; पहा कीं सायंकाळीं प्रफुल्लित व मकरंदयुक्त अशा मल्लिका झाल्या असतांना भृंगे त्यांच्या आमंत्रणाची वाट पाहतात काय?"

प्रहारितोऽपि मार्जारस्तमाखुं नैव मुंचति ॥
बहुधा बोधितो मूर्खस्तमाखुं नैव मुंचति ॥ १५६ ॥

"मांजर उंदरावर टपून बसलें असतां त्यास मारलें तरी तें त्यास सोडीत नाहीं; तसाच मूर्खास कितीही पढविला तरी तो तमाखु सोडीत नाहीं !"

मुख्यमेकं पुरस्कृत्य शून्यात्मानोऽपि साधकाः ॥
भवंति तं विना नैव यथा संख्यांकबिंदवः ॥ १५७ ॥

"कोणी चांगला मनुष्य पुढारी झाला असतां बाकीचे लोक नुसते खोगीर भरतीला असले तरी ते कार्य-साधक होतात; तो नसेल तर त्यांच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. जसें अंकगणितांतील आंकडे आणि शून्यें. शून्यास जी किंमत येते ती मागील आंकड्यांनीं ते नसतील तर तीं शून्येंच !"

आघ्रातं कमलं प्रियेण सुदृशा स्मित्वाऽपनीतं मुखम्
दत्तं विभ्रमकंदुके नखपदं सीत्कृत्य गूढौ स्तनौ ॥
दत्वा चंपकमालिकोरसि तया प्रोद्भिन्नरोमांचया
मीलल्लोचनया स्थितं प्रणयिनोर्दूरेऽपि पूर्णो रसः ॥ १५८ ॥

" प्रियानें कमलाचा वास घेतला असतां, स्त्रीनें त्याचा भाव समजून हंसून एकीकडे तोंड केलें; त्यानें लीलाकंदुकावर नखपदाचें चिन्ह केलें असतां तिनें दंतसीत्कार करून पदर नीट सरसावून घेतला; आणि शेवटीं जेव्हां चंपकपुष्पांची माला त्यानें आपल्या उराशीं धरली, तेव्हां रोमांचित होऊन व डोळे मिटून ती उभी राहिली. याप्रमाणें उभयतां दूर असतां रसाचा पूर्ण विकास झाला. "

गुणदोषौ बुधो गृह्णन्निंदुक्ष्वेडाविवेश्वरः ॥
शिरसा श्लाघते पूर्वं परं कंठे नियच्छति ॥ १५९ ॥

" जो सुज्ञ आहे तो दुसऱ्याच्या कृतींतील गुण व दोष दोन्हीही घेतो, कीं ज्याप्रमाणें शंकरानें चंद्र व विष हीं दोन्हींही ग्रहण केलीं; पण ज्याप्रमाणें शिवानें एकाला मस्तकीं धारण केला व दुसऱ्याला आपल्या कंठाचे ठायीं ठाव दिला, त्याचप्रमाणें वरील सुज्ञजन गुणाची श्लाघा करून दोष मनांत ठेवतो. "

अयं मे वाग्गुंफो विशदपदवैदग्ध्यमधुरः
स्फुरद्बंधो वंध्यः पशुहृदि कृतार्थः कविहृदि ॥
कटाक्षो वामाक्ष्या दरदलितनेत्रांतकलितः
कुमारे निःसारः स तु किमपि यूनः सुखयति ॥ १६० ॥

" प्रसन्नार्थ पदांच्या रचनाचातुर्येंकरून युक्त व मनास चमत्कार देणारा असा काव्यप्रबंध पशु म्हणजे जो अरसिक आहे त्याच्या हृदयांत निष्फळ होईल; पण तोच कवींच्या म्हणजे रसिकाच्या हृदयांत सफलता पावेल. कसा ? कीं जसा सुंदरीचा नेत्रान्त किंचित् आकुंचित करून फेकलेला कटाक्ष अर्भकाचे ठायीं निःसार होऊन तरुणास अतिशयेंकरून सुखप्रद होतो ! "

शीतांशुर्मुखमुत्पले तव दृशौ पद्मानुकारौ करौ
रंभागर्भनिभं तवोरुयुगुलं बाहू मृणालोपमौ ॥

श्रिया गेहे मयाऽरण्ये रामस्त्यक्तस्त्वया पथि ॥
बत मुद्रे पुरंध्रीणां प्रत्ययं कः करिष्यति ॥ ५४५ ॥

सीता हनुमंतानें खालीं टाकलेल्या मुद्रिकेकडे पाहून खेदानें म्हणतेः—
" हे मुद्रे ! राज्यलक्ष्मीनें रामाला गृहींच सोडिलें, मीं त्यास वनांत टाकून दिलें, आणि तूं त्यास मार्गांत सोडून आलीस; तेव्हां आतां स्त्रियांवर कोण विश्वास ठेवील ? "

तुंगपीनकुचकुंभशोभिताद्वक्षसश्चलितचैलपल्लवाः ॥
वेणुनादहृतचित्तवृत्तयश्चित्रवच्चलदृशोऽवतस्थिरे ॥ ५४६ ॥

" मुरलीच्या नादानें ज्यांच्या चित्तवृत्ति हरण झाल्या आहेत आणि उत्तुंग व पुष्ट अशा कुचकुंभांवरून स्रस्त झालेल्या पल्लवाचें ज्यांस भान राहिलें नाहीं, अशा गोपी चित्रासारख्या तटस्थ उभ्या राहिल्या ! "

किं द्रुतपदं प्रयासि प्रतीच्छ मुग्धे च्युतं ह्यलंकारम् ॥
मृगयाम्यच्युतमेव भ्रष्टैरेतैर्न मे हानिः ॥ ५४७ ॥

" हे मुग्धे ! येवढ्या घाईनें काय चाललीस ? हा तुझा दागिना गळून पडला, तरी त्याची तुला शुद्ध नाहीं काय ? " ती उत्तर करिते, " मी मुळीं अच्युताच्याच * शोधांत आहें; हे दागिने कितीही सांडले तरी मला त्यांची पर्वा नाहीं ! "

अहंकारो धियं ब्रूते मा सुप्तं प्रतिबोधय ॥
उदिते परमानंदे न त्वं नाहं न वै जगत् ॥ ५४८ ॥

" अहंकार बुद्धीस सांगतो कीं, आत्मज्ञानजन्य जो परमानंद त्यास जागा करूं नको; तो जागा झाला कीं, मी तूं व जगत् हीं तिन्ही नष्ट होऊन जातील ! "

केचिन्निद्रागताः केचित्कथयंति बहिर्गताः ॥
केचिदंतर्गताः केचिन्नो जाने क्व गता इति ॥ ५४९ ॥

कोणा एखाद्या थोर मनुष्याच्या भेटीला कोणी गरीब मनुष्य गेला असतां त्याची हेटाळणी येणेंप्रमाणें चालतेः—" कोणी म्हणतात, यजमान निजले आहेत; कोणी सांगतात, बाहेर गेले आहेत म्हणून; कोणी म्हणतात, आंत कामांत आहेत; आणि कोणी मुळींच कानावर हात ठेवतात ! "

---

* ' अच्युत ' म्हणजे ' न सांडलेला, ' पक्षी, ' कृष्ण ! '

सीताचिंताकुले रामे निद्रा निरगमद्रुषा ॥
कथमेकाकिनं जह्यामित्येवं न जहौ निशा ॥ ५५० ॥

" रामास सीतेविषयीं चिंतातुर पाहून निद्रा ही सवतीमत्सरानें निघून गेली; आणि रात्रीस वाटलें कीं, हा अगोदरच विरहातुर झाला आहे, तर याला एकट्याला सोडून कसें जावें? म्हणून तीही जाईना." सारांश, रामास सीताविरहामुळें झोंप येईना व कांहीं केल्या रात्रही जाईना !

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ॥
तत्त्वबुद्ध्या त्वमेवाहमिति मे निश्चिता मतिः ॥ ५५१ ॥

कोणी अद्वैतवादी परमेश्वराम म्हणतोः—" देहबुद्धीनें पाहतां मी तुझा दास आहें, जीवबुद्धीनें पाहतां तुझा अंश आहें, आणि तत्त्वबुद्धीनें पाहतां मी आणि तूं स्वरूपतः एकच आहोंत, असा मीं सिद्धांत करून ठेवला आहे !"

हे हेमकार परदुःखविचारमूढ
किं मां मुहुः क्षिपसि वारशतानि वह्नौ ॥
दग्धे पुनर्मयि भवंति गुणातिरेका
लाभः परं खलु मुखे तव भस्मपातः ॥ ५५२ ॥

" हे सुवर्णकारा ! तूं परदुःखाविषयीं केवळ निश्चिंत आहेस. तूं मला शंभरदां अग्नींत कां टाकतोस? त्याच्या योगानें काय होतें आहे, कीं माझ्या ठायीं अधिकाधिक गुण उत्पन्न होत आहेत, पण तुला स्वतःला लाभ म्हटला म्हणजे तोंडांत राख जात आहे येवढाच काय तो !"

ईशे पदप्रणयभाजि मुहुर्तमात्रम्
प्राणप्रियेऽपि कुरु मानिनि मा प्रसादम् ॥
जानातु मत्प्रभुरसौ पदयोर्नताना-
मस्मादृशामिव मनोरथभंगदुःखम् ॥ ५५३ ॥

कोणी कवि लक्ष्मीस म्हणतोः—" प्रभूनें तुझ्या पायांवर मस्तक ठेवलें असतां घटकाभर मन घट्ट करून तूं तसाच कोप धारण कर; असें केलें असतां माझ्यासारख्या भक्तजनांचा मनोरथभंग केला असतां कसें दुःख होतें हें तरी अंमळ राजश्रीस कळूं दे !"

गुणिनि गुणज्ञो रमते नागुणशीलस्य गुणिनि परितोषः ॥
अलिरेति वनात्कमलं न दर्दुरस्त्वेकवासोऽपि ॥ ५५४ ॥

" जो गुणज्ञ असतो त्यास गुणिजनाच्या सहवासापासून आनंद होतो, व ज्याला गुणाची परीक्षा नाहीं त्याला त्याची पर्वाही नसते. कसें ? तर भ्रमर हा वनांतून कमलाकडे झेंप घेत आदरून येतो, आणि नित्य ज्याचा त्याशीं सहवास असा जो मंडूक त्याच्या कधीं ध्यानींमनींही ती गोष्ट येत नाहीं ! "

सरसो विपरीतश्चेत्सरसत्वं न मुंचति ॥
साक्षरा विपरीताश्चेद्राक्षसा एव केवलम् ॥ ५५५ ॥

" जो सरस (रसिक) आहे तो विपरीत झाला तरी त्याचे सरसत्व जात नाहीं; पण जे नुसते साक्षर (' ज्ञानलवदुर्विदग्ध ') आहेत ते विपरीत झाले असतां केवळ राक्षस बनतात ! " पक्षीं ' सरस ' या अक्षरत्रयाचा विपर्यय ' सरस '—हाच होय; व ' साक्षराः ' याचा विपर्यय ' राक्षसाः ' असा होतो.

उत्कृष्टमध्यमनिकृष्टजनेषु मैत्री
यद्वच्छिलासु सिकतासु जलेपु रेखा ॥
वैरं क्रमादधममध्यमसज्जनानाम्
यद्वच्छिलासु सिकतासु जलेपु रेखा ॥ ५५६ ॥

" उत्तम, मध्यम आणि निकृष्ट लोकांशीं सख्य हें शिलेवर, वाळूवर आणि पाण्यावर काढलेल्या रेघेप्रमाणें आहे. आणि त्याशीं वैर हें वरच्याच्या विपरीत क्रमाप्रमाणें दृष्टीस पडतें ! "

यन्मनीषिपदांभोजरजःकणपवित्रितम् ॥
तदेव भवनं नो चेद्भकारस्तत्र लुप्यते ॥ ५५७ ॥

" जें गृह विद्वज्जनांच्या चरणरजांनीं पवित्रित झालेलें तेंच भवन, नाहीं तर ' भवन ' शब्दांतला भकार काढून टाकावा ! "

क्व सरसि वनखंडं पंकजानां क्व सूर्यः
क्व च कुमुदवनाली कौमुदीबंधुरिंदुः ॥

चिरपरिचयबंधाः प्रायशः सज्जनानाम्
नहि विचलति मैत्री दूरतोऽपि स्थितानाम् ॥ ५५८ ॥

" सरोवरांत असणारा कमलांचा समुदाय कोठें आणि सूर्य कोठें ? कुमुदांचें वन कोणीकडे आणि चंद्र कोणीकडे ! तेव्हां चिरपरिचयाच्या योगेंकरून दृढ झालेली जी सज्जनांची मैत्री ती दूर असल्यानेंही विकार पावत नाहीं ! "

अपराधादधिकं मां व्यथयति तव कपटरचनेयम् ॥
शस्त्राघातो न तथा सूचीक्षतवेदना यादृक् ॥ ५५९ ॥

" तूं माझा अपराध केलास याबद्दल मला इतकें वाईट वाटत नाहीं, पण तुझ्या कपटप्रयोगाचा फार संताप येतो; शस्त्राचा घाव तितकी वेदना देत नाहीं, कीं जितकी वेदना सुईच्या टोंचण्यानें होते ! "

पश्यात्र नलिनीपत्रे बलाका परिदृश्यते ॥
हरिन्मणिमये पात्रे शुक्तिकेव प्रतिष्ठिता ॥ ५६० ॥

" कमलपत्रामध्यें ही बगळी पहा कशी शोभते आहे, कीं जशी पाचेच्या भांड्यावर शिंप ठेवावी तशी ! "

किटिस्तु धरणीधरः कति न संति भूदारका
गिरिस्तु कनकाचलः कति न संति भूभारकाः
मरुत्तु मलयानिलः कति न संति झंझानिलाः
प्रभुस्तु विबुधाश्रयः कति न संति कुक्षिंभराः ॥ ५६१ ॥

" आदिवराह हाच एक धरणीधर होय, नाही तर भूमीस विदारणारे डुकर काय थोडे आहेत ? पर्वतांत पर्वत मेरु हाच होय, नाहीं तर भूभारभूत असे पुष्कळ आहेत ! मलयानिल हाच वायु होय. नाहींतर झंझावात काय थोडे आहेत ? तसेंच, जो पंडितास आश्रय देतो तोच प्रभु म्हणावा; नाहीं तर उदरंभरि राजे पुष्कळ आहेत ! "

रवेरस्तं तेजः समुदयति खद्योतपटली
मरालाली मूका कलकलमुलूका विदधते ॥
इदं कष्टं द्रष्टुं शुचिरसहमानांऽबुजवती
मिलद्भृंगव्याजात्कवलयति हालाहलमहो ॥ ५६२ ॥

इत्याह्लादकराखिलांगि रभसान्निःशंकमालिंग्य मा-
मंगानि त्वमनंगतापविधुराण्येह्येहि निर्वापय ॥ १६१ ॥

रत्नावली.

नायकाची नायिकेशीं गांठ पडली असतां तो तीस उद्देशून म्हणतोः—

" हे वल्लभे ! तुझें मुख चंद्र होय, डोळे कमळें होत, तुझे हात रक्त-कमलासारखे आहेत, तुझे उरुयुगुल केळीच्या गाभ्यासारखें आहे, आणि बाहु कमळाच्या तंतूप्रमाणें आहेत. तर याप्रमाणें सर्वांगांनीं आल्हाद करणारी अशी जी तूं ती मला निःशंकपणें सत्वर आलिंगन दे; आणि मदनतापानें पीडिलेल्या माझ्या गात्रांस शीतळ कर, चल ये लौकर ! "

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारुगंधम्
छिन्नं छिन्नं पुनरपि पुनः स्वादु चैवेक्षुदंडम् ॥
दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्णम्
न प्राणांते प्रकृतिविकृतिर्जायते चोत्तमानाम् ॥१६२॥

" चंदन पुनः पुनः घांसलें तरी त्याचा मनोहर गंध येतो; ऊंस पुनःपुनः तोडला तरी त्याचीं कांडीं गोडच लागतात तसेंच सोनेंही वारंवार तापविलें तरी त्याचा सुंदर वर्ण जात नाहीं; तेव्हां तात्पर्य काय कीं, जे उत्तम पुरुष असतात त्यांच्या प्रकृतींस प्राणांतींही विकार होत नसतो ! "

वदनं दशनविहीनं वाचो न परिस्फुटा गता शक्तिः ॥
अव्यक्तेंद्रियशक्तिः पुनरपि बाल्यं कृतं जरया ॥ १६३ ॥

" जरेनें पुनः बाल्यावस्था प्राप्त केली. कशी ? तर मुख दंतविरहित झालें; वाणी अस्पष्ट झाली; शक्ति गेली; आणि सगळ्या इंद्रियांचें सामर्थ्य अव्यक्त झालें ! "

यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रियाः ॥
चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता ॥ १६४ ॥

" जसें मन तशीच वाणी, आणि जशी वाणी तशीच कृति; याप्रमाणें जे सज्जन असतात त्यांचें चित्त, वाणी आणि किया हीं तिन्ही एकरूप असतात ! "

दंपत्योर्निशि जल्पतोर्गृहशुकेनाऽऽकर्णितं यद्वच-
स्तत्प्रातर्गुरुसंनिधौ निगदतस्तस्योपहारं वधूः ॥

कर्णालंबितपद्मरागशकलं विन्यस्य चंचूपुटे
व्रीडार्ता प्रकरोति दाडिमफलव्याजेन वाग्बंधनम् ॥ १६५ ॥

अमरुशतक.

" स्त्रीपुरुषांचें रात्रीचें बोलणें चाललें असतां तें घरांतील राघूनें ऐकून तें दुसऱ्या दिवशीं सकाळीं वडील माणसांदेखत तो बोलूं लागला. तेव्हां स्त्रीस लज्जा प्राप्त होऊन तिनें आपल्या कानांतील माणकाचा दागिना काढून डाळिंबाच्या मिषानें पोपटाच्या तोंडांत दिला आणि त्याचें तोंड बंद करून टाकिलें ! "

एको देवः केशवो वा शिवो वा एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा ॥
एको वासः पत्तने वा वने वा एका भार्या सुंदरी वा दरी वा १६६

" कोणता तरी एक देव असावा, केशव कीं शिव; एक मित्र असावा राजा किंवा यति ; राहावें, तर एक शहरांत किंवा वनांत; आणि स्त्री म्हटली तर एक सुंदरी तरी असावी, किंवा आपली दरी पतकरावी (म्हणजे अरण्यवास करावा) ! "

पवनचपलवेगः स्थूलधाराशरौघः स्तनितपटहनादः स्पष्टविद्युत्पताकः॥
हरति करसमूहं खे शशांकस्य मेघो नृप इव पुरमध्ये मंदवीर्यस्य शत्रोः१६७

मृच्छकटिकम्.

मेघावर परचक्राचें रूपकः—" वाऱ्यानें ज्याचा वेग तीव्र झाला आहे, मोठाल्या धारा हीच ज्याची शरपंक्ति आहे, गर्जना हाच ज्याचा पटहनाद होय, विजेचें स्फुरण हीच ज्याची पताका फडाडते आहे, असा मेघ आकाशाचे ठायीं चंद्राच्या करसमूहाचें (किरणसमुदायाचें, पक्षीं करभाराचें) हरण करीत आहे; कीं ज्याप्रमाणें दुर्बळ झालेल्या शत्रूस त्याच्या नगरींत गांठून एकादा राजा त्याची दुर्दशा करून त्याचेपासून करभार घेतो तद्वत्. "

माघश्चोरो मयूरो मुररिपुरपरो भारविः सारविद्यः
श्रीहर्षः कालिदासः कविरथ भवभूत्याह्वयो भोजराजः ॥
श्रीदंडी डिंडिमाख्यः श्रुतिमुकुटगुरुर्भल्लटो भट्टबाणः
ख्याताश्चान्ये सुबंध्वादय इह कृतिभिर्विश्वमाह्लादयंति ॥१६८॥

विश्वगुणादर्श.

संस्कृत कवींची माला:—" माघ, चोरकवि, मयूर, मुरारी, उत्तम विद्या पढलेला असा भारवी, श्रीहर्ष, कालिदास, भवभूति, भोजराजा, दंडी, डिंडिम, वेदविशारद असा भल्लट, बाणभट्ट आणि सुबंधु आदिकरून इतर दुसरे कविही आपल्या कृतींनीं विश्वास आल्हाद देतात."

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः ॥
हर्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविता कामिनीकौतुकाय ॥ १६९ ॥
जयदेव.

" ज्या कविता वधूचा चोर हा चिकुरनिकर (केशपाश), मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कविकुलाचा केवळ गुरुच म्हणजे कविश्रेष्ठ जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास) आणि बाण हा जिच्या हृदयांत संचार करणारा साक्षात् पंचबाण (मदन) होय, ती कोणाच्या चित्तास स्त्रीरूपाच्या कौतुकाला कारण होणार नाहीं!"

साक्षी पाणिनिपीडनस्य कुचयोराजन्मबंधुश्च मे
मुद्रांकोऽयमनंगलेखविधिषु द्यूतग्लहे बंधकः ॥
अंतः शून्यामिव प्रियेण हृदयं मूर्तं मयि प्रेषितम्
चक्षुर्मंगलमंगुलीयकमणिः सोऽयं चिराद्वीक्ष्यते ॥ १७० ॥

कोणी विरही पुरुषानें आपल्या स्त्रीचें कांहीं सांत्वन करण्याकरितां तिजकडे आपली आंगठी पाठविली. तिजकडे पाहत असतां तिच्या सखीनें विचारल्यावरून ती सांगते:—

" हा अंगुलियमणि उरोजनिपीडनाचा साक्षी होय, याची आणि माझी विवाहापासून आजपर्यंत सारखी प्रीति जडली आहे, मदनलेखांचे प्रसंगीं मुद्रण करण्यास हाच उपयोगीं पडे, आणि द्यूताचे प्रसंगीं हा पणाचे जागीं होई, तर माझ्या प्रियानें विरहोत्कीर्ण आपलें हृदयच जणो काय असा जो हा माझ्या नेत्राला मंगलप्रद अंगुलीयक मणि माझ्याकडे पाठविला आहे. त्याकडे केव्हांपासून मी मोठ्या प्रेमानें बघतें आहें!"

विकृतिं नैव गच्छंति दुष्टसंगेन साधवः ॥
आवेष्टितो महासर्पैश्चंदनः किं विषायते ॥ १७१ ॥

" दुष्टांची निरंतर संगति असतांही साधु विकृतीतें पावत नसतात. पहा मोठ्या मोठ्या सर्पांनीं सदा वेष्टिलेला असतांही चंदन विषारी होतो काय ?"

वचस्तत्रैव वक्तव्यं यत्रोक्तं सफलं भवेत् ॥
स्थायीभवति चात्यंतं रंगः शुक्लपटे यथा ॥ १७२ ॥

" त्याच ठिकाणीं भाषण करावें कीं जेथें त्याची सफलता होईल, आणि तें पूर्णपणें ठसून राहील; कीं जसा पांढऱ्या कापडावर रंग चांगला उमटतो!"

क्षणं सरलवीक्षणं क्षणमपांगसंवीक्षणम्
क्षणं रजसि खेलनं क्षणमतीव भूषादरः ॥
क्षणं द्रुततरा गतिः क्षणमतीव मंदा गतिः
क्षणक्षणविलक्षणं जयति चेष्टितं सुभ्रुवः ॥ १७३ ॥

कवि मुग्धावस्थेचे विलास वर्णितो:—" क्षणभर सरळ पाहणें, क्षणभर चोरून पाहणें, क्षणभर धुळींत खेळणें, क्षणभर दागदागिन्यांची हौस करणें; क्षणभर सत्वर चालणें, क्षणभर मंदगति दाखविणें; याप्रमाणें यौवनांत येऊं लागणाऱ्या स्त्रीचे विलास क्षणोक्षणीं विलक्षण दिसून येतात !"

मार्तंडमंडलनिभं भवतः प्रतापं ये वर्णयंति न हि ते कवयः प्रवीणाः ॥
अंभोनिधौ विलयमेति परं पतंगः पारं प्रयाति जलधेश्च भवत्प्रतापः १७४

" हे राजा ! तुझा प्रताप सूर्यमंडलासारखा आहे असें जे कवि वर्णन करतात ते मूढ होत; कां कीं सूर्याचें तेज तो समुद्रांत बुडाला म्हणजे विलयास पावतें; आणि तुझा प्रताप तर समुद्राच्याही पलीकडे जातो !"

गुणवानपि नोपयाति पूजां पुरुषः सत्पुरुषैरकथ्यमानः ॥
न हि सौरमणिः स्वभावकांतिं रविपादैरनधिष्ठितः करोति ॥ १७५ ॥

" पुरुष स्वतः जरी मोठा गुणवान् असला, तरी थोरांनीं जोंवर त्याची प्रशंसा केली नाहीं तोंपर्यंत तो लोकमान्यतेस पात्र होत नाहीं. पहा कीं, सूर्यकांत स्वभावतः तेजस्वी असतांही सूर्यकिरणांच्या अधिष्ठानाशिवाय त्याचें तेज बाहेर पडत नाहीं !"

पात्रापात्रविवेकोऽस्ति धेनुपन्नगयोरिव ॥
तृणात्संजायते क्षीरं क्षीरात्संजायते विषम् ॥ १७६ ॥

" दान करते समयीं पात्रापात्र विचार जो करावा लागतो त्याचा प्रकार असा आहे;—पहा, गाईला गवत घातलें तर त्यापासून दूध उत्पन्न होतें; आणि सर्पाला दूध घातलें तर त्याचें विष होतें ! "

आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ॥
आशा येषां दासी तेषां दासायते लोकः ॥ १७७ ॥

" जे धनतृष्णेचे दास ते साऱ्या लोकांचे दास होतात; आणि आशा ज्यांची दासी म्हणजे धनप्राप्तीविषयीं जे केवळ उदासीन असतात त्यांचें दास्य सर्व लोक करतात. "

दोषाकरः शिरसि तेऽस्ति गले द्विजिह्वः
पाषाणजा सहचरी पशुरंतरंगः ॥
दुखं निवेदयति को मम दीनबंधो
त्वं चेत्त्रिलोचन निमीलितलोचनोऽसि ॥ १७८ ॥

कोणी भक्त शिवास म्हणतो:—" हे त्रिलोचना ! दोषाकर (चंद्रपक्षीं, दोषमय) तर तुझ्या शिरीं आहे, कंठभागीं द्विजिह्व (सर्प; चहाडखोर) आहे, तुझी सखी पाषाणजा (पर्वतकन्या; व वास्तव अर्थातच कठोरहृदयाची) होय, आणि घरचा मोठा विश्वासुक सेवक तो पशु (नंदी) आहे; मग असें असून तूंही जर डोळे मिटून राहशील (ध्यानस्थ असशील), तर हे दीनबंधो ! माझें दुःख तुला कोण येऊन सांगेल ? "

असद्भिः शपथेनोक्तं जले लिखितमक्षरम् ॥
सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरम् ॥१७९॥

" दुष्ट मनुष्यांनीं शपथपूर्वक सांगितलेलें अक्षरही पाण्यावरच्या रेघेसारखें होय; पण सज्जनांनीं सहज बोललेलें वचन शिळेवर लिहिल्याप्रमाणें ! "

उद्योगः कलहः कंडूर्द्यूतं मद्यं परस्त्रियः ॥
आहारो मैथुनं निद्रा सेव्यमानं तु वर्धते ॥ १८० ॥

" उद्योग, कलह, खरूज, जुवा, मद्य, परस्त्री, भोजन, सुरत, निद्रा,— हीं सर्व जितकीं सेवावीं तितकीं वाढतात. "

नक्षत्राणि बहूनि संति परितः पूर्णोदयान्यंबरे
तैः किं शांतिमुपैति दीर्घतिमिरं किं वार्धिरुज्जृंभते ॥

किं स्यादार्तचकोरपारणविधिर्भ्रांतः सुधादीधिते
तन्नूनं भुवनैकतापशमनः श्लाघ्यस्तवैवोदयः ॥ १८१ ॥

" आकाशांत चोहोंकडे पुष्कळ नक्षत्रें पूर्ण उदयास पावून लकाकताहेत पण त्यांच्या योगानें रात्रीचा निबिड अंधकार लयास जाईल काय ? समुद्र वर उचंबळेल काय ? व तृषित जे चकोर त्यांचें समाधान होईल काय ?—यास्तव हे मित्रा चंद्रा ! केवळ तुझाच उदय भुवनाच्या तापशमनार्थ अपेक्षित आहे, व तोच श्लाघ्य होय ! "

निद्रामीलितलोचनो मृगपतिर्यावद् गुहां सेवते
तावत्स्वैरममी चरंतु हरिणाः स्वच्छंदसंचारिणः ॥
उन्निद्रस्य विधूतकेसरसटाभारस्य निर्गच्छतो
नादे श्रोत्रपथं गते गतधियः संत्वेव दीर्घायुषः ॥१८२॥

" जोंपर्यंत सिंह हा निद्रिस्त होत्साता गुहेचा आश्रय करून आहे, तोंवर हे स्वच्छंद संचार करणारे हरिण चोहोंकडे फिरोत; पण तो जागा होऊनच आपलें आयाळ झाडून बाहेर निघाला असतां व त्याची गर्जना कानीं पडली असतां हे मूढ मृग दीर्घायु असोत म्हणजे झाले ! "

हस्तांभोजे वदनमलकानायतान्बाहुमूले
द्वारे स्वैरं नयनमधरे तर्जनीं संनिधाय ॥
दीर्घोच्छ्वासं विरतविषयास्वादमुत्कंठितोष्णम्
मुग्धाक्षी त्वां हृदि विदधती वाष्पमाविष्करोति॥१८३॥

विरहिणीचें वर्णनः—" हातावर तोंड टेकून, केश खांद्यावरून मोकळे सोडून, अधरोष्ठावर तर्जनी ठेवून उत्कंठितत्वामुळें दीर्घ व उष्ण निःश्वास टाकणारी, व विरक्त झालेली, अशी ती सुंदरी केवळ तुझा निदिध्यास घेऊन अश्रुयुक्त होत्साती वारंवार दाराकडे पहात आहे व नेत्रांतून पाणी टाकीत आहे ! "

ब्रह्मन्नध्ययनस्य नैष समयस्तूष्णीं बहिः स्थीयताम्
स्वल्पं जल्प बृहस्पते जडमते नैषा सभा वज्रिणः ॥
वीणां संहर नारद स्तुतिकथालापैरलं तुंबुरो
सीतारल्लकभल्लभग्नहृदयः स्वस्थो न लंकेश्वरः ॥१८४॥

सीतेनें तिरस्कार केला असतां अस्वस्थहृदय झालेला असा रावण विरह-शय्येवर मदनपीडित होत्साता तळमळत होता. तेव्हां त्याचे द्वारपाळ बाहेर जाऊन देवांस धमकावितात:—" ब्रह्मदेवा ! ही अध्ययनाची वेळ नव्हे, बाहेर मुकाट्यानें बसावें; बृहस्पते ! मूर्खासारखी बडबड किती करतोस, ही कांहीं इंद्राची सभा नव्हे, आपलें पांडित्य अंमळ पुरें कर; नारदा ! तूं आपली वीणा आटोप;—हे तुंबरो ! स्तुतिपाठ सध्यां बस कर. कां तर, महाराजांची स्वारी सीतेच्या पक्ष्मरूप भाल्यानें विद्धहृदय झाली असून त्यांस आज चैन नाहीं ! "

आवृणोति यदि सा मृगीदृशी स्वांचलेन कुचकांचनाचलम् ॥
भूय एव बहिरेति गौरवादुन्नतो न सहते तिरस्क्रियाम् ॥ १८५ ॥

" ही मृगनयना आपल्या कुचरूप कांचनपर्वतास जरी पदरानें झांकीत आहे तरी तो गौरवास्तव पुनः प्रकट होऊं पहातोच. सारांश; स्वभावेंकरूनच जो उन्नत असतो त्यास अपमान कधीं सहन होत नसतो ! "

यत्पादाः शिरसा न केन विधृताः पृथ्वीभृतां मध्यत-
स्तस्मिन्भास्वति राहुणा कवलिते लोकत्रयीचक्षुषि ॥
खद्योतैः स्फुरितं तमोभिरुदितं ताराभिरुज्जृंभितम्
घूकैरुत्थितमाः किमत्र करवै किं केन नो चेष्टितम् ॥ १८६ ॥

" जगत्त्रयाचा चक्षु जो तेजस्वी सूर्य, कीं ज्याचे पाद (पाय—किरण) पर्वतश्रेष्ठांनींही शिरसा वंद्य केले, त्याचा राहूनें क्षणमात्र ग्रास केला असतां काय काय चमत्कार झाले पहा !—काजवे चमकूं लागले, गिरिकंदरांत दडलेला अंधकार पुनः पुढें सरसावला, तारे उदय पावले; फार काय सांगावें, क्षुद्र वैरी जे घूक ते सुद्धां उठले ! " ही अर्थातच अन्योक्ति होय.

दातुरुन्नतवित्तस्य गुणयुक्तस्य चार्थिनः ॥
दुर्लभः खलु संयोगः सद्बीजक्षेत्रयोरिव ॥ १८७ ॥

" मोठा श्रीमंत दाता आणि सत्पात्र अर्थी यांचा संयोग उत्तम बीज आणि उत्तम क्षेत्र यांच्याप्रमाणें मोठा दुर्लभ होय. "

दिगंते खेलंती सरसहृदयानंदजननी
मया नीता भोजक्षितिपनगरीमंब कविते ॥

अकस्मादुन्मीलत्खलवदनवल्मीकरसना–
भुजंगीदष्टांगी शिव शिव समाप्तिं गतवती ॥ १८८ ॥

" हे माते कविते ! तूं जी दिगंतीं भ्रमण करणारी व रसिकांच्या हृदयास आनंद देणारी, त्या तुला मी भोजराजाच्या नगरास नेली, पण तेथें अकस्मात् खलवदनरूप वारुळांतून जिव्हारूप नागीण निघून तिनें तुला दंश केला आणि तुझा अंत झाला ! हर हर ! "

पिंडे पिंडे मतिर्भिन्ना कुंडे कुंडे नवं पयः ॥
जातौ जातौ नवाचारा नवा वाणी मुखे मुखे ॥ १८९ ॥

" मनुष्या मनुष्याची बुद्धि निराळी असते; कुंडा कुंडांत निरनिराळ्या प्रकारचें पाणी असतें; दर एक जातीचे निरनिराळे आचार असतात; आणि निरनिराळ्या लोकांची निरनिराळी भाषा असते. "

नहि ज्येष्ठस्य ज्येष्ठत्वं गुणैर्ज्येष्ठत्वमुच्यते ॥
केतकीवरपत्रेषु लघुपत्रस्य गौरवम् ॥ १९० ॥

" श्रेष्ठत्व जें गणिलें जातें तें वयावरून नव्हे, तर गुणावरून गणतात. पहा ! केवड्याच्या पानांत जें अत्यंत लहान असतें त्याची योग्यता विशेष ! "

यदि स्मरामि तन्वंगीं जीविताशा कुतो मम ॥
अथ विस्मृत्य जीवामि जीवितव्यसनेन किम् ॥ १९१॥

कोणी विरही पुरुष म्हणतो:—" प्रियतमेचें स्मरण जर माझ्या ठायीं राहील, तर मग वांचण्याची आशा नकोच; आणि तिचें विस्मरण पडून जर मी जिवंत राहीन, तर मग तें जिणें केवळ भारवत् होय ! "

ऋषीणां च नदीनां च कुलानां च महात्मनाम् ॥
प्रभवो नाधिगंतव्यः स्त्रीणां दुश्चरितस्य च ॥ १९२ ॥

" ऋषि, नद्या, आणि थोर पुरुषांचें कूळ यांचें मूळ शोधीत बसूं नये; त्याप्रमाणें स्त्रियांच्या दुराचरणाचेंही. " *

नैव व्याकरणज्ञमेव पितरं न भ्रातरं तार्किकं
मीमांसानिपुणं नपुंसकमिति ज्ञात्वा निरस्तादरा ॥

---

* लोकांत म्हण आहे, " नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ हा पाहूं नयेत. "

दूरात्संकुचितेव गच्छति पुनश्चांडालवच्छांदसम्
काव्यालंकरणज्ञमेव कविताकांता वृणीते स्वयम् ॥ १९३ ॥

" कविताकांता ही वैयाकरणास पित्यासमान व तर्कज्ञास भ्रात्यासमान मानून त्यांचा अंगीकार करीत नाहीं, मीमांसकास तर षंढ समजून त्याचा तिरस्कार करते, आणि वैदिकाचा तर चांडाळाप्रमाणें विटाळ मानून त्यांपासून संकोच पावून दूर निघून जाते; परंतु काव्यालंकार जाणणारास मात्र आपण होऊन वरते ! "

उद्दंडे भुजदंडे तव कोदंडे परिस्फुरति ॥
अरिमंडलरविमंडलरंभाकुचमंडलानि वेपंते ॥ १९४ ॥

" हे राजा तुझ्या प्रबळ भुजदंडावर धनुष्य चढलें असतां शत्रूंचें मंडळ, सूर्यमंडळ, आणि रंभेचें कुचमंडळ, हीं तिन्हीं कंपायमान होतात. " म्हणजे शत्रूंचा थरकांप होतो, सूर्यास आपलें मंडल भेदून वीर गमन करतील म्हणून धाक पडतो, आणि रंभादि अप्सरा भावी वीरालिंगनाची उत्प्रेक्षा करून हर्षकंपित होतात.

किं जन्मना महति किं पितृपौरुषेण
शक्त्यैव याति निजया पुरुषः प्रतिष्ठाम् ॥
कुंभो हि कूपमपि शोषयितुं न शक्तः
कुंभोद्भवेन मुनिनांऽबुधिरेव पीतः ॥ १९५ ॥

" मोठ्या कुलांत जन्म पावून काय उपयोग आहे ? व बापाचा पराक्रम मुलाच्या काय कामाचा ? पुरुष जो प्रतिष्ठा पावतो तो स्वतःच्याच सामर्थ्यावर पावतो. पहा कीं, मातीच्या घड्यास विहीर सुद्धां शोषून टाकण्याची शक्ति नसते, पण त्यापासून जन्म पावलेला जो मुनि (अगस्त्य) त्यानें समुद्रांचेंही प्राशन करून टाकलें ! "

वेश्यानामिव विद्यानां मुखं कैः कैर्न चुंबितम् ॥
हृदयग्राहिणस्तासां द्वित्राः संति न संति वा ॥ १९६ ॥

" वेश्यांप्रमाणें विद्यांचें मुखचुंबन कुणें कोण करीत नाहीं ? परंतु त्यांचें हृद्य ज्यांच्या हातीं लागलें आहे असे दोन तीनच असतात किंवा नसतात ! "

स्वस्त्यस्तु विद्रुमवनाय नमो मणिभ्यः
कल्याणिनी भवतु मौक्तिकशुक्तिमाला ॥

प्राप्तं मया सकलमेव फलं पयोधे
यद्दारुणैर्जलचरैर्न विदारितोऽस्मि ॥ १९७ ॥

" हे समुद्रा ! तुझीं पोंवळ्याचीं वनें सुखानें असोत; तुझ्या रत्नांस माझा नमस्कार असो; व मोतींशिंपांचेंही निरंतर कल्याण असो; मला सगळें येवढ्यानेंच पावलें कीं, तुझ्या पोटांतल्या क्रूर जलचरांच्या तडाक्यांतून मी धडपणीं वर निघून आलों ! " ही अर्थात् अन्योक्ति होय.

ताते सुतानां सुरतेऽगनानां स्तुतौ कवीनां समरे भटानाम् ॥
त्वंकारयुक्ता हि गिरः प्रयुक्ता रसाधिकाश्चारुतरा भवंति ॥१९८॥

" बापाशीं मुलगा लडिवाळपणानें बोलत असतां, स्त्रियांच्या रतिप्रसंगीं, कवि राजाचें स्तोत्र गात असतां, तसेंच योद्ध्यांच्या समरप्रसंगीं, ' तूं ' या शब्दानें बोललेलीं भाषणें रसाधिक होऊन अधिक रम्य होतात ! "

ते वंद्यास्ते महात्मानस्तेषां लोके स्थिरं यशः ॥
यैर्निबद्धानि काव्यानि ये वा काव्ये प्रतिष्ठिताः ॥ १९९ ॥

" तेच वंद्य, तेच महात्मे, आणि त्यांचेंच यश लोकांचे ठायीं चिरकाल राहणारें आहे, कीं ज्यांनीं काव्यें रचलीं, किंवा जे त्यांत प्रतिष्ठित झाले आहेत, म्हणजे ज्यांचें त्यांत यशोवर्णन केलेलें आहे. "

रूपं सुदर्शनं ते वदनं पद्मं च नंदको हासः ॥
वससि न हरेः करे किं त्वं किल कौमोदकी गोपि ॥ २०० ॥

" हे गोपि ! तुझें रूप सुदर्शन (दिसण्यास सुरेख; पक्षीं, कृष्णाचें चक्र) आहे; तोंड पद्म आहे, हास्य नंदक (आनंदविणारें; पक्षीं, विष्णूचा खड्ग) आहे; आणि तूं स्वतः कौमोदकी (पृथ्वीवर आनंद देणारी; पक्षीं, विष्णूची गदा) आहेस; मग हरीच्या करीं कां रहात नाहींस ? "

अविवेकात्पीडयतां स्थितमन्योन्यमंडलम् ॥
कुनृपाणां कुचानां च पतनाय समुच्छ्रयः ॥ २०१ ॥

" विवेकशून्यत्वास्तव एकमेकांच्या मंडलास पीडा करणारे (पक्षांतरीं, निरंतरत्वास्तव परस्पर संलग्न असणारे) असे दुष्ट राजे व कुच यांची उन्नति झाली असतां त्यांस पतन घडणारच ! "

अकर्णमकरोच्छेषं विधिर्ब्रह्मांडभंगधीः ॥
श्रुत्वा रामकथां रम्यां शिरः कस्य न कंपते ॥ २०२ ॥

" ब्रह्मदेवानें शेषास कर्णहीन उत्पन्न केलें कीं ब्रह्मांडाचा भंग होऊं नये; कारण रम्य जी रामकथा ती कानीं पडली असतां कोणाचें शिर आनंदानें कंपायमान होत नाहीं ? "

आरोग्यं विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुले जन्म ॥
स्वाधीनता च पुंसां महदैश्वर्यं विनाऽप्यर्थैः ॥ २०३ ॥

" आरोग्य, विद्वत्ता, सज्जन पुरुषांचा समागम, मोठ्या कुलांत जन्म आणि स्वतंत्रता, हीं पांच संपत्तीशिवाय पुरुषांस मोठीं ऐश्वर्यें होत. "

शूली जातः कदशनवशाद्भिक्षयायोगात्कपाली
वस्त्राभावाद्गगनवसनः स्नेहशून्याज्जटावान् ॥
इत्थं राजन्तव परिचयादीश्वरत्वं मयाऽप्तम्
तस्मान्मह्यं किमिति कृपया नार्धचंद्रं ददासि ॥ २०४ ॥

कोणी एका कवीनें राजापुढें आपलें दैन्य भाकलें असतांही त्यानें द्वारपालाकडून त्यास घालवून दिलें, तेव्हां तो उलटून राजास म्हणतोः—

" हे राजा ! मी कदन्नाच्या भक्षणेंकरून शूली (शूलधारी-शूलव्यथित) झालों; भिक्षा मागण्यानें कपाली (कपालधारी शिव) झालों; वस्त्रें नेसण्यास व पांघरण्यास नसल्यानें दिगंबर (दोन्ही अर्थ प्रसिद्धच आहेत) झालों; स्नेहाच्या (तेलाच्या) शून्यत्वास्तव जटाधर झालों.—मग याप्रमाणें तुझ्या परिचयास्तव मला ईश्वरत्व (राजत्व-शिवत्व) प्राप्त झालें असतां तू कृपायुक्त होऊन मला अर्धचंद्र (पक्षीं, गचांडी) देतोस यांत नवल कसचें ! "

न जाने संमुखायाते प्रियाणि वदति प्रिये ॥
सर्वाण्यंगानि मे यांति नेत्रतां किमु कर्णताम् ॥ २०५ ॥

कोणी स्त्री आपल्या सखीस सांगते—" प्रिय जवळ येऊन गोड गोष्टी सांगूं लागला असतां माझे सर्व शरीरावयव नेत्र होतात कीं कर्ण होतात, हें मला कळत नाहीं. " म्हणजे दोन्ही इंद्रियांच्या शक्ति सारख्याच वेधून जातात.

मारात्परः शूरतरो न कश्चित्पराभवः स्त्रीहरणाच्च चान्यः ॥
तथाऽपि नाब्धिं प्रविवेश रामो बबंध सेतुं विजयी सहिष्णुः ॥२०६॥

" मदनाहून दुसरा कोणी अधिक वीर नाहीं, व स्त्रीहरणाहून दुसरी अपमानकारक गोष्ट नाहीं; तरी रामानें उतावळेपणानें समुद्रांत उडी घातली नाहीं, तर सेतूचें बंधन केलें. विजयी जनानें सहिष्णु असावें. "

अदृष्टमुखभंगस्य युक्तमंधस्य याचितुम् ॥
अहो बत महत्कष्टं चक्षुष्मानपि याचते ॥ २०७ ॥

" आंधळेपणामुळें ज्यास मनुष्याची क्रोधचर्या दिसत नाहीं अशानें याचना केली असतां एक वेळ चालेल; पण ज्याला डोळे आहेत अशानें दैन्य भाकणें हें केवढें दुःखास्पद आहे ! "

पयोधेः सर्वस्वं शिरसि धृतवान्यं नृपगणः
पणो यस्य क्षोणी चतुरुदधिसीमावधिरभूत् ॥
स एवायं दैवाच्छबरवनितापाणिपतितो
मणिर्मेषग्रीवाद्विगुणगुणबद्धो विहरति ॥ २०८ ॥

" जें रत्न समुद्राचें सर्वस्वभूत असून ज्यास मोठमोठे राजे मस्तकाचे ठायीं धारण करते झाले; आणि ज्याचें मोल समुद्रवलयांकित सकल पृथ्वी होती; तो दुर्दैवानें भिल्लिणीच्या हातीं लागला असतां मेंढ्याच्या गळ्यांत दुहेरी दोऱ्यानें बांधला जाऊन आतां विहार करीत आहे ! "

आपातालगभीरे मज्जति नीरे निदाघसंतप्तः ॥
न स्पृशति पल्वलांभः पंजरशेषोऽपि कुंजरः क्वापि ॥२०९॥

" हत्ती रोड होऊन अस्थिपंजररूप जरी झाला, तरी पाताळापर्यंत खोल अशा डोहांतच ग्रीष्मकाळच्या शरीरदाहास शमविण्याकरितां बुडी मारतो; डबक्याच्या पाण्यास शिवतही नाहीं ! "

क्षपाः क्षामीकृत्य प्रसभमपहृत्यांबु सरिताम्
प्रताप्योर्वीं सर्वां तरुगहनमुच्छोष्य सकलम् ॥
क्व संप्रत्युष्णांशुर्गत इति तदालोकनपरा—
स्तडिद्दीपा लोकं दिशि दिशि चरंतीव जलदाः ॥ २१० ॥

वर्षाकालांतील रात्रीचें वर्णन:—" रात्रीस कृश करून टाकून, नद्यांचें पाणी बळेंच हरण करून, साऱ्या पृथ्वीस अत्यंत तप्त करून, झाडांचे कुंज सारे वाळवून टाकून, सूर्य कोणीकडे नाहींसा झाला म्हणून विद्युल्लतारूप दीपिका घेऊन साऱ्या दिशा मेघ जणू काय शोधीत आहेत ! "

स्वेदस्ते कथमीदृशः प्रियतमे त्वन्नेत्रवह्नेर्विभो
कस्माद्वेपितमेतदिंदुवदने भोगींद्रभीतेर्भवम् ॥
रोमांचः कथमेष देवि भगवन्गंगांभसः शीकरै-
रित्थं भर्तरि भावगोपनपरा गौरी चिरं पातु वः ॥२११॥

गौरीहर संवाद.—" हे प्रियतमे ! तुझ्या अंगावर हे स्वेदबिंदु कशामुळें दिसतात ? हे विभो ! तुझ्या नेत्राग्नीच्या योगानें; हे इंदुवदने हा कंप कशामुळें उत्पन्न झाला आहे ? महासर्पाच्या भीतीनें; हे देवि ! या रोमांचांचें कारण काय ? हे भगवन् गंगेचे तुषार;—याप्रमाणें प्रणयानें उत्पन्न झालेल्या वृत्ति जिनें शिवापाशीं लपविल्या ती पार्वती तुमचें रक्षण करो ! " हा छेकापन्हुति अलंकार होय.

तमस्तोम भृशं सोममंडलोपरि राजसे ॥
धूमपानेन किं नाम धाम गम्यमतः परम् ॥ २१२ ॥

" हे अंधकारसमूहा ! तूं चंद्रमंडलाच्या वर फार शोभा पावत आहेस. धूमपानरूप तपश्चरणानें याहून उत्तम स्थान तुला कोणतें प्राप्त व्हावें ? " या श्लोकांत अंधकारसमूह हा केशकलाप होय, चंद्रमंडल मुख होय व धूमपान सुगंधी द्रव्यांची धुरी होय. "

करे वेणीमेणीसदृशनयना स्नानविरतौ
दधाना हर्म्याग्रे हरनयनतेजोहतमपि ॥
इयं मुग्धा दुग्धांबुधिबहलकल्लोलसदृशा
दृशा वारं वारं मनसिजतरुं पल्लवयति ॥ २१३ ॥

" नाहणें होऊन गच्चीवर हातांत केश धरून उभी राहिलेली ही मृगनयना क्षीरसागराच्या कल्लोलाप्रमाणें धवल अशा दृष्टीनें शिवाच्या नेत्राग्नीनें दग्ध झालेल्या मदनवृक्षास वारंवार पालवीत आहे ! "

किं छत्रं किं नु रत्नं तिलकमथ तथा कुंडलं कौस्तुभं वा
चक्रं वा वारिजं वेत्यमरयुवतिभिर्यद्बलिद्विषि देहे ॥
ऊर्ध्वं मौलौ ललाटे श्रवसि हृदि करे नाभिदेशे च दृष्टम्
पायात्तद्वोऽर्कबिंबं स च दनुजरिपुर्वर्धमानः क्रमेण ॥ २१४ ॥

" वामनावतारीं विष्णूनें आपलें प्रचंड रूप एकदम प्रगट केलें असतां देवांगनांस सूर्य हा प्रथम त्याच्या डोक्यावरील छत्र, नंतर शिरोभागींचें रत्न, नंतर कपाळावरचा टिळा, नंतर कानांतील कुंडल, नंतर हृदयावरील कौस्तुभ, नंतर हातांतील चक्र, आणि शेवटीं नाभिस्थानचें कमल, असें क्रमाक्रमानें वाटलें;—असा तो दैत्यरिपु व तें सूर्यबिंब तुमचें रक्षण करो ! "

दामोदरस्य मुरली कथं न भवति प्रिया ॥
विप्रयोगे गतप्राणा सप्राणाऽधरयोगतः ॥ २१५ ॥

" मुरली ही कृष्णास अत्यंत प्रियकर कां वाटणार नाहीं ?—जी त्याचा वियोग झाला असता गतप्राण (वायुपूर्ण व निर्जीव) व अधराचा संयोग झाला असता प्राणवती (वायुशून्य व सजीव) होते. "

यो न संचरते देशान्यो न सेवेत पंडितान् ॥
तस्य संकुचिता बुद्धिर्घृतबिंदुरिवांभसि ॥ २१६ ॥

" जो देशाटन करीत नाहीं, व पंडितांचा समागम करीत नाहीं, त्याची बुद्धि पाण्यांत जसा तुपाचा थेंब त्याप्रमाणें संकुचितच राहते. "

यस्तु संचरते देशान्यस्तु सेवेत पंडितान् ॥
तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिंदुरिवांभसि ॥ २१७ ॥

" जो निरनिराळ्या देशांत फिरतो व पंडितांच्या समागमें राहतो, त्याची बुद्धि पाण्यांत जसा तेलाचा बिंदु त्याप्रमाणें विस्तार पावत जाते ! "

घटीयंत्रायते हारो नाभिकूपे मृगीदृशः ॥
संसेक्तुमिव लावण्यपयसा यौवनद्रुमम् ॥ २१८ ॥

" मृगनयनेच्या यौवनरूप वृक्षास लावण्यरूप उदकानें सिंचन करण्यास्तवच जणू काय हा मौक्तिकहार नाभिकूपावर घटीयंत्राप्रमाणें (रहाटगाडग्याप्रमाणें) लोंबत आहे ! " हें सावयव रूपक होय.

कृशोदरि निशा कृशा तदपि ते न मानः कृशः
पुरोदिगनुरागिणी तदपि नानुरागोदयः ॥

प्रसन्नमिदमंबरं तदपि न प्रसन्नं मनो
नदंति चरणायुधास्तदपि मौनमालंबसे ॥ २१९ ॥

कोणी पुरुषानें आपल्या प्रियतमेचा कोप दूर करण्याकरितां तीस उद्देशून परोपरीचीं अनुनयपूर्वक भाषणें केलीं, तरी तिची समजावणी होईना. शेवटीं रात्र सरत आली तेव्हां तो तीस म्हणतोः—

" हे मानिनी ! रात्र कृश झाली तरी तुझा मान कृश होत नाहीं; प्राची दिशा अनुरागयुक्त (किंचित् आरक्त) झाली तरी तुझ्या अनुरागाचा (प्रेमाचा) अद्याप उदय होत नाहीं; हें आकाश प्रसन्न (स्वच्छ) झालें तरी तुझें मन प्रसन्न (प्रसादयुक्त) होत नाहीं; पहा ! चरणायुध (कुक्कुट) शब्द करूं लागले तरी तूं अद्याप दृढ मौन धारण करून बसली आहेस ! "

द्वारं खड्गिभिरावृतं बहिरपि प्रस्विन्नगंडैर्गजै-
रंतः कंचुकिभिः स्फुरन्मणिधरैरासादिता भूमयः ॥
आक्रांतं महिषीभिरेव शयनं त्वद्विद्विषां मंदिरे
राजन्सैव चिरंतनप्रणयिनी शून्येऽपि राज्यस्थितिः ॥२२०॥

कोणी कवि राजाच्या प्रतापाचें वर्णन करतोः—" हे राजा ! तुझ्या शत्रूंच्या मंदिरांच्या द्वारभागीं अद्याप खड्गी (गेंडे; पक्षीं, द्वाररक्षक) आहेत; बाहेर मदोदकानें स्रवणारे हत्ती आहेत (म्हणजे आतां चोहोंकडे अरण्य झाल्यामुळें वनचर हत्ती तेथें दृष्टीस पडतात;) आंत तेजस्वी रत्नें धारण करणारे कंचुकी (सर्प, पक्षीं, अंतःपुररक्षक) इकडून तिकडे वावरत आहेत; त्याप्रमाणेंच त्यांचें शय्यास्थानही महीषींनीं (म्हशींनीं; पक्षीं, राजस्त्रियांनीं) अधिष्ठित आहे. सारांश, फार दिवस राहिल्यानें तेथें रमलेली राज्यस्थिति अद्याप त्या शून्यस्थळीं नांदत आहे ! "

कविता वनिता चैव स्वयमेवागता वरा ॥
बलादाकृष्यमाणा सा सरसा विरसा भवेत् ॥२२१॥

" कविता व तरुण स्त्री हीं स्वतः होऊन आली असतां त्यांत मजा आहे; पण जर दोहोंचें बलानें आकर्षण केलें, तर दोघी मूळच्या सरस असल्या तरी वरील घर्षणाच्या योगानें अत्यंत विरस होतात ! "

मुक्तं मौक्तिकदाम हेमवलयश्रेणी समुत्सारिता
वासो नीलमुरीकृतं नियमितो मंजीरकोलाहलः ॥
गच्छंत्यास्तव साहसं न सहते तन्वंगि संगोपनम्
धम्मिल्लच्युतमल्लिकापरिमलप्रौढो निशीथानिलः ॥२२२॥

अभिसारिकेचें वर्णनः—" हे तन्वंगि ! तूं कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून मोत्यांचा हार टाकून दिलास, सुवर्णकंकणें काढून टाकलींस, नील वस्त्र पांघरलीं आहेस, पैंजणाचा नाद बंद केला आहेस; याप्रमाणें तूं आपणाकडून सारा बंदोबस्त केला आहेस, पण तुझ्या शिरींच्या नवमल्लिकेच्या सुगंधानें भरलेल्या मध्यरात्रसमयींच्या वायूस तुझें साहस सहन न होऊन तो तुला प्रकट करूं पाहत आहे ! "*

नोष्णश्वासं कलयति न वा गंडयोः पांडिमानम्
दृष्टे वस्तुन्यपि च भजसि प्रत्यभिज्ञामभिज्ञा ॥
कौलं धर्मं वहसि बहलं तद्ध्रुवं नंदसूनो-
र्वंशीनादस्तव न सरले श्रोत्रदेशं विवेश ॥ २२३ ॥

" तूं उष्ण श्वास टाकीत नाहींस, तुझ्या गालांवर पांढुरकी आली नाहीं, पुढें असलेल्या पदार्थाविषयीं तुला भ्रांति न पडून तूं तो ओळखतेस, आणि कुलांगनांची रीत तूं अजून अस्खलित चालविली आहेस; या सर्व चिह्नांवरून मला वाटतें कीं, हे सरले ! नंदपुत्राचा वेणुनाद तुझ्या कर्णपथावर अद्याप आला नाहीं ! "

मुहुः स्खलति नीविका पुलकिता च गंडस्थली
दृशारपि कृशोदरि स्फुरति रीतिरन्यादृशी ॥
वचोऽपि तव गद्गदं स्फुरदमंदचंद्रानने !
मुरारिमुरलीरवः कथय किं समाकर्णितः ॥ २२४ ॥

---

* 'मृच्छकटिक' नाटकांत प्रथम प्रवेशांत विटाचें वसंतसेनेस अशाच प्रकारचें भाषण आहेः—

कामं प्रदोषतिमिरेण न दृश्यसे त्वम्
सौदामिनीव जलदोदरसंविलीना ॥
त्वां सूचयिष्यति तु माल्यसमुद्भवोऽयम्
गंधश्च भीरु मुखराणि च नूपुराणि ॥

" तुझी निरगांठ वारंवार सरकते, तुझ्या गालांवर रोमांच उठले आहेत, नेत्रांची स्थितिही कांहीं चमत्कारिक झाली आहे आणि तुझा कंठ दाटून येऊन शब्द उमटेनासा झाला आहे, तर हे मंदोदरि ! हे पूर्णचंद्रानने ! मुरारीच्या मुरलीचा नाद तूं ऐकलास कीं काय ? "

भ्रांत्वा दिग्वलयं दशास्यदमन त्वत्कीर्तिहंसी दिवम्
याता ब्रह्ममरालसंगमवशात्तत्रैव गर्भिण्यभूत् ॥
पश्य स्वर्गतरंगिणीपरिसरे कुंदावदातं तया
मुक्तं भाति विशालमंडकमिदं शीतत्विषो मंडलम् ॥ २२५ ॥

चंद्रमंडलावर उत्प्रेक्षाः—" हे दशाननांतका ! तुझी कीर्तिहंसी सगळ्या दिशा फिरतां फिरतां स्वर्गास गेली, तेथें ब्रह्मदेवाच्या हंसाशीं तिचा संगम होऊन तेथेंच तिनें कुंदपुष्पाप्रमाणें धवल असें मोठें अंड टाकून दिलें, तें हें चंद्रमंडल दिसत आहे ! "

साक्षीकृत्य महेश्वरं सगिरिजं स्वर्गापगायास्तटे
प्राणानां शरणं कलेवरधनं न्यासीकृतं सज्जनैः ॥
भूयो भूरितरैरुपायनितरैः संप्रार्थ्यमाना तु या
दातुं नेच्छति सा नु किं मुनिवरैर्धन्येति काशीयते ॥ २२६ ॥

" शिव व पार्वती यांस साक्षी ठेवून गंगेच्या कांठीं प्राणांचें वसतिस्थान जें शरीर तेंच धन सज्जनांनीं ठेव म्हणून काशीपाशीं ठेवलें असतां व नंतर अनेक उपायांनीं तें पुनः मागितलें असतां तें ती पुनः परत देऊं इच्छीत नाहीं; तर अशीस मोठमोठे मुनि धन्य म्हणून तिचे ठिकाणीं गमन का करितात ? " या श्लोकांत व्याजनिंदा अलंकार आहे.

कस्तूरीयंति भाले तदनु नयनयोः कज्जलीयंति कर्ण—
प्रांते नीलोत्पलीयंत्युरसि मरकतालंकृतीयंति देव्याः ॥
रोमालीयंति नाभेरुपरि हरिमणीमेखलीयंति मध्ये
कल्याणं कुर्युरेते त्रिजगति पुरजित्कंठभासां विलासाः ॥२२७॥

" त्रिपुरारि जो शिव त्याच्या कंठाच्या कांतीचे विलास त्रिजगताचें कल्याण करोत. ते विलास कसे ? तर पार्वतीच्या कपाळावर वरील प्रभा कस्तूरीसारखी शोभते, डोळ्यास कज्जलाप्रमाणें होते, कर्णाचे ठायीं नीलो-

त्पलापरी भासते, वक्षःस्थलावर पांचेच्या अलंकाराप्रमाणें दिसते, नाभिप्रदेशीं रोमावलीसारखी शोभते आणि कटीचे ठायीं पाचेची मेखलाच कीं काय असा भास होतो ! "

स्फटिकमरकतश्रीहारिणोः प्रीतियोगा-
त्तदवतु वपुरेकं कामकंसद्विषोर्वः ॥
भवति गिरिसुतायाः सार्धमंभोधिपुत्र्या
सदृशमहसि कंठे यत्र सीमाविवादः ॥ २२८ ॥

" काम आणि कंस यांच्या शत्रूंचें स्फटिक व पांच यांची प्रभा हरणारें असें एकवट झालेलें शरीर तुमचें रक्षण करो; कीं, ज्याच्या कंठाचे ठायीं पार्वतीचा व लक्ष्मीचा प्रीतिपूर्वक सीमाविवाद होतो, म्हणजे दोघांच्याही कंठप्रदेशाचा नीलवर्ण असल्यामुळें वरील दोघींस आपआपली हद्द कोठवर आहे ती बरोबर समजत नाहीं ! "

गतास्ते राजानः परतरणिभोजप्रभृतयो
गुणो दानं त्यागस्त्रयमपि च येषां स्थिरमभूत् ॥
गुणः कोदंडेऽद्य द्विरदवदने दानमधुना
सतां देशत्यागे निवसति वचस्त्याग इति च ॥ २२९ ॥

" ते सूर्याहून तेजस्वी भोजप्रभृति राजे गेले, कीं ज्यांच्या ठायीं गुण, दान आणि त्याग (उदारता) हीं तिन्ही स्थिर असत; आतां पाहिलें तर गुण (दोरी) हीं धनुष्याचे ठायीं, दान (मदोदक) हत्तीच्या गंडस्थळीं, आणि विद्वज्जनांनीं देशत्याग केला असतां त्यास काय ती त्याग ही संज्ञा द्यावयाची ! "

सस्यानि स्वयमत्ति चेद्वसुमती माता सुतं हंति चे-
द्वेलामंबुनिधिर्विलंघयति चेद्भूमिं दहेत्पावकः ॥
आकाशं जनमस्तके पतति चेदन्नं विषं चेद्भवे-
दन्यायं कुरुते यदा क्षितिपतिः कस्तं निरोद्धुं क्षमः ॥ २३० ॥

" पृथ्वीच शेतें जर खाईल, आई मुलाला मारील, समुद्र वेलेचें अतिक्रमण करील, अग्नि भूमीचें दहन करील, आकाश कोसळून लोकांच्या डोक्यावर पडेल, अन्न विष होईल, आणि राजा स्वतःच अन्यायानें आचरण करील, तर त्याला प्रतिबंध कोणीं करावा ? "

स्थिरत्वमचिरद्युतौ तमसि कोऽपि बंधग्रहो
विधौ किमपि सौरभं मधुनि काऽपि वर्णात्मता ॥
शिरीषनवदामनि स्फुरति कोऽपि शैलोदयो
वयोऽभिनववेधसस्तदिह मन्महे कौशलम् ॥ २३१ ॥

" विद्युल्लतेचे ठायीं स्थिरत्व, अंधकारास बंधन, चंद्राचे ठायीं सुगंध, मधाचे ठायीं मनोहर रंग, शिरीषपुष्पांच्या नव्या मालेचे ठायीं विचित्र असा पर्वतोदय,—हें सर्व यौवनरूप अपूर्व ब्रह्मदेवाचें कुशलत्व होय असें आम्ही मानतो ! " वरील विद्युल्लतादि कशाकशाचें सूचक होय हें रसिकास सहज समजणार आहे.

दिक्चक्रं मृगतृष्णया कवलितं व्योमापि भास्वत्कर-
च्छायाभिः क्षुरितं तुषानलकणप्रायाश्च भूरेणवः ॥
पांथाः पल्लवसंकुलद्रुमलताकुंजे मुहुः शेरते
मज्जत्कुंजरताललोलितजलाः क्षुभ्यंति तोयाशयाः ॥ २३२ ॥

ग्रीष्मकालाचें वर्णनः—" साऱ्या दिशा मृगजळांनीं व्याप्त झाल्या आहेत; आकाशही सूर्याच्या प्रखर किरणांनीं जणो काय कांपलें आहे; पृथ्वीचीं धूळ आगीच्या ठिणग्याप्रमाणें तप्त झाली आहे; पांथस्थ लोक दाट पालवीच्या लताकुंजांत विसांवा घेत आहेत, आणि पाण्याचे डोह आंत पोहणाऱ्या हत्तींच्या क्रीडेनें क्षुब्ध होत आहेत. "

विशाखांतं गता मेघाः प्रसवांतं हि यौवनम् ॥
प्रणामांतः सतां कोपो याचनांतं हि गौरवम् ॥ २३३ ॥

" विशाखा लागल्या कीं मेघांची समाप्ति झाली, स्त्री प्रसूत झाली कीं तिचें तारुण्य संपलें, नमस्कार करण्यापर्यंतच सज्जनांचा कोप राहतो आणि जोंपर्यंत कोणापाशीं याचना केली नाहीं तोंवरच गौरव ! "

किमिति सखे परदेशे गमयसि दिवसान्धनाशयं लब्धुम् ॥
वर्षति मौक्तिकनिकरं तव भवनद्वारि कांचनी वल्ली ॥ २३४ ॥

" हे मित्रा ! धनराशीच्या लोभास्तव परदेशांत कालक्रमण कां करतोस ? अरे, तुझ्या दारीं सोन्याची वेल मोत्यांचा सडा टाकीत आहे ! " व्यंग्यार्थ

उघडच आहे कीं; तुझी सुंदर स्त्री तुझ्या वियोगाच्या दुःखानें घरीं विलाप करते आहे, तर येवढें कठीण मन करून दूरदेशीं कशाला हिंडतोस ?

यदि वा याति गोविंदो मथुरातः पुनः सखि ॥
राधाया नयनद्वंद्वे राधानामविपर्ययः ॥ २३५ ॥

" हे सखि ! मथुरेहून पुनः जर कृष्ण जाईल, तर राधेच्या नेत्रद्वयाचे ठायीं ' राधा ' या नांवाचा विपर्यय दृष्टीस पडेल. " म्हणजे तिच्या नेत्रावाटें अश्रूंची ' धारा ' चालेल !

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते पिपासितैः काव्यरसो न पीयते ॥
न च्छंदसा केनचिदुद्धृतं कुलं हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः॥२३६॥

" जे क्षुधित झाले त्यांस खावयाला व्याकरण उपयोगीं पडत नाहीं; तृषा लागली असतां काव्यांचा रस प्राशन करतां येत नाहीं; व वेदाध्ययनाच्या योगानें कोणीं कुटुंबभरण केलें आहे असेंही नाहीं; तस्मात् सर्व गुण निष्फळ समजून सुवर्णाच्या प्राप्तीचा तेवढा उद्योग करीत जा ! "

पीतः क्रुद्धेन तातश्चरणतलहतो वल्लभोऽन्येन रोषा-
दाबाल्याद्विप्रवर्यैः स्ववदनविवरे धार्यते वैरिणी मे ॥
गेहं मे छेदयंति प्रतिदिवसमुमाकांतपूजानिमित्तम्
तस्मात्खिन्ना सदाऽहं द्विजकुलनिलयं नाथ नित्यं त्यजामि ॥२३७॥

" एकानें माझ्या बापास पिऊन टाकला, दुसऱ्यानें नवऱ्यास लाथ मारिली, माझी वैरिणी जी सरस्वती तिला विप्रवर्य नेहेमीं आपल्या मुखांत बाल्यावस्थेपासून वागवतात. तसेंच उमेच्या नवऱ्याची पूजा करण्याकरतां माझ्या घराचा (कमलाचा) दररोज छेद करतात. यास्तव सदा खिन्न होत्साती मी ब्राह्मणाचें घर नेहेमीं वर्ज करतें ! "

मनसः परमाणुतां वदंतः कथमद्यापि न तार्किकास्त्रपंते ॥
कनकाचलजित्वरस्तनीनां युवतीनामपि यत्र संनिवेशः ॥ २३८ ॥

" मन हें परमाणुमात्र आहे असें म्हणणारे जे तार्किक (तर्कशास्त्रवेत्ते) त्यांस अद्याप लाज कशी वाटत नाहीं ? पहा कीं, त्याच परमसूक्ष्म मनाचे ठायीं कनकपर्वतास तुच्छ करणारे स्तन ज्यांचे अशा युवतींचाही रिघाव होतो ! " यांतील तात्पर्य श्लेषरूपानें असें आहे कीं, कनकाचलास म्हणजे

मेरूसही जिंकणारे (अर्थात् त्याहूनही विशाल) असे ज्यांचे शरीरावयव त्याही ज्याचे ठिकाणीं मावतात त्याचें परिमाण इतकें अत्यल्प कसें असेल ?

आपदो महतामेव महतामेव संपदः ॥
क्षीयते वर्धते चंद्रः कदाचिन्नैव तारकाः ॥ २३९ ॥

" संपत्ति व विपत्ति ह्या दोन्ही दशा मोठ्यांसच लागू आहेत; पहा, चंद्रालाच क्षयवृद्धि आहेत, तारकांस नाहींत ! "

उष्ट्राणां च गृहे लग्नं खरा मंगलपाठकाः ॥
परस्परं प्रशंसंति अहो रूपमहो ध्वनिः ॥ २४० ॥

" उंटांच्या घरीं लग्न उभें राहिलें असतां मंगलाष्टक म्हणायास गर्दभाचार्यांची योजना झाली; मग जांवईबोवा व उपाध्येबोवा एकमेकांची प्रशंसा करतात—काय हो मनोहर रूप ! कंठ तरी केवढा गोड हो ? "

मूर्खस्य पंच चिह्नानि गर्वी दुर्वचनी तथा ॥
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते ॥ २४१ ॥

" मूर्खांचीं हीं पांच चिन्हें आहेतः—गर्व, दुर्भाषण, हटवाद, कटुप्रलाप, आणि कोणाचें ऐकायाचें म्हणून नाहीं ! "

खलः सत्क्रियमाणोऽपि ददाति कलहं सताम् ॥
दुग्धपुष्टोऽपि किं याति वायसः कलहंसताम् ॥ २४२ ॥

" खळाचा सत्कार केला तरी तो सज्जनांशीं कलह केल्याशिवाय राहात नाहीं. कसें ? तर कावळ्यास दुधानें जरी पोसला तरी तो कधींही कलहंस होईल काय ? "

धम्मिल्लं न परिष्करोति कुसुमैर्नालंकरोत्याननम्
लीलाकीरकिशोरमादरतया नालापयत्याकुला ॥
नोल्लासं प्रतिपद्यते न तनुते संलापमालीजनै-
र्म्लाना चंपकमालिकेव विपिने मेनात्मजा वर्तते ॥ २४३ ॥

पार्वतीच्या विरहावस्थेचें वर्णनः—" ही आपला बुचडा फुलांनीं अलंकृत करीत नाहीं, मुखास सुशोभित करीत नाहीं, दुःखित होत्साती साक्षेपानें क्रीडाशुकाशीं बोलत नाहीं, उल्लासवृत्ति धारण करीत नाहीं, सखी-

कनाशींही भाषण करीत नाहीं, तर रानांत अशी चंपकमाला सुकून जाते त्याप्रमाणें ही मेनेची कन्या खेदयुक्त झालेली आहे ! ”

मणिहारलता विभाति तन्व्याः कुचसिंहासनसीम्नि तस्थिवांसम् ॥
अभिषेक्तुमनंगदेवराजं गलशंखाद्गलितेव दुग्धधारा ॥ २४४ ॥

“ तन्वीनें मणिहाररूप लता जी कंठाचे ठायीं धारण केली आहे ती कुच-सिंहासनावर अधिरूढ झालेल्या कामदेवास अभिषेक करण्याकरितां शंखाकृति जो कंठ त्यापासून गळणारी दुग्धधाराच काय याप्रमाणें भासते ! ”

दातुः परोपकृतिनिर्भरचित्तवृत्तेरासन्नदूरगणना न हि संश्रितेषु ॥
भानुर्विकासयति हंत सरोजषंडं पाणिस्थपंकजसमं भुवनांतरेषु ॥२४५॥

“ परोपकाराविषयीं ज्याची चित्तवृत्ति सदा उल्हासयुक्त अशा दात्याचा आश्रितजनाविषयीं दूरसमीपभाव कधींही असत नाहीं. पहा कीं, सूर्य हा आपल्या हातांतील कमलाप्रमाणेंच भुवनांतरीं असणाऱ्या कमलसमुदायासही विकासवितो ! ”

अक्षराणि समश्रेणीवर्तुलानि घनानि च ॥
परस्परविलग्नानि तरुणीकुचकुंभवत् ॥ २४६ ॥

“ अक्षरें हीं तरुणीकुचांप्रमाणें सारख्या उंचीचीं, वर्तुळ, घन आणि परस्पर विलग्न अशीं असावीं ! ”

वाच्यं तस्मै सहचरि भवद्भूरिविश्लेषवह्नौ
स्नेहैरिद्धे मम वपुरिदं कामहोता जुहोति ॥
प्राणानस्मै तदहमुचितां दक्षिणां दातुमीहे
तत्राऽऽदेशो भवतु भवतां यस्त्वमेषामधीशः ॥ २४७ ॥

कोणी विरहिणी आपल्या सखीबरोबर प्रियकरास निरोप धाडते:—

“ हे सखी ! त्याला असें जाऊन सांग कीं, स्नेहयोगानें (‘ स्नेह ’ शब्द श्लिष्ट आहे) वृद्धीस पावलेला जो विरहाग्नि त्यांत कामरूप यष्टा माझ्या शरीराची आहुति देत आहे व अशा प्रसंगास उचित अशी प्राणरूप दक्षिणा समर्पण करण्याचें माझें मनोगत आहे, पण त्याचें स्वामित्व

आपल्याकडे असल्यामुळें आपणास विचारावास धाडलें आहे, तर याविषयीं आज्ञा व्हावी ! ”

कीलालैः कुंकुमानां सकलमपि जगज्जालमेतन्निषिक्तम्
मुक्ताश्चोन्मत्तभृंगा विघटितकमलक्रोडकारागृहेभ्यः ॥
उत्सृष्टं गोसहस्रं बहलकलकलः श्रूयते च द्विजानाम्
भाग्यैर्वृंदारकाणां हरिहयदयिता सूयते पुत्ररत्नम् ॥ २४८ ॥

सूर्यावर उत्प्रेक्षाः—“ इंद्राची पत्नी (प्राची) देवांच्या भाग्येंकरून पुत्ररत्नास प्रसवली, म्हणून साऱ्या जगभर केशराचे सडे पडले आहेत, उन्मत्त जे भृंग त्यांस कमलबंधनरूप कारागृहांतून मुक्त केले आहेत, हजारों गाई सोडून दिल्या आहेत आणि द्विजसमुदायाचा सारखा घोष होत आहे ! ”— ‘ द्विज ’ व ‘ गो ’ शब्दांवरील श्लेष व एकंदर वर्णनाचा दुसरा अभिप्राय मार्मिकांस सहज कळणार आहे.

उपमैका शैलूषी संप्राप्ता चित्रभूमिकाभेदान् ॥
रंजयति काव्यरंगे नृत्यन्ती तद्विदां चेतः ॥ २४९ ॥

“ उपमा ही नटी निरनिराळे वेष घेऊन काव्यरूप रंगभूमीवर नृत्य करते, व तत्त्ववेत्ते जे सहृदय रसिक त्यांच्या चित्ताचें रंजन करते. ” हीं वेषांतरें रूपक, उत्प्रेक्षा, अपह्नुति, विरोधाभास, श्लेष, दृष्टांत, निदर्शना इत्यादि होत.

रात्रिर्निरजनिकरा नीरजनिकरापरिष्कृता सरसी ॥
अपि भजते न वरसभा नवरसभावज्ञवर्जिता शोभाम् ॥२५०॥

“ चंद्रहीन रात्र, कमलसमुदायानें न शोभणारें सरोवर आणि नवरस व अष्टभाव जाणणारे पंडित जींत नाहींत अशी मोठी सभा हीं तिन्ही शोभा पावत नाहींत. ”

खलानां धनुषां चापि सद्वंशजनुषामपि ॥
गुणलाभो भवेदाशु परहृद्भेदकारकः ॥ २५१ ॥

“ सद्वंशापासून (सत्कुलापासून—चांगल्या वेळूपासून) झाले असले तरी खल व धनुष्य यांस गुणलाभ (उत्कर्षलाभ—रज्जुलाभ) झाला न झाला कीं

त्याचा परिणाम दुसऱ्याच्या हृदयाचा भेद (दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत) हा व्हावयाचा ! "

यातस्यास्तमनंतरं दिनकृतो वेषेण रागान्वितः
स्वैरं शीतकरः करं कमलिनीमालिंगितुं योजयन् ॥
शीतस्पर्शमुपेत्य संप्रति तया रुद्धे मुखांभोरुहे
हासेनैव कुमुद्वतीवनितया वैलक्ष्यपांडूकृतः ॥ २५२ ॥

" सूर्य अस्तास गेलासा पाहून चंद्र हा रागेंकरून (अनुरागानें — संध्यारागानें) युक्त होत्साता सूर्याच्या वेषानें कमलिनीस बळेंच करानें (हातानें—किरणानें) आलिंगायास जों प्रवृत्त झाला, तों त्याच्या शीतल स्पर्शावरून त्यास अन्य समजून तिनें आपलें मुख झांकलें; हें सर्व पाहून चंद्राची स्त्री जी कुमुद्वती तिनें मत्सरभावानें हास्यवदन केलें; त्याच्या योगानें चंद्र लज्जीत होऊन तो फिका झाला ! "

जयश्रियः कृपाणीयं वेणी नानाख्यभूपतेः ॥
अस्यां करगृहीतायामसावभिमुखी तव ॥ २५३ ॥

" नाना नामक भूपाची तरवार ही जयश्रीची वेणीच होय. ती हातांत आली असतां जयश्री अर्थात् अनुकूल झालीच ! " *

सूचीमात्रविभेदसम्भ्रमगुणः क्षोणीशवामभ्रुवा-
मुत्तुंगस्तनमंडलेषु लभते लीलारतिं कुंचकः ॥

---

* वरील श्लोक तिसरा पेशवा जो नानासाहेब त्याविषयीं लिहिला असावा. असाच दुसरा एक श्लोक ' बल्लाळ ' या नांवानें लिहिलेला आढळण्यांत आला आहे:—

" बल्लाळ क्षोणिपाल त्वदहितनगरे संचरंती किराती
कीर्णान्यादाय रत्नान्युरुतरखदिरांगारशंकाकुलांगी ॥
क्षिप्त्वा श्रीखंडखंडं तदुपरि मुकुलीभूतनेत्रा धमंती
श्वासामोदप्रसक्तैर्मधुकरपटलैर्धूमशंकां करोति ॥ "

वरील पेशव्याच्या वेळच्या निजामअलीवरही एक पद्य आढळतें:—

" क्षोणीकाम निजाम तावकभुजं लब्ध्वा भुजंगेश्वरम्
जानीमः करवालकालभुजगी किं नाम गर्भिण्यभूत् ॥
मत्तेभेंद्रविभिन्नकुंभविदलन्मुक्ताकलापच्छला-
दच्छामंडपरंपरामधिरणं सूते स्फुरंती मुहुः ॥ "

नाराचैर्निविडैर्विभिन्नवपुषां पुंसां महायोधने
स्वर्गस्त्रीकुचकुंभसंभ्रमपरीरंभः कथं दुर्लभः ॥ २५४ ॥

" केवळ सुईनें शरीर टोंचून घेतल्याच्या गुणानें कंचुकास (चोळीस) राजस्त्रियांच्या उन्नत कुचमंडलावर निरंतर लीला करावयास सांपडते; मग निबिड शरपंक्तीनें ज्यांचीं शरीरें तुमुल युद्धांत छिन्नभिन्न होऊन गेलीं आहेत अशा योद्ध्यांस अप्सरांच्या कुचकुंभालिंगनाचा लाभ घडतो यांत नवल तें कोणतें ? "

अमी तिलास्तैलिक नूनमद्य स्नेहादवस्थां भवतोपनीताः ॥
द्वेषोऽभविष्यद्यदमीषु नित्यं तदा ह्यवस्थां किमवाकरिष्यः ॥ २५५ ॥

" हे तेल्या ! या तिळांची केवळ स्नेहास्तव (पक्षीं, तेलाकरितां) तूं अशी अवस्था करून टाकलीस; यांचा मग नित्य द्वेषी असता, तर यांची अवस्था यापेक्षां आणखी काय झाली असती कोण जाणे ! "

शांते मन्मथसंगरे रणभृतां सत्कारमातन्वती
वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुंडलम् ॥
बिंबोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्यो रणत्कंकणे
पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बंधक्रमः ॥ २५६ ॥

" रतिसंगर आटपला असतां रणांगणीं ज्यांनीं चांगली चाकरी बजावली त्यांचा सत्कार करण्याकरतां स्त्रीनें जघनास वस्त्रदान केलें, पीनकुचांस हार व कर्णास कुंडलें अर्पिलीं, बिंबोष्ठावर तर मर्जी सुप्रसन्न होऊन त्यास विडा दिला व हस्तांस रणत्कार करणारीं कंकणें बहाल केलीं; पण युद्धांत माग-च्यामागेंच राहिलेला जो केशपाश त्याचें मात्र राजद्रोह केल्याबद्दल बंधन केलें ! " हें असंबंधातिशयोक्तीचें उदाहरण होय.

वैयाकरणकिरातादपशब्दमृगाः क यांतु संत्रस्ताः ॥
यदि नटगणकचिकित्सकवैतालिकवदनकंदरा न स्युः ॥२५७॥

" वैयाकरणरूप किरातापासून भय पावलेले जे अपशब्दरूप मृग त्यांनीं एरवीं कोठें जावें ?—जर नट, ज्योतिषी, वैद्य, स्तुतिपाठक यांचीं मुखें याच कोणी गुहा ह्या नसत्या तर. "